ग्राम पंचायत विकास योजना (GPDP) विशेषांक

सत्यमेव जयते

जून-ऑगस्ट, 2018

# ग्रामोदय संकल्प

खंड 2, अंक 4

पंचायती राज,
ग्रामीण विकास
आणि पेयजल व
स्वच्छता मंत्रालय
यांचेद्वारे प्रकाशित
बातमीपत्र

## गांधीजींचे ग्राम स्वराज्य - विकेंद्रीकरणाचा नमूना

## ग्राम पंचायतींच्या माध्यमातून ग्रामीण स्त्रियांचे सशक्तीकरण

## जीपीडीपीमुळे खडतर मार्ग झाला सोपा, सुखी गावाचे स्वप्न होतेय साकार

## जन सशक्तीकरण : मोबाईल ॲप



“ महात्मा गांधींनी नेहमी गावांच्या महत्त्वावर भर दिला आणि ते नेहमी “ग्राम स्वराज्या” बद्दल बोलत. गावांमध्ये बदल घडून आला तर भारताचा कायापालट होणे निश्चित आहे. ”



# पंतप्रधान-
## ग्राम स्वराज्यातून राष्ट्रउभारणी

आज देश आत्मविश्वासाने परिपूर्ण आहे. स्वप्ने सत्यात उतरवण्याच्या संकल्पासोबतच प्रयत्नांची पराकाष्ठा करून देश नवनवीन शिखरे पादाक्रांत करत आहे.
**15 ऑगस्ट, 2018**

कृषी क्षेत्रातील लोकांना आत्मनिर्भर करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, जन-धन, वनधन, गोबर धन या तिन्हींचे उद्दिष्ट आहे जनजाती आणि कृषी समुदायास सशक्त करणे.
**24 एप्रिल, 2018**

महात्मा गांधींनी नेहमी गावांच्या महत्त्वावर भर दिला आणि ते नेहमी "ग्राम स्वराज्या" बद्दल बोलत. गावांमध्ये बदल घडून आला तर भारताचा कायापालट होणे निश्चित आहे.
**24 एप्रिल, 2018**

भारत आत्मनिर्भर असावा, भारत सामर्थ्यशाली असावा, त्याचा विकासाचा वेग कायम असावा, त्याने नवनवीन शिखरे सतत गाठत राहावीत, जगात भारताचे चांगले नाव असावे आणि आमची इच्छा आहे की भारत जगाच्या नकाशावर चमकत राहावा. आम्हाला असा भारत घडवायचा आहे.
**15 ऑगस्ट, 2018**

प्रत्येक भारतीय व्यक्तीचे स्वतःचे एक घर असावे. प्रत्येक घरी वीज जोडणी असावी. प्रत्येक भारतीय व्यक्तीस धुरापासून मुक्ती मिळावी. प्रत्येक भारतीयास गरजेनुरूप पाणी मिळावे. प्रत्येक भारतीयास शौचालय उपलब्ध असावे. प्रत्येक भारतीयास कौशल्य प्राप्त व्हावे. प्रत्येक भारतीयास उत्तम आणि स्वस्त आरोग्यसेवा मिळावी. विमा संरक्षण छत्र मिळावे. प्रत्येक भारतीयास इंटरनेट जोडणी मिळावी. या मंत्राचा जप करत आम्ही देशास प्रगतीपथावर नेऊ इच्छितो.
**15 ऑगस्ट, 2018**

# अनुक्रमणिका




गांधीजींचे ग्राम स्वराज्य- विकेंद्रीकरणाचा नमुना 06






15 गावाचा विकास सरकारचा संकल्प






'ॲप' उपक्रमाने ग्रामीणांना न्याय 32


## पंचायती राज मंत्रालय


| | |
|---|---|
| ग्राम स्वराज्य अभियान | 09-11 |
| जीपीडीपीने सोपा केला खडतर मार्ग, सुखी गावाचे स्वप्न झाले साकार | 12-14 |
| ग्राम पंचायतींच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे सशक्तीकरण | 16-18 |
| यशोगाथा | 19-20 |
| मिळून केलेल्या प्रयत्नांमुळे झाली चांदसमंद गावाची प्रगती | 21-22 |
| ग्राम पंचायत विकास योजना | 24-25 |


## ग्रामीण विकास मंत्रालय


| | |
|---|---|
| चपका ग्राम पंचायत | 23 |
| बीज माता | 26-27 |
| थेन्नला ॲग्रो फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड | 28 |
| गुलाबी झाले जोडंदा झरिया गावातील लोकांचे जीवन | 31 |


## पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय


| | |
|---|---|
| यशोगाथा | 19-20 |
| तुम्हाला माहित आहे? | 41 |
| ग्रामीणचे स्वच्छता संदेशवाहक चतुरसिंग-मॅडम बातूनी | 45 |
| राउंड अप ॲक्टीविटी | 46 |



## सल्लागार मंडळ

सचिव, पंचायती राज मंत्रालय
सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय
सचिव, पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय

## मुख्य संपादक

अमरजित सिन्हा
सचिव, पंचायती राज मंत्रालय आणि ग्रामीण विकास मंत्रालय

## संपादकीय मंडळ

आर्थिक सल्लागार, पंचायती राज मंत्रालय
संयुक्त सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय
महासंचालक, पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय
संचालक (आय.ई.सी.), ग्रामीण विकास मंत्रालय
संचालक (आय.ई.सी.), पेयजल आणि स्वच्छता मंत्रालय
संचालक (माध्यमे), पंचायती राज मंत्रालय

## संकलन व भाषांतर

जागरण प्रकाशन लि.





विरळा महानायक अटल बिहारी बाजपेयी 08





36 यशोगाथा पेयजल व स्वच्छता



सत्यमेव जयते

**नरेंद्र सिंग तोमर**
**ग्रामीण विकास,**
**पंचायती राज व खाण मंत्री**
**भारत सरकार**
**कृषी भवन, नवी दिल्ली**

# संदेश

पंचायती या घटनेद्वारे मान्यताप्राप्त लोकप्रिय संस्था आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांचा उद्देश सर्वसामान्य जनतेच्या हिताची जपणूक करणे हा असतो. स्थानिक लोकांच्या सक्रिय सहभागाच्या योगे आर्थिक विकास व सामाजिक न्यायाच्या योजना तयार करणे आणि त्या अंमलात आणणे ही पंचायतींची घटनात्मक जबाबदारी आहे. हे खरे आहे की सत्ता आणि निर्णय प्रक्रियेत गावातील प्रत्येक व्यक्ती समाविष्ट असण्यावरच स्थानिक स्वराज्य संस्थेचे यश मोजले जाऊ शकते. हेच उद्दिष्ट नजरेपुढे ठेवत ग्राम पंचायत विकास योजनेस (जीपीडीपी) अधिक उत्तम करण्यासाठी आणि यात प्रत्येक नागरिक सहभागी व्हावा म्हणून भारत सरकारद्वारे गांधी जयंतीच्या दिवशी 02 ऑक्टोबर, 2018 पासून जीपीडीपी तयार करण्याशी संबंधित जनजागृती अभियानास सुरुवात करण्यात येणार आहे. पुढील आर्थिक वर्षासाठी तपशीलवार जीपीडीपी तयार करण्याच्या या महत्त्वाच्या अभियानांतर्गत विविध मंत्रालयांदरम्यान समन्वय साधण्यासाठी योजनेची आखणी करण्यात येईल. ही मोहीम 31 डिसेंबर, 2018 पर्यंत सुरु राहील. पंचायतींकडून आम्ही अशी आशा आणि अपेक्षा करतो की त्या आपल्या सर्व अंतर्गत आणि बाह्य स्रोतांचे योग्य व्यवस्थापन करीत ग्रामस्थांच्या सहमतीने आणि मदतीने ग्राम पंचायत विकास योजना तयार करतील. मला खात्री आहे की जीपीडीपी अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या योजनांमुळे गावे आर्थिक व सामाजिकदृष्ट्या समृद्ध होतील. आम्हाला जीपीडीपीच्या योगे कृषी, पर्यायी ऊर्जा, पाणी व्यवस्थापन, स्वच्छता, कौशल्य विकास आणि इतर संबंधित क्षेत्रांमध्ये करण्यात येत असलेले अभिनव प्रयोग व नवनवीन उपक्रम दूरवरच्या गावांपर्यंत न्यायचे आहेत. या बाबतीत सुनियोजित व योग्य व्यवस्थापन सशक्त व नवीन भारताच्या बांधणीच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.

**"सबका साथ सबका विकास"** हे घोषवाक्य देण्यामागे आमचा मुख्य उद्देश आहे सर्व ग्रामस्थांना विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडणे. सर्वसामान्य लोकांना ग्राम सभा व ग्राम पंचायतीच्या कामांमध्ये आपल्या भूमिकेचे महत्त्व लक्षात आले तरच स्थानिक स्वराज्य संस्था सशक्त व सुदृढ होऊ शकेल. सर्व पंचायत प्रतिनिधींना मी कळकळीने विनंती व आवाहन करतो की **"सबकी योजना, सबका विकास"** वर आधारित समग्र जीपीडीपी निर्मितीच्या या महत्वाकांक्षी मोहिमेत आपले अमूल्य योगदान देऊन, तीत सक्रियपणे सहयोग देऊन आणि उत्साहाने सामील होऊन ती यशस्वी करण्यास हातभार लावावा आणि राष्ट्राच्या उभारणीत सहयोग द्यावा.

जय हिंद.

(नरेंद्र सिंग तोमर)



सत्यमेव जयते

**राज्य मंत्री**
**कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय**
**व पंचायती राज मंत्रालय,**
**भारत सरकार**

# संदेश

भेदभावरहित आणि समानतेवर आधारित असलेल्या समाजाची स्थापना हा आपल्या राज्यघटनेचा गाभा आहे. हीच संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी 75वी घटनादुरुस्ती पंचायती राज संस्थांचे सशक्तीकरण आणि सुशासन होईल याची तर काळजी घेतेच शिवाय जनतेच्या गरजा व आकांक्षांच्या पूर्ततेसाठी विकास योजना तयार करणे, त्या राबविणे आणि त्यांच्यावर देखरेख करण्याची जबाबदारीही पंचायतींना देण्यात आलेली आहे. 'ग्राम पंचायत विकास योजने' (जीपीडीपी) ची संकल्पनासुद्धा एका सहभागी योजनेच्या स्वरुपात तयार करण्यात आलेली आहे. यात गावाच्या प्राथमिक साराच्नेपासून ते लहान-मोठ्या सर्व प्रकारच्या विकास कामांसाठी ग्राम पंचायती ग्रामसभेच्या माध्यमातून योजना तयार करतात.

14व्या वित्त आयोगाच्या शिफारसी पंचायतींच्या इच्छेनुसार लागू करून त्यांना त्यांचे खरे अधिकार देऊ करण्याचे काम केंद्रातील सध्याच्या सरकारने केले आहे. पूर्वी हा निधी जिल्हा, ब्लॉक आणि ग्राम पंचायतींना दिला जात असे, परंतु 14व्या वित्त आयोगाच्या शिफारसींतर्गत हा निधी फक्त ग्राम पंचायातींसाठी आहे. 14व्या वित्त आयोगाच्या शिफारसींनुसार अनुदान मिळविण्यासाठी ग्राम पंचायत विकास योजना तयार करणे सक्तीचे करण्यात आलेले आहे.

दीर्घ कालावधीतील विकासाचे प्रमाण व आव्हाने पाहता आपण जीपीडीपीच्या गुणवत्तेमध्ये गुणात्मक दृष्टीने सुधारणा करायला हव्यात आणि स्वयंसहायता गटांना सोबत घेऊन स्त्रियांचे सबलीकरण आणि निरंतर विकासाचे लक्ष्य डोळ्यांपुढे ठेवत जीपीडीपी तयार करायला हव्या. जीपीडीपी परिणामकारकपणे राबविण्यात आल्यास गावांचा विकास तर होईलच शिवाय रोजगाराच्या अनेक संधीही उपलब्ध होतील. योजना राबविताना त्यांच्यावर देखरेख करण्यात आल्यास आणि पारदर्शक कारभार असल्यास दारिद्र्यात घट होईल आणि शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पेयजल, पोषण, खाद्य सुरक्षा, निरंतर आजीविका, घरे, वीज, लिंग समानता आणि सामाजिक न्यायाची उद्दिष्टेही गाठता येतील.

14व्या वित्त आयोगाच्या अनुदानाने ज्याप्रकारे ग्रामीण भारताच्या विकासाचे स्वरूप आमुलाग्र बदलून टाकले आहे, त्याच प्रकारे ग्राम पंचायत विकास योजना (जीपीडीपी) तयार केल्याने ग्राम पंचायतींच्या समग्र आणि सुनियोजित विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. पंचायती राज मंत्रालयाच्या निरंतर प्रयत्नांमुळेच राज्य सरकारांच्या सहकार्याने आमच्या ग्राम पंचायती मोठ्या प्रमाणावर जीपीडीपी तयार करण्यात यशस्वी ठरल्या आहेत. 'सबका साथ सबका विकास' आणि 'साफ नियत सबका विकास' या आमच्या समग्र आणि सर्वांगीण विकासाच्या मंत्रांना मागील काही वर्षांमध्ये आलेला अनुभव पाहता जीपीडीपी अधिक सशक्त, पारदर्शक आणि प्रभावी करण्याची हीच योग्य वेळ आहे. ग्राम पंचायत विकास योजनेच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी आणि यात जन-धन भागीदार व्हावे या उद्देशाने भारत सरकारद्वारे 2 ऑक्टोबर, 2018 ते 31 डिसेंबर, 2018 पर्यंत जन-योजना अभियान राबविण्यात येणार आहे. या महत्त्वाकांक्षी जन-जागरूकता अभियानात भारत सरकारच्या अठरा मंत्रालयांच्या व विभागांच्या योजना राबविण्यासाठी संबंधित कार्य योजना तयार करण्यात येतील आणि मी या योजनेच्या अपेक्षा करतो की ही योजना नक्की यशस्वी होईल आणि नवीन भारताच्या उभारणीच्या दिशेने आपण सर्व पंचायत प्रतिनिधी सक्रियपणे सहभागी व्हाल.

शुभकामनांसह

(परषोत्तम रुपाला)

# गांधीजींचे ग्राम स्वराज्य-विकेंद्रीकरणाचा नमुना



**गांधीजींनी अशा बलशाली भारताचे स्वप्न पहिले जो गावांनी मिळून बनलेला असेल आणि आत्मनिर्भर असेल, परंतु व्यापार व विनिमयाच्या संदर्भात इतर गावांशी जोडलेला असेल.**



'स्वराज्य' हा शब्द भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील एक अविभाज्य भाग आहे आणि याची व्याख्या कितीतरी संदर्भ लक्षात घेऊन करण्यात आलेली आहे. होम रूल आणि स्वशासन याचे सर्वसामान्य अर्थ होते आणि अनेक राजकारणी त्याचा वारंवार पुनरुच्चार करत. परंतु, महात्मा गांधींसाठी स्वराज्य फक्त एक राजनैतिक मुद्दा नव्हता तर त्यांच्यासाठी तो शब्द कितीतरी अर्थगर्भ होता.

1909 मध्ये ते जहाजात बसून प्रवास करत असताना 'हिंद स्वराज' लिहित असतानाही त्यांना पूर्ण खात्री होती की भारताला वेगळ्या प्रकारच्या स्वराज्याची गरज आहे - स्वराज्य मिळविण्यापूर्वी स्वतःवर पूर्णपणे आत्मनियंत्रण मिळविणे. त्यांचा हाच विचार स्वराज्याच्या त्यांच्या संकल्पनेत नेहमी समाविष्ट होता आणि ग्राम स्वराज्याच्या संकल्पनेतदेखील.

महात्मा गांधींची नजर पूर्णपणे सामाजिक समानता, सामाजिक एकता आणि श्रमप्रतिष्ठा यांसारख्या चिरकालिक विचारांवर खिळलेली असे जेणेकरून या विशाल आणि वैविध्यपूर्ण देशातील लोकांमध्ये असलेली दरी सांधू शकेल आणि भारतीय लोक एकत्रित स्वरूपातील आपल्या अस्तित्वात आपले स्वतंत्र असे योगदान देऊ शकतील.

गांधीजींनी गावांपासून सुरुवात होणाऱ्या एका बलशाली भारताचे स्वप्न पहिले. गावे आत्मनिर्भर असावीत, परंतु ती व्यापार आणि इतर देवाण-घेवाणीच्या संदर्भात इतरांशी जोडलेली असावीत. भारतास एका शरीराची उपमा दिल्यास त्याचा प्रत्येक अव्याब निरोगी असणे आवश्यक आहे. बलशाली राष्ट्राच्या उभारणीसाठी गावांचे आधुनिक आणि आत्मनिर्भर असणे आवश्यक आहे जेणेकरून गावांमधील लोक प्रतिष्ठेचे जीवन जगू शकतील. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी संसदेतील आपल्या पहिल्या भाषणात हेच म्हटले. त्यांचा प्रत्येक शब्द हिंद स्वराज्याने प्रेरित होता. गांधीजी ज्यास स्व वर शासन करणे असे म्हणत त्यालाच मोदीजींनी करण्यात येणाऱ्या कोणत्याही कामात शिस्त आणि देशाप्रति असलेल्या वचनबद्धतेचे नाव दिले.

हे 'स्वतःवरील शासन' एका व्यक्तीपासून ते सर्व देशात प्रवाहित होते. प्रत्येक व्यक्ती आपल्या सर्व क्षमतांचा वापर करत प्रतिष्ठेने जीवन जगू शकते. या संकल्पनेत सर्वात लहान एकक व्यक्ती असेल, त्याचप्रमाणे राजनैतिक व आर्थिक एकक ग्राम किंवा गाव असेल. आत्मशक्ती वाढवून वाणिज्य, शिक्षण आणि आत्मनिर्भरता प्राप्त करायची होती.

या संकल्पनेत एकेका व्यक्तीच्या कौशल्यास प्रोत्साहन देण्यावर भर होता आणि शिक्षणाचे मुख्य लक्ष त्यावरच केंद्रित होते. त्यामुळे एखाद्या शिल्पकाराचा मुलगा आपल्या उदरनिर्वाहासाठी कुशल असावा आणि त्यासोबतच त्याला इतर शिक्षणही मिळावे. तंत्रज्ञानाचे काम रोजगार वाढविणे



हे होते, नोकऱ्या काढून घेणे हे नव्हे. हा विकेंद्रीकरणाचा असा नमुना होता ज्याला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तिलांजली देण्यात आली. गांधीजींनी खेड्यांसाठी एखाद्या मजबूत अशा मधमाशांच्या पोळ्यासारख्या रचनेचे स्वप्न पहिले ज्यात प्रत्येक खेडे इतर खेड्यांशी जोडलेले असेल, पण आधुनिक प्रगतीच्या बिंदूच्या रुपात ते अगदी थोडक्या शहरांशी जोडलेले असेल.

परंतु, आपण वेगळाच मार्ग निवडला. शहरांचा विकास साधताना गावांकडे दुर्लक्ष करण्यात आले आणि ती मोठी होत-होत गावांना गिळंकृत करून बसली. शहरांकडे धाव घेतल्याने गावांमधील प्रतिभा लोप पावली. पुस्तकी ज्ञान आणि पदव्यांनी पारंपारिक कौशल्ये झाकोळून गेली. पदवी मिळवून शेतकऱ्याचा मुलगा शहरात येऊ लागला, पण त्याला तिथे मजुरी करूनच जीवन जगणे शक्य होते. त्यानेही गावातील श्रमप्रतिष्ठा असलेले जीवन नाकारून शहरांमधील अपमानास्पद जगण्याची निवड केली. यामुळे माजलेल्या अराजकतेचा सामना देश आजही करत आहे. याचे मूळ कारण म्हणजे श्रमप्रतिष्ठेचा अभाव.

गांधीजींच्या ग्राम स्वराज्यापासून प्रेरणा घेऊन साकारलेल्या कुटीर उद्योग, पारंपारिक शिल्पकला आणि गावातील उद्योगांसारख्या संकल्पना कागदोपत्रीच राहिल्या, त्या प्रत्यक्षात उतरू शकल्या नाहीत. हे वास्तव महात्मा गांधींनी 1946 मध्ये केलेल्या आपल्या संकल्पनेच्या व्याख्येच्या अगदी विरुद्ध आहेः

'स्वातंत्र्याची सुरुवात खालच्या स्तरापासून होते....समाजाची उभारणी अशा तऱ्हेने झालेली असावी ज्यात प्रत्येक खेडे आत्मनिर्भर आणि आपले व्यवस्थापन करण्यात सक्षम असावे...त्याला असे प्रशिक्षण प्राप्त असावे की ते बाह्य हल्ल्यापासून आपले संरक्षण करण्याच्या प्रयत्नात नष्ट होण्यासही तयार असावे...याचा अर्थ असा नव्हे की त्याने शेजाऱ्यांची किंवा जगाची मदत घेऊ नये. हा परस्पर शक्तीन्मधील स्वतंत्र आणि ऐच्छिक संबंध असेल....या रचनेत गावे मोठ्या प्रमाणावर असतील आणि त्यात सतत वृद्धी पावणारी वृत्ते असतील. विकास एखाद्या पिरमिडप्रमाणे नसावा ज्यात वरचा भाग खालच्या भागावर अवलंबून असतो, तर ही रचना जणू एखाद्या महासागरासारखी असावी ज्याच्या केंद्रस्थानी व्यक्ती असेल. यासाठी सर्वांत बाहेरील घटक आतील घटकांचे महत्व कमी करण्यासाठी आपली शक्ती पणाला लावणार नाही, तर आपल्यात सामावलेल्या सर्व घटकांना शक्ती प्रदान करेल आणि त्याऐवजी त्यांच्याकडून शक्ती प्राप्त करेल.'



महात्मा गांधींच्या संकल्पनेप्रमाणे भारतीय खेड्यांना तसे स्वरूप प्राप्त करून देणे खूप कठीण आहे कारण परिस्थिती एवढी बदललेली आहे की ती पूर्ववत करणे अशक्यप्राय आहे. ग्रामीण-शहरी भारताचे स्वरूप इतके बदलले आहे की ते ओळखणे अशक्य आहे. तरीही खेडी अजूनही जिवंत आहेत. आपण खेड्यांवर आधारित उद्योग, शैक्षणिक सुविधा आणि कौशल्याधारित कामांना प्रोत्साहन देऊन अजूनही खेडी वाचवू शकतो. पण खेड्यांमधील रहिवासी आणि विशेष म्हणजे तरुण पिढीस आपल्या वातावरणात आत्मसन्मानाची भावना जाणवली तरच असे होणे शक्य आहे. खेड्यांकडे परत वळण्याची प्रक्रिया सुरु होण्यासाठी लोकांना प्रतिष्ठितपणे जीवन जगण्याच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, असे जीवन ज्यात आर्थिक समृद्धीसोबतच आधुनिकता व परंपरा यांच्यादरम्यान आदरणीय संबंध असेल आणि ग्रामस्थांचे उत्पादन देशाच्या आर्थिक प्रगतील आपले योगदान देईल.

आपण अशा एका वळणावर येऊन ठेपलो आहोत जेथे महात्मा गांधींच्या विचारांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे कारण या विचारांमध्ये श्रमप्रतिष्ठेने युक्त असलेल्या आणि एकमेकांवर निर्भर असलेल्या जीवनाबद्दलचा विचार आहे. ते स्वतंत्र राहण्याचा मुद्दा उचलून धरतात आणि इतरांना तसेच स्वतःलाही आदर देण्याविषयी बोलतात. समाजाच्या शेवटच्या पायरीवरील व्यक्तीपर्यंत स्वराज्य पोचले तरच खऱ्या अर्थाने स्वराज्य हा उद्देश सफल होईल.♦

**डॉ. आलोक बाजपेई**
**मनोचिकित्सक व क्युरेटर -**
**ॲन आवर वित द महात्मा**



# विरळा महानायक अटल बिहारी बाजपेयी

इतिहास कुणालाही महानायकाचा दर्जा देत नाही. यासाठी संपूर्ण जीवन सोन्याप्रमाणे आव्हाने आणि अडचणींच्या अग्नीत तापवावे लागते. माजी पंतप्रधान अटल बिहारी बाजपेयीदेखील असेच महानायक होते ज्यांनी विरुद्ध दिशेने वाहणाऱ्या वाऱ्यांना तोंड देत देशासाठी आपले जीवन समर्पित केले. म्हणूनच अटलजी विरळा ठरतात. ते दिग्गज राजकारणी, परराष्ट्र व्यवहारांचे जाणकार आणि कुशल प्रशासक तर होतेच शिवाय ते एक संवेदनशील कवी आणि पत्रकारही होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी त्यांचे घनिष्ठ नाते होते. आरएसएस ने जनसंघ या राजनैतिक शाखेची स्थापना केली आणि तिचे पहिले अध्यक्ष श्यामा प्रसाद मुखर्जी यांचे सहयोगी म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. ते आपल्या प्रतिभेच्या बळावर पुढे वाटचाल करत राहिले. ते एक उत्तम लेखक आणि पत्रकारसुद्धा होते. लखनऊहून प्रकाशित होणाऱ्या राष्ट्रधर्म या मासिकाचे संपादकपद त्यांनी भूषविले. त्यांना देशाची आर्थिक प्रगती, वंचितांचे उत्थान तसेच स्त्रिया व मुलांच्या कल्याणाची सतत काळजी असायची. ते



आपले जीवन समाजसेवक, विचारवंत, राजनेते, कवी, पत्रकार, पंतप्रधान, लोकांचे नायक अशा अनेक रूपांमध्ये भरभरून जगले आणि या जगण्याचे वर्णन त्यांनी "मैं जी भर जिया, मैं मन से मरूँ, लौटकर आऊंगा, कूच से क्यों डरूं?" अशा शब्दांत केले.

जगास जिंकून घेणारे स्मितहास्य आणि शब्दांच्या जादूने ओतप्रोत भरलेले आणि सर्वांबद्दल प्रेमभावना असणाऱ्या अटलजींनी या जगाचा निरोप घेतला असला तरीही सर्वसामान्य लोकांच्या मनात ते नेहमी घर करून राहतील. ते अजातशत्रू होते. त्यांचे विरोधकसुद्धा त्यांच्या प्रतिभेचे चाहते होते. याच कारणामुळे पी व्ही नरसिंह राव यांच्या कार्यकाळात अटलजी विरोधी पक्षाचे नेते असूनही त्यांना परदेशात भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. देशाचे पंतप्रधान म्हणून अटलजींनी पाकिस्तान आणि चीनशी असलेले भारताचे संबंध सुधारण्याच्या दिशेने अभूतपूर्व पावले उचलली. आंतरराष्ट्रीय दबाव असतानाही त्यांनी पोखरणमध्ये अणुचाचण्या केल्या आणि कारगिल युद्धात विजय मिळवून पाकिस्तानला नामोहरम केले.♦

## श्री अटल बिहारी बाजपेयी यांची काही महत्त्वाची कामे

**प्रधानमंत्री ग्राम सडक योजना**

अटलजींनी 15 ऑगस्ट 2015 पासून रस्ते बांधून गावे जोडण्याच्या कामास प्रारंभ केला. याच योजनेमुळे आज लाखो गावे रस्त्यांनी जोडली गेली आहेत. या योजनेचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण भागामध्ये 500 किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या आणि रस्ते नसलेल्या (डोंगराळ आणि वाळवंटी भागांमध्ये 250 लोकसंख्या असलेली गावे) गावांना मुख्य रस्त्यांशी जोडणे हे आहे.

**सुवर्ण चतुर्भुज**

देशातील मोठ्या शहरांना रस्ते बांधून जोडण्याच्या कामाचीही सुरुवात अटलजींच्या शासनकाळातच झाली. 5846 किमी लांबीची सुवर्ण चतुर्भुज योजना त्यावेळी जगातील सर्वात जास्त लांबी असलेला महामार्ग प्रकल्प मानला गेला होता. दिल्ली, कोलकाता, चेन्नई व मुंबईस महामार्गाने जोडण्यात आले.

**सर्व शिक्षा अभियान**

सर्व शिक्षा अभियान हा भारत सरकारचा एक प्रमुख कार्यक्रम असून त्याची सुरुवात (2001-02) मध्ये अटल बिहारी बाजपेयी यांनी विशिष्ट कालावधीत प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी केली होती.

**अंत्योदय अन्न योजना**

2001 या वर्षापासून सार्वजनिक वितरण प्रणाली योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखाली जगणाऱ्या अतिशय गरीब कुटुंबांसाठी अंत्योदय अन्न योजना लागू करण्यात आली.

# ग्राम स्वराज्य अभियान



**नरेंद्र सिंग तोमर**
ग्रामीण विकास, पंचायती राज
व खाण मंत्री, भारत सरकार

ग्राम स्वराज्य अभियान ही देशातील वंचित व गरीब कुटुंबांपर्यंत कल्याणकारी योजना पोचाव्यात यासाठी राबविण्यात आलेली विशेष मोहीम होती. या मोहिमेचा प्रारंभ माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी 14 एप्रिल, 2018 या भारतरत्न डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या जन्मदिनी केला होता. या योजनेचे उद्दिष्ट सामाजिक समरसता व सौख्यास प्रोत्साहन देणे, वंचित व गरिबांसाठी सरकारद्वारे राबविण्यात येणाऱ्या मुख्य विकास योजना व कल्याणकारी कामांबद्दल जागरूकता वाढविणे आणि कुठल्याही कारणामुळे केंद्र सरकारच्या या योजना व कार्यक्रमांपासून वंचित राहिलेल्या किंवा सुटलेल्या सर्व पात्र व्यक्तींना या योजनेच्या परिघात समाविष्ट करून लाभान्वित करणे हे होते.

ग्राम स्वराज्य अभियान सुरु असताना या योजना पूर्णपणे राबविण्यात याव्यात यासाठी देशातील 16,850 गावांसाठी विशेष उपक्रम सुरु करण्यात आले आहेत. यात निवडणुका होऊ घातलेल्या कर्नाटक व पश्चिम बंगालमधील गावांना समाविष्ट करण्यात आलेले नाही. या कार्यक्रमाचा उद्देश निवडण्यात आलेल्या सर्व गावांमधील सर्व पात्र असलेल्या लाभार्थ्यांपर्यंत या सातही योजना पूर्णपणे पोचतील याची काळजी घेणे हे होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यात विविध हितधारकांनी मोठ्या प्रमाणावर समन्वय आणि सक्रीय सहयोग दिला आणि हे या कार्यक्रमाबद्दल सर्वसामान्य जनतेमध्ये असलेल्या प्रचंड उत्साहाचे प्रतीक आहे. हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्यासाठी निवडण्यात आलेल्या पंचायती राज्य संस्थांच्या 33 लक्ष प्रतिनिधींनी, महिला स्वयंसहायता गटांच्या (एसएचजी) 5 कोटी सदस्यांनी, आमदार, खासदार, विविध केंद्रीय मंत्री, राज्य सरकारे आणि स्थानिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. ग्राम स्वराज्य अभियानाचे महत्व आणि यशस्वितेचा उल्लेख करताना माननीय पंतप्रधान म्हणाले की, "ग्राम स्वराज्य अभियानाचा एक भाग म्हणून गावांमध्ये वेगवेगळे चमू तयार करण्यात आले असून यामुळे केंद्र सरकारच्या सात महत्वाच्या योजना पूर्णपणे राबविल्या जातात. हे आंदोलन म्हणजे लोकांच्या दारापर्यंत सेवा पोचवल्या जाण्याचे एक महत्वाचे उदाहरण असून यामुळे गावांचे जीवन सुलभ होत आहे."

ग्राम स्वराज्य अभियानांतर्गत 1000 पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या आणि 50 टक्क्यांहून अधिक अनुसूचित जातींची लोकसंख्या असणाऱ्या गावांना




**14 एप्रिल 2018 ते 5 मे 2018 पर्यंत 'ग्राम स्वराज्य अभियान - सबका साथ, सबक अगाच, सबका विकास' कार्यक्रमाच्या रुपात आयोजित करण्यात आला होता. केंद्र सरकारच्या खालिल प्रमुख 7 योजनांचा समावेश होता. 1) प्रधानमंत्री उज्ज्वल योजना 2) उजाला योजना 3) प्रधानमंत्री जन-धन योजना 4) प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना - सौभाग्य योजना 5) प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना 6) प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि 7) मिशन इंद्रधनुष्य**



सामील करून घेण्यात आले होते. उत्तर-पूर्वेकडील राज्यांबद्दल बोलायचे झाले तर 500हून अधिक लोकसंख्या असणाऱ्या आणि 50 टक्क्यांहून अधिक अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीची लोकसंख्या असणारी गावे सामील करून घेण्यात आली. पहिल्या टप्प्यातील ग्राम स्वराज्य अभियानात एकूण 16,850 गावे सामील करून घेण्यात आली. या प्रकारचे व्यापक अभियान, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर केल्याशिवाय प्रभावीपणे राबविणे शक्य नव्हते. म्हणून निर्धारित उद्दिष्टे विहित कालावधीत गाठणे, प्रभावी नेतृत्व आणि आवश्यकतेनुरूप प्रभावी हस्तक्षेप करता यावा यासाठी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, डी.आर.डी.ओ.द्वारे रिअल टाईम डेटा कॅप्चरिंग आणि मॉनिटरिंग पोर्टलसोबतच एक ॲपसुद्धा तयार करण्यात आले. ग्राम स्वराज्य अभियानच्या पहिल्या टप्प्याच्या यशाने प्रेरित होऊन सरकारने ग्राम स्वराज्य अभियान (जीएसए) ला "विस्तारित ग्राम स्वराज्य अभियान" म्हणून 1 जून, 2018 ते 15 ऑगस्ट, 2018 पर्यंतच्या कालावधीसाठी लागू केले. विस्तारित ग्राम स्वराज्य अभियानामध्ये 117 जिल्ह्यांमधील 1000 हून अधिक लोकसंख्या असलेली गावे, कर्नाटक व पश्चिम बंगालमधील 1000हून अधिक लोकसंख्या असलेली गावे आणि अनुसूचित जातीच्या लोकांची संख्या 50 टक्क्यांहून अधिक असलेली गावे समाविष्ट करून घेण्यात आली. याप्रकारे ग्राम स्वराज्य अभियानाच्या या टप्प्यात एकूण 48,929 गावे सामील करून घेण्यात आली.

अभियानाच्या दोन्ही टप्प्यांदरम्यान केंद्राच्या 7 प्रमुख योजना आणि महत्वाकांक्षी कार्यक्रमांचा लाभ न मिळू शकलेल्या पात्र व्यक्तींना या योजनांमध्ये सामील करून घेण्यात भरघोस यश मिळाले. ग्राम स्वराज्य अभियान आणि विस्तारित ग्राम स्वराज्य अभियानाच्या 7 प्रमुख कार्यक्रमांतर्गत 5 महत्वाची क्षेत्रे निश्चित करण्यात आली. ती क्षेत्रे म्हणजे शिक्षण, आरोग्य, पोषण, कौशल्य व शेती. विस्तारित अभियानांतर्गत अधिक यश मिळावे म्हणून शेतीमध्ये पायलट प्रकल्प (उदाहरणार्थ, मृदा आरोग्य कार्ड वितरीत करणे, डाळी व तिळांच्या बियांचे मिनी कीट, बागकाम किंवा बांबू रोपांची लागवड) यांसारखे उपक्रम समविष्ट करण्यात आले. विस्तारित ग्राम स्वराज्य अभियान सुरु असताना कितीतरी मुख्य योजना शंभर टक्के राबविण्यात यश मिळाले.

• अभियानाच्या दोन्ही टप्प्यांमध्ये प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेंतर्गत 48.28 लक्ष नवीन एलपीजी गॅस कनेक्शन वितरीत करण्यात आले आणि हे उद्दिष्ट 100 टक्के गाठण्यात आले. ही योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्याने महिलांसाठी स्वयंपाकाचा स्वच्छ गॅस उपलब्ध करून देण्याचे बहुप्रतीक्षित काम सिद्धीस गेले. यामुळे स्त्रिया व मुलांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यास मदत झाली आहे. आता त्यांना स्वयंपाकघरातील धुरापासून तर मुक्ती मिळालीच, शिवाय आता त्यांना जळाऊ लाकडाच्या शोधात असुरक्षित ठिकाणी भटकावे लागत नाही.

• प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना - सौभाग्यच्या अंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील सर्व गरीब कुटुंबांना निःशुल्क वीज जोडण्या देण्यात आल्या. डिसेंबर 2018 पर्यंत याअंतर्गत देशातील घरी अजूनही वीज जोडणी नसलेल्या सुमारे 4 कोटी कुटुंबांना निःशुल्क वीज जोडणी देण्याचे उद्दिष्ट आहे. या अभियानादरम्यान 31.26 लक्ष घरांमध्ये नवीन वीज जोडण्या देण्यात आल्या.

• वातावरण बदलाविषयी जागतिक स्तरावर प्रकट करण्यात येणारी काळजी आणि पर्यावरणाची सुरक्षा या बाबी लक्षात घेता आजच्या काळात उर्जादक्ष असणे अतिशय महत्वाचे आहे. माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी 5 जानेवारी, 2015 रोजी किफायतशीर एलईडी बल्बच्या माध्यमातून उत्तम प्रकाश देणाऱ्या उजाला योजनेची पायाभरणी केली. या योजनेचे उद्दिष्ट मार्च 2019 पर्यंत देशातील 770 दशलक्ष परंपरागत बल्बसऐवजी एलईडी बल्बस वापरण्यात यावे हे आहे. अधिक चांगला प्रकाश, वीज बिलाच्या खर्चात कपात आणि उर्जा सुरक्षेत योगदान देण्याच्या उद्देशाने गावांमधील सर्व कुटुंबांना उर्जेची बचत करणाऱ्या एलईडी बल्बचे वाटप करण्यात येत आहे. विस्तारित ग्राम स्वराज्य अभियानादरम्यान 68.52 लक्ष अन्विन एलईडी बल्बसचे वाटप करण्यात आले.

• राष्ट्रीय पातळीवर वित्तीय सामावेशांतर्गत ऑगस्ट 2014 मध्ये प्रधानमंत्री जन-धन योजनेची सुरुवात करण्यात आली. या योजनेचे उद्दिष्ट आहे प्रत्येक कुटुंबास किमान एक बँक खाते उपलब्ध करून देऊन त्यांच्यापर्यंत बँकिंगच्या सोयी पोचविणे. या योजनेत कुणीही कोणत्याही बँकेच्या शाखेत किंवा बँक-मित्र आउटलेटमध्ये "आपल्या ग्राहक मित्रास ओळख" म्हणजे केवायसी चा तपशील सादर करून प्राथमिक बचत बँक खाते उघडू शकते. जन-धन खाते उघडण्यासाठी किमान रक्कम जमा करण्याची किंवा

खात्यात किमान रक्कम ठेवण्याची काहीही गरज नाही. जन-धन खातेधारकांना रूपे डेबिट कार्ड निःशुल्क देण्यात येते, तसेच एक लक्ष रुपयांचे अपघात विमा संरक्षणसुद्धा देण्यात येते. ग्राम स्वराज्य अभियानाच्या दोन्ही टप्प्यांमध्ये 73.51 लक्ष नवीन जन-धन खाती उघडण्यात आली.

• अगदी थोडे प्रीमियम भरून जीवन विमा सुविधा देऊ करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारद्वारे सुरु करण्यात आलेल्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेत 18 ते 50 वर्षे वय असलेल्या सर्व बँक खातेधारकांना वार्षिक रु. 2 लक्ष एवढे जीवन विमा छत्र उपलब्ध करून देण्यात येत आहे. अंशदान देणाऱ्या व्यक्तीस वार्षिक रु. 330 एवढ्या प्रीमियमवर कोणत्याही कारणामुळे होणाऱ्या मृत्यूसाठी सुरक्षा छत्र उपलब्ध करून दिले जाते. हे प्रीमियम योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यातून आपोआप वळते केले जाते. तिचे दर वर्षी नूतनीकरण केले जाऊ शकते. ग्राम स्वराज्य अभियानाच्या दोन्ही टप्प्यांतर्गत प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेत 50.43 लक्ष नवीन लोकांचा विमा करण्यात आला.

• 18 ते 70 वर्षे वय असलेल्या सर्व बँक खातेधारकांना वार्षिक फक्त रु. 12 एवढ्या प्रीमियमवर मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास रु. 2 लक्ष एवढे अपघाती विमा छत्र देऊ करण्यात येते. या




## 63,974 वंचित गावांचा कायापालट

अभियानादरम्यान 84.99 लक्ष नवीन लाभार्थी या योजनेत सामील झाले.

• स्त्रिया व मुलांच्या लसीकरणाशी संबंधित मिशन इंद्रधनुष या महत्वाकांक्षी कार्यक्रमांतर्गत डिसेंबर 2018 पर्यंत 90 टक्के लसीकरणाचे उद्दिष्ट गाठायचे आहे. या योजनेचे उद्दिष्ट आहे प्रतिबंध करता येण्याजोग्या 12 आजारांपासून संरक्षण देण्यासाठी अशा मुलांचे आणि गरोदर स्त्रियांचे लसीकरण करणे ज्यांचे लसीकरण झालेले नाही किंवा फक्त अंशतः लसीकरण झालेले आहे. मिशन इंद्रधनुष अंतर्गत निवडण्यात आलेल्या जिल्ह्यांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली. या अभियानादरम्यान आठवड्यातील सातही दिवशी लसीकरण कार्यक्रम राबविण्यात आले. अभियानाच्या दोन्ही टप्प्यांतर्गत 6.29 लक्ष बाळांना आणि 1.80 लक्ष गरोदर स्त्रियांना लसी टोचण्यात आल्या.

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या गतिशील नेतृत्वात केंद्र सरकारने लोकांच्या जीवनातील अतिशय आवश्यक अशा पैलूंवर लक्ष केंद्रित करत दृढसंकल्प आणि इच्छाशक्तीने काम केले आहे. वरील सातही लोककल्याणाच्या योजनांतर्गत आशेनुरूप तर काही बाबतीत अपेक्षेहून अधिक चांगले परिणाम दिसून आले. खरे पाहता, 'ग्राम स्वराज्य अभियान' आणि 'विस्तारित ग्राम स्वराज्य अभियान' सदर कल्याणकारी योजना लोकांपर्यंत पोचविण्याच्या दिशेने अभूतपूर्व आणि ऐतिहासिक ठरल्या आहेत. या अभियानांमुळे गावे, गरीब लोक, शेतकरी आणि वंचित लोकांना त्यांचा हक्क मिळवून देणे आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात प्रचंड यश मिळाले आहे. देशातील कोट्यवधी गरिबांचे, वंचितांचे जीवन समृद्ध, सुरक्षित, आनंदी व्हावे या उद्देशाने वर्तमान सरकार सतत प्रयत्न करत आहे आणि हे प्रयत्न असेच सुरु राहतील. ♦



## ग्रामीण भारताचा नवोदय

# जीपीडीपीने सोपा केला खडतर मार्ग, सुखी गावाचे स्वप्न झाले साकार





**अमरजीत सिन्हा**
सचिव पंचायती राज मंत्रालय आणि ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार

देशातील अगदी तळाच्या स्तरापासून ते समग्र विकासाच्या उद्देशाने पंचायती राज मंत्रालयाने ग्राम पंचायत विकास योजनेस (जीपीडीपी) प्रारंभ केला. गावांच्या कल्याणाचा उद्देश नजरेपुढे ठेवून राबविण्यात आलेल्या या अभिनव प्रयत्नाची अनेक उद्दिष्टे आहेत, उदा. दारिद्र्याच्या प्रमाणात घट, मानव विकास, सामाजिक विकास, आर्थिक विकास, पर्यावरणाचा विकास, सार्वजनिक सेवा उपलब्ध करून देणे, सुशासन इ. ग्राम पंचायत योजने (जीपीडीपी) चा विचार राष्ट्रीय स्तरावर फेब्रुवारी 2015 मध्ये आला जेव्हा चौदाव्या वित्त आयोगात 2015 ते 2020 पर्यंत रु.2,00,292,20 कोटी (13व्या वित्त आयोगातील रकमेपेक्षा तीन पट जास्त) च्या अनुदानाची तरतूद करण्यात आली. यात या बाबीवर लक्ष केंद्रित करण्यात आले की ग्राम पंचायतींच्या हातांना आर्थिक बळ देण्यात यावे आणि त्यांना या निधीचा वापर करत प्राथमिक सेवा मिळविण्याची परवानगी देण्यात यावी.

नियोजनाचे काम तसे बघायला गेलो तर बऱ्याच अंशी तांत्रिक स्वरूपाचे असते. यासाठी ज्याला ही जबाबदारी सोपविण्यात येते त्याला पूर्ण सहकार्य करणे आवश्यक असते. त्यानुसार, पंचायती राज मंत्रालयाने सर्व संबंधित लोकांना वर्कशॉप व राईटशॉप च्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यासाठी व त्यांची तयारी करवून घेण्यासाठी परस्परांच्या मदतीने प्रयत्न करण्यात यावेत. सुरुवातीस जीपीडीपीची मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात सहाय्यभूत ठरणारे राज्यस्तरीय कोर ग्रुप तयार करण्याची कामगिरी राज्यांना देण्यात आली. जुलै 2015 मध्ये मंत्रालयाने सर्व राज्यांसाठी पाच दिवसांच्या गहन कार्यशाळेचे आयोजन केले. यानंतर मागील तीन वर्षांमध्ये पंचायती राज मंत्रालयाने संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण व अभ्यास कार्यक्रम हाती घेतले. यांचे आयोजन ग्रामीण विकास व पंचायती राज च्या राज्य-स्तरीय संस्थांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. याचे अनेक वर्कशॉप/राईटशॉपसुद्धा आयोजित करण्यात आले आहेत. भारत सरकारने केंद्र व राज्य सरकारांच्या गावांच्या सर्वांगीण विकास व पंचायतींच्या सक्षमीकरणावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम करणाऱ्या सर्व योजना एकमेकांना जोडण्यावर भर दिला आहे. चौदाव्या वित्त आयोगाने (एफएफसी) पंचायत स्तरावर योजना एकमेकांना जोडण्याद्वारे प्रत्येक व्यक्तीपर्यंत प्राथमिक व इतर सेवा पोचविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले आहे. पंचायती राज मंत्रालयाने पंचायतींच्या अधीन असणाऱ्या सर्व स्रोतांना एकत्र करण्याच्या हेतूने विविध राज्यांच्या संबंधित ग्राम पंचायत विकास योजना विकसित करण्यात मदत केली आहे. या स्रोतांमध्ये चौदाव्या वित्त आयोगाचे निधी, मनरेगा निधी, स्वच्छ भारत निधी. चा समावेश आहे. ग्राम

पंचायत विकास योजना संबंधित समूहांसाठी स्थानिक विकासाची उद्दिष्टे ठरवण्यासाठी व विकासासाठी स्थानिक साधने शोधून काढण्याचे मध्यम असतील.

असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही की चौदाव्या वित्त आयोगाचे अनुदान ग्राम पंचायतींसाठी जीवनदायक ऑक्सिजनप्रमाणे असून यामुळे ग्राम पंचायतींमध्ये जणू नवीन जीवन संचारले आहे. केंद्रात वर्तमान सरकारच्या स्वीकृत एफएफसी मधील तरतुदींनुसार 2015-20 या वर्षादरम्यान सुमारे रु. 2,00,292.00 कोटी एवढे अनुदान घटनेच्या अनुच्छेद क्ष्ज्ञ अंतर्गत स्थापन ग्राम पंचायतींना थेट देण्यात येईल. यात 26 राज्यांसाठी रु. 1,80,262.98 कोटी (90%) एवढे प्राथमिक अनुदान आहे, तर रु. 20,029.22 कोटी (10%) एवढे अनुदान कार्याधारित असेल. एफएफसी अनुदान हे तेराव्या वित्त आयोगाच्या तुलनेत तीन पटीहूनही जास्त आहे. या अनुदानाचा उपयोग ग्राम पंचायतींमधील प्राथमिक सोयींमध्ये सुधारणा करण्यासाठी केला जातो. वित्त मंत्रालयाने निधी देऊ करण्यासाठी आणि त्याच्या उपयोगासाठी दिलेल्या सूचनांमध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की एफएफसी अवार्ड अंतर्गत कोणताही खर्च करण्याआधी ग्राम पंचायत विकास योजना तयार करणे आवश्यक आहे. यासाठी, चौदाव्या वित्त आयोगाने ग्राम पंचायत विकास योजनेस सर्वात जास्त महत्त्व दिले आहे. यात आर्थिक सक्षमीकरणावर भर देण्यात आला असून सर्वात खालच्या स्तरावरील नियोजन प्रभावीपणे करण्यावर भर देण्यात आलेला आहे.

यात ग्राम पंचायती स्वतः विकासाच्या पंचवार्षिक योजना व वार्षिक योजना तयार करतील अशी दूरदृष्टी राखण्यात आली आहे. ग्राम पंचायत विकास योजना या नियोजनात सहभागी होणे आणि विविध स्रोत आपसात जोडण्यावर आधारित असतील. जीपीडीपी अंतर्गत 14व वित्त आयोग, राज्य वित्त आयोग, मनरेगा व एनआरएलएम मधून प्राप्त होणारा पैसा आणि मनुष्यबळ एकत्र करण्यात येईल. यात स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण), पंचायत भवन, अंतिम संस्कार करण्याची स्थाने तसेच ग्राम पंचायतीच्या स्वतःच्या प्राप्तीचा समावेश करण्यात आलेला आहे. जीपीडीपीची प्रमुख उद्दिष्टे याप्रमाणे आहेतः

(क) ग्राम पंचायतींच्या संपूर्ण व सर्वांगीण विकास करणे ज्यात फक्त प्राथमिक सुविधा विकसित करणे एवढेच नव्हे तर सामाजिक, आर्थिक व सामुदायिक विकासाचासुद्धा समावेश आहे.

(ख) निर्णय प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करून समुदायास निर्णय घेण्यास सक्षम करणे.

(ग) ग्राम पंचायत स्तरावर गरजा ओळखून परस्पर सहकार्याने योजना तयार करणे व स्रोत एकमेकांशी जोडण्यास प्राथमिकता देणे.

(घ) जीपीडीपीची रूपरेषा तयार करणे आणि तिच्या अंमलबजावणीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कल्याणास प्रथमस्थानी ठेवणे.

या अंतर्गत प्राथमिक सेवा प्रदान करण्यासोबतच उदरनिर्वाहाची साधने, दारिद्र्य निर्मूलन व सामाजिक सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर भर देण्यात येईल.

एफएफसी अवार्डमुळे ग्राम पंचायत स्तरावर समावेशक योजना तयार करण्याची संधी मिळाली असून यांचे नेतृत्वही ग्राम पंचायतींच्या हाती आहे जेणेकरून लोकांपर्यंत प्राथमिक सेवा व अन्य सोयी सुलभपणे पोचविता याव्यात. ग्राम पंचायत विकास योजना संबंधित समुदायांसाठी स्थानिक विकासाची उद्दिष्टे ठरविण्याची आणि विकासासाठी स्थानिक साधने शोधून काढण्याची संधी ठरतील.

पंचायती राज मंत्रालयाने एफएफसी निधी, राज्य अनुदान, स्वतःचे प्राप्ती स्रोत, मनरेगा निधी यांच्यासोबत पंचायतींच्या अधीन असलेल्या सर्व स्रोतांना एकत्रित करण्याच्या उद्देशाने विविध राज्यांमधील संबंधित ग्राम पंचायत विकास योजनांच्या विकासात सहकार्य केले असून क्षमतानिर्मिती वाढविण्याच्या दिशेने प्रयत्न करण्यात येत आहेत. राष्ट्रीय संसाधन समूह स्थापित करण्यात आलेला असून त्याचे उद्दिष्ट राज्यांच्या सहभागी नियोजन कामांमध्ये मदत करणे हे आहे. मंत्रालयाने राज्यांना जीपीडीपी प्रशिक्षणावर संपूर्ण लक्ष केंद्रित करण्याची सूचना दिलेली आहे. यासाठी मंत्रालयाचा असा प्रयत्न आहे की क्लस्टर, ब्लॉक व जिल्हा पातळीवर नियोजन करण्यात सहभागी होण्याशी संबंधित भूमिकेसाठी लोकांमध्ये पोषक वातावरणनिर्मिती करण्यात यावी. सर्व सहभागी राज्यांनी जीपीडीपीसाठी आपापली मार्गदर्शक तत्त्वे तयार केलेली आहेत. या बाबतीत राज्यांचा प्रतिसाद अतिशय सकारात्मक आहे. वाटप निर्देशांकाच्या बाबतीत खालच्या स्तरावरील राज्ये जीपीडीपी तयार करण्यात ग्राम पंचायतींना मदद करण्यास सर्वात जास्त उत्सुक आहेत.



यात आसाम, झारखंड, उत्तराखंड, तेलंगणा, आंध्र प्रदेश, त्रिपुरा, सिक्कीम, मध्य प्रदेश, गोवा, गुजरात इ. चा समावेश आहे. खालच्या स्तरावरील कामे वेगाने करण्यासाठी आणि क्षमतानिर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी केलेली कामे प्रशंसनीय आहेत. असे पाहण्यात आले आहे की खालच्या स्तरावर गावांमधील लोक जरा वेगळा विचार करतात जेणेकरून स्थानिक समस्या आणि वर्षानुवर्षे कायम असलेल्या समस्या लवकर सोडविता याव्यात. कितीतरी ग्राम पंचायतींनी अभिनव उपाय सुचविले आहेत. जीपीडीपीची संकल्पना आणि स्वरूप तयार करण्यामध्ये नवनवीन दृष्टीकोन दिसत आहेत.

2015-16 या वर्षादरम्यान सुमारे 1.32 लक्ष जीपीडीपी तयार करण्यात आल्या, तर 2016-17 या वर्षादरम्यान सुमारे 2.44 लक्ष जीपीडीपी तयार करण्यात आल्या.

2017-18 या वर्षात देशातील विविध भागांमधील ग्राम पंचायतींमध्ये सुमारे 2.42 लक्ष जीपीडीपी तयार करण्यात आल्या. या वर्षी ग्राम पंचायतींना प्रोत्साहन देण्यासाठी ग्राम पंचायत विकास योजना या नावाने एक नवीन पुरस्कार सुरु करण्यात आलेला आहे. पंचाती राज मंत्रालयाने तयार केलेल्या आदर्श मार्गदर्शक तत्त्वांसोबतच राज्य/केंद्रशासित प्रदेशांनी विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वांनुसार आपापली जीपीडीपी तयार केलेली आहे. या वर्षी राष्ट्रीय पंचायती राज दिनप्रसंगी 3 सर्वोत्कृष्ट ग्राम पंचायतींना जीपीडीपी पुरस्कार देण्यात आले. जीपीडीपीमध्ये भागीदारी योजनांमध्ये आपले योगदान देण्याची आणि अगदी खालच्या स्तरावर लोकशाहीस संस्थेचे स्वरूप देण्याची क्षमता आहे. जीपीडीपीला निरंतर विकासाचे उद्दिष्ट गाठण्याचे महत्त्वाचे तंत्र खऱ्या अर्थाने कसे करण्यात यावे ग्राम पंचायतींना स्थानिक शासनातील प्रभावी संस्था होण्यास कशा प्रकारे मदत करता येईल याची चर्चा करून योग्य निष्कर्षावर पोचण्याची हीच योग्य वेळ आहे. यासोबतच योजना, अधिकार आणि बाह्य वाटपाच्या पुढील बाबींवर विचार करून त्यावर काम करण्यात यावे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण ग्राम पंचायतींचे वर्तमान स्वरूप बदलण्यावर आणि क्षमतानिर्मितीवर लक्ष केंद्रित करण्यात यावे. सामाजिक-आर्थिक विकासासोबत सांस्कृतिक मूल्यांना (वारसा, वैविध्य, रचनात्मक व ज्ञान) प्रोत्साहन देण्यात स्थानिक हितधारक निरंतर व समावेशक विकासाचे वाहक म्हणून महत्त्वाची भूमिका वठवतात. ही उद्दिष्टे गाठण्यासाठी आणि स्थानिक संस्था, नागरिक समाज संघटना, खाजगी क्षेत्रे, शैक्षणिक संस्था व इतर संबंधित हितधारकांमधील भागीदारी व जबाबदारीस प्रोत्साहन देण्याचा सर्वसमावेशक विकास योजना हा उत्तम पर्याय आहे.

परिणामी, ग्राम पंचायतीद्वारे व्यापक व प्रभावी जीपीडीपीच्या निर्मितीसाठी मिळालेला निधी प्रत्येक पंचायतीच्या अधिकारक्षेत्रात खर्च करणे आणि त्यांच्या कामाशी संबंधित माहिती सर्वांसाठी खुली करण्याद्वारे प्रत्येक पंचातीपर्यंत पोचेल अशी व्यवस्था करणे आवशयक आहे. या दृष्टीने असे सुचवण्यात येते की विविध मंत्रालयांद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजनांतर्गत देऊ करण्यात येणारा निधी संबंधित राज्यांच्या विभागांशी सल्ला-मसलत करून वेगवेगळ्या ग्राम पंचायतींना देण्यात यावा आणि याची माहित संबंधित ग्राम पंचायतींना देण्यात यावी. ग्राम पंचायतींनीसुद्धा विशिष्ट योजनांसाठी आपले समर्थन दर्शविण्यासाठी विशिष्ट कामांच्या संदर्भात मोठ्या प्रमाणावर संवेदनशील असणे गरजेचे आहे. पंचायत राज प्रणाली तीन पातळ्यांवर निवडण्यात आलेल्या 31 लक्षहून अधिक प्रतिनिधींसह लोक-केंदित विकासाचे नेतृत्व करत आहे. भारतात जागतिक स्तरावर सर्वाधिक म्हणजे 14 लक्ष महिला प्रतिनिधी आहेत. जीपीडीपीच्या प्रक्रियेत सुशासनाद्वारे लिंगभेदावर अंकुश येईल. यामुळे पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि समान नागरिक म्हणून महिलांच्या अधिकारांना चालना मिळेल. सार्वजनिक सेवांची कुशलता आणि दक्षता वाढेल आणि 2030 पर्यंत जागतिक एसडीजी अजेंडा प्राप्त करण्यासाठी संस्थागत, व्यक्तिगत आणि संचालन क्षमतांची निर्मिती होऊ शकेल. यावर लक्ष देणे आवश्यक आहे की लिंगाधारित योजना आणि लैंगिक विश्लेषण याकडे वेगळे काम म्हणून न पाहता नियमित जीपीडीपी योजना प्रक्रियेचा एक भाग बनविणे आवश्यक आहे. जीपीडीपी, शासकीय योजना व मुख्य कार्यक्रम, पंचायत प्रक्रिया व स्रोत आणि उत्तरदायित्वाच्या उपायांबद्दल लोकांना जागरूक करण्यासाठी वंचित समुदाय आणि महिलांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. राज्यांनी बजेट, योजना तयार करणे, त्यांची अंमलबजावणी आणि जीपीडीपीवर नजर ठेवण्यासाठी महिलांना सक्रियपणे सहभागी करून घेणे आवश्यक आहे.



मोठ्या स्तरावर जीपीडीपी तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी तसेच ग्रामीण भारतात बदलाची क्रांती घडवून आणण्यासाठी भारत सरकारचे पंचायती राज मंत्रालय 2 ऑक्टोबर ते 31 डिसेंबर, 2018 पर्यंत तसबकी योजना सबका विकासस हे अभियान राबविणार आहे. या कालावधीत प्रत्येक पंचायत विस्तृत जीपीडीपी तयार करेल. सहाव्या अनुसूचित क्षेत्रांमध्ये ग्राम विकास योजना संबंधित ग्राम परिषदा किंवा प्राधिकरणे तयार करतील. या योजनेत संबंधित मंत्रालये व विभागांच्या स्रोतांच्या मदतीने पंचायतीच्या विकासविषयक गरजा समाविष्ट करण्यात येतील. जीपीडीपी अभियान ग्राम सभांचे नेतृत्व करणाऱ्या 31 लक्ष निवडून आलेल्या प्रतिनिधींवर तर लक्ष केंद्रित करेलच, शिवाय त्यांना दीनदयाल अंत्योदय योजना एनआरएलएम अंतर्गत जीपीडीपीच्या माध्यमातून गावांच्या विकास योजनेची रूपरेषा तयार करण्यासाठी आणि तिच्या अंमलबजावणीसाठी सुमारे 5.25 कोटी महिला स्वयंसहायता समूहांचे समर्थन मिळवून देण्यासही मदत करेल. ♦

# गावाचा विकास, सरकारचा संकल्प - पंतप्रधान

## राष्ट्रीय पंचायती राज दिवस, 24 एप्रिल, 2018






24 एप्रिल, 2018 रोजी पंचायती राज दिवस साजरा करण्यात आला. यावेळी पंतप्रधानांनी राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाचा प्रारंभ केला. त्यांनी देशातील 2.5 लाख पंचायतींना सलाम केला आणि आपल्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की हा आदरणीय बापू यांच्या स्वप्नांचा अनुभव करण्यांचा महत्वपूर्ण क्षण होता कारण महात्मा गांधी यांनी भारताची ओळख गाव आहे असे मत मांडले होते. यावेळी सर्वश्रेष्ठ पंचायत पुरस्कार योजने अंतर्गत राष्ट्रीय ई-पंचायत पुरस्कार आणि ग्राम पंचायत विकास पुरस्कार योजनेच्या विजेत्यांना सुद्धा पुरस्कृत करण्यात आले.

या वर्षी राष्ट्रीय पंचायती राज दिनाच्या निमित्ताने, माननीय पंतप्रधानांनी राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान (आरजीएसए) च्या पुनर्गठित योजने बरोबरच स्थानिक सरकार निर्देशिका (एनजीडी) ची सुरूवात करण्यात आली. पंतप्रधानांनी ई-पंचायत पुरस्कार आणि ग्राम पंचायतींच्या संदर्भात उत्कृष्ट प्रदर्शन करणा-या राज्यांना जीपीडीपी पुरस्कार प्रदान करण्यात आला. माननीय पंतप्रधानांनी जन समूहाबरोबर देशभरातील ग्राम सभांनांही संबोधित केले.

पश्चिम बंगाल, कर्नाटक आणि सिक्किम येथील एक-एका ग्राम पंचायतींना जीपीडीपी पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रभावी ग्राम सभांच्या माध्यमातून गावाच्या सामाजिक आणि आर्थिक संरचनेत सुधारणा करण्यासाठी उत्कृष्ट प्रदर्शन करणा-या 21 ग्राम पंचायतींना नानाजी देशमुख राष्ट्रीय गौरव ग्राम सभा पुरस्कार (एनडीआरजीजीएसपी) देऊन सन्मानित करण्यात आले. सामान्य आणि नऊ थीम आधारित श्रेणी, जसे , स्वच्छता, नागरिक सेवा (पेय जल, स्ट्रीट लाइट, आधारभूत संरचना), नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, उपेक्षित वर्ग (महिला, एससी/एसटी, दिव्यांग, वयोवृद्ध) यांची सेवा, सामाजिक क्षेत्रात प्रदर्शन, आपत्ती व्यवस्थापन, ग्राम पंचायतींना समर्थन देण्याकरिता स्वैच्छिक भूमिका पार पाडणा-या सीबीओ/एकल व्यक्ती, राजस्व निर्मितीत नवीनीकरण आणि ई-शासनाच्या क्षेत्रात सेवा व नागरिक सुविधा उपलब्ध करण्यात सर्वोत्तम प्रदर्शन करणा-या 191 पंचायतींना (जिल्हा, माध्यमिक व ग्राम पंचायत) यांना दीन दयाल उपाध्याय पंचायत सशक्तिकरण पुरस्कार (डीडीयूपीएसपी) सुद्धा प्रदान करण्यात आला. पंचायती राज दिनानिमित्त दिलेल्या त्यांच्या भाषणातील काही महत्वाचे अंश खालील प्रकारे आहेत:

**महात्मा गांधींनी 'ग्रामोदयातून राष्ट्रोदय' हे स्वप्न साकार करण्याकरिता आम्हाला प्रोत्साहित केले होते. भारत सरकार त्या लोकांना आपलया गावांचा विकास, आपल्या गावातील लोकांना सशक्त करणे आणि संकल्पांना पूर्ण करण्यामध्ये सहकार्य करील.**

- पंचायती राज दिवस संकल्पांचा स्वीकार करण्याचा दिवस असला पाहिजे. आम्हाला सरकार बनविण्याकरिता लोकांची सेवा करण्याकरिता निवडून दिले आहे. म्हणून जर आमची ताकद आणि आमचा वेळी याच कार्याकरिता असेल तर आम्ही लोक गावांचा चेहरामोहरा बदलू शकतो.
- आज आमची चिंता निर्धारित वेळेतच वास्तविक लाभार्थ्यांकरिता पैशाचा योग्य उपयोग करण्याच्या पेक्षा अधिक आहे. गावात कोणतेही कुटुंब असे असू नये ज्यांचे एक जन धन बँक खाते आणि किमान 90 पैशात विमा काढलेला नाही. जर एखादे कुटुंब दुर्दैवी घटनेचा सामना करत असेल तर त्यांना रु. 2 लाखाची एक वित्तीय मदत उपलब्ध होईल.
- आम्हा सर्व लोकांमध्ये देशाला बदलण्याकरिता गावांना बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आम्हा सर्वांना गावातील निधी (फंड) योग्य प्रकारे वापरला पाहिजे. मला वाटते की आम्ही सर्व गावांमध्ये 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान' या मंत्रासोबत पुढे गेले पाहिजे. ♦



# ग्राम पंचायतींच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे सशक्तीकरण

## ग्रामीण महिलांच्या स्थितीवर एक नजर

**द्वग्रामीण उपजीविकेचे महिलाः** पुरुष या आधारे वर्गीकरणः राष्ट्रीय आजीविका मिशनच्या लिंगाधारित अंमलबजावणीस समर्थनन या शीर्षकांतर्गत जारी करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्र महिला अहवालानुसार भारतातील 79 टक्के ग्रामीण महिला शेतीकाम करतात. पुरुषांच्या तुलनेत त्यांना 50 ते 75 टक्के मजूरीच मिळते. फक्त 9 टक्के महिलांकडे खाजगी मालमत्ता आहे. यामुळे फार कमी महिला संस्थागत कर्जे घेऊ शकतात कारण बऱ्याच जणींकडे जमीन किंवा इतर उत्पादक मालमत्ता नाहीत. 80 टक्के ग्रामीण महिला शेतीत मजुरी करून राबणाऱ्या अनुसूचित जाती व जमाती आणि मागास वर्गांमधील आहेत. भारतातील ग्रामीण महिला फारच कमी मजुरी असलेली कामे करत आहेत आणि समान मजुरी, काम करण्यासाठी चांगले वातावरण आणि समान संधी त्यांना मिळत नाहीत. ग्रामीण भारतातील



शेतीत राबणाऱ्या मजुरांमध्ये आणि शेतकऱ्यांमध्ये महिलांची संख्या जास्त असली तरीही राखणदारीसारख्या प्राथमिक कामासाठी त्यांना कोणतेही पारिश्रमिक न घेताच काम करावे लागते आणि यामुळे त्या देशातील ओळख नसलेल्या मनुष्यबळाचा भाग ठरतात. लैंगिक समानता निर्देशांकामध्ये भारताचे स्थान जगातील 188 देशांमध्ये 125वे आहे आणि हे स्थान सर्वात खालच्या पायऱ्यांवर असलेल्या देशांपैकी एक आहे. भारत सरकार ग्रामीण महिलांची कमकुवत स्थिती, दारिद्र्य आणि त्यांच्यासाठी सामाजिक अन्यायावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करत आहे. सरकारद्वारे ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी आणि त्यांचा विकास व्हावा यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आणि केंद्राद्वारे पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. यात बेटी बचाव, बेटी पढाओ, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, महिला शक्ती केंद्र, उज्ज्वला, एमजीनरेगा, आयसीडीएस, मध्यान्ह भोजन योजना आणि इतर योजनांचा समावेश आहे. 73व्या घटनादुरुस्ती (अनुच्छेद 243 डी) च्या माध्यमातून पंचायती राज संस्थांमध्ये (पीआरआय) महिलांसाठी एक तृतीयांश आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यात अनुसूचित जाती व जमातींसाठी आरक्षित आसनांचा समावेश आहे. सध्या 20 राज्यांनी पंचायती राज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षणाची व्यवस्था केलेली आहे. पंचायती राज्य संस्थांच्या विविध स्तरांवर 15 लक्ष हून अधिक महिला निवडून आलेल्या आहेत. ही संख्या स्थानिक संस्थांमधील महिलांच्या प्रतिनिधित्वाच्या बाबतीत जगात सर्वाधिक आहे. पंचायती राज मंत्रालयाकडे उपलब्ध आकडेवारीनुसार 1 जानेवारी 2018 पर्यंत पंचायती राज्य संस्थांमधील निवडून आलेल्या एकूण 31,00,804 प्रतिनिधींपैकी 14,26,000 महिला आहेत आणि ही टक्केवारी एकूण प्रतिनिधींच्या संखेच्या 46 टक्के एवढी आहे. देशात 1,05,676 महिला सरपंच आहेत. राजनैतिक प्रतिनिधित्व आणि सहभागितेच्या माध्यमातून महिला सशक्तीकरणाच्या हा आलेख प्रशंसनीय असला तरीही ग्रामीण भागातील महिला अजूनही आव्हानांशी लढत आहेत. पंचायती राज संस्थांमधील महिलांचे प्रतिनिधित्व पुरेसे असले तरीही (एक तृतीयांश आरक्षणाच्या नियमानुसार) स्थानिक शासनात महिलांचा सहभाग पुरेसा नाही.

विशेष अध्ययन करणाऱ्या संस्था, नागरिक समाज, आंतरराष्ट्रीय एजेन्सी, बिगरउसरकारी संघटना तसेच खालच्या पातळीवर काम करणाऱ्या लोकांनी केलेल्या संशोधनावरून आणि अभ्यासावरून ग्रामीण भागातील महिला पुढारी आणि निवडून आलेल्या पंचायत प्रतिनिधींच्या मुख्य अडचणी आणि त्यांच्यापुढे असलेल्या अडथळ्यांची माहिती मिळते. यापैकी काही म्हणजे पितृसत्ताक आणि पुरुषवादी मानसिकता आणि लैंगिक भेदभावामुळे निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींसाठी आपल्या

सहेतुक भागीदारीसह आपली जबाबदारी पार पडणे कठीण होऊन बसते. याशिवाय, सार्वजनिक कामे करत असताना मदत-समरथन न मिळणे आणि निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींबद्दल राज्य-संस्थेच्या अधिकाऱ्यांची नकारात्मक विचारसरणी, दृष्टीकोन आणि उपेक्षेचासुध्दा विपरीत परिणाम होतो. सामाजिकरणाची प्रक्रिया, शिक्षण व तांत्रिक माहिती त्यांच्यापर्यंत पोचत नसल्याने ग्राम पंचायतीसाठी योजना तयार करण्याची प्रक्रिया, स्रोतांचे वाटप, योजनांची अंमलबजावणी आणि त्यांच्यावर देखरेख ठेवण्याशी संबंधित माहितीवर याचा परिणाम होतो. या कारणांमुळे समाजात त्यांच्याप्रती हीनतेची भावना निर्माण होते आणि महिला प्रमुखांवर वाईट पुढारी असल्याची मोहर उमटते. गावांमध्ये महिला प्रतिनिधींना घरादाराच्या सर्व जबाबदाऱ्यासह जाती, ओळख, शक्ती व गावाच्या रचनेतच विहित असमानता यांसारख्या आव्हानांशी लढावे लागते. खालच्या स्तरातून प्राप्त होणाऱ्या पुराव्यांवरून हे स्पष्ट होते की जास्तीत जास्त महिला पंचायत प्रतिनिधी सार्थ स्वरुपात सहभागी होऊ शकत नाहीत. या सर्व बाबी स्थानिक संस्थांमध्ये महिलांच्या सहभागासाठी अनुकूल आणि योग्य स्थिती निर्माण करण्याच्या मार्गातील मुख्य अडसर आहेत (आयसीआरडब्ल्यू, यूएन वूमेन, एनए). ग्रामीण महिलांवर विपरीत परिणाम करणाऱ्या मुद्द्यांचा परीघ फार मोठा असल्याने ग्रामीण महिलांचा राजकरणातील सहभाग आणि आर्थिक विकासाशी संबंधित मुद्दे कसे सोडविता येतील यावर पुढील अंकात प्रकाश टाकण्यात येईल. या चर्चेचा मुख्य उद्देश ग्रामीण महिलांना अधिकाधिक सशक्त करण्यासाठी योजना आखणे आणि सध्या उपलब्ध असलेल्या मंचाचा वापर प्रभावीपणे करणे हा आहे.

## ग्रामीण महिलांच्या सशक्तीकरणा साठी एक मंच म्हणून जीपी

पीआरआयकडे आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय करण्यात येईल याची काळजी घेण्याचा घटनादत्त अधिकार असतो. पंचायतींना शक्तीचे हस्तांतरण करण्यावर घटनेच्या अनुच्छेद 243जी, भाग 9 ने राज्यांना पंचायतींना स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून कुशलतेने काम करण्यासाठी स्वायत्तता, शक्ती आणि अधिकार देण्याचा आदेश देण्यात आलेला आहे. या घटनात्मक आदेशासह भारतात पंचायतींना गावांच्या विकासासाठी वापरण्यासाठी राज्य वित्त अनुदान, चौदावा वित्त आयोग, सरकारी फ्लॅगशिप योजना व कार्यक्रम आणि स्वतःच्या स्रोतांकडून प्राप्त महसुलांतर्गत स्वतःचा निधी असतो. पीआरआयसुद्धा स्थानिक संस्था असून ती केंद्र व राज्य सरकारांसाठी भागीदारी योजना, स्रोतांचे वाटप, अंमलबजावणी आणि देखरेखीच्या कामांसाठी आणि शासकीय योजनांसाठी जबाबदार आहे. यामुळे पंचायती लैंगिकदृष्ट्या जबाबदार प्रशासनाच्या अंमलबजावणीसाठी एक महत्त्वाचे मंच ठरते. महत्त्वाची बाब म्हणजे गावे अशा स्थितीत आहेत जेथे पीआरआयच्या



सक्रीय भूमिकेसह एसडीजीचे स्थानिकीकरण व वास्तविकीकरण होऊ शकते. येथे कितीतरी असे कारक आहेत ज्यामुळे ग्रामीण महिलांच्या सशक्तीकरणासाठी ग्राम पंचायती एक स्थानिक मंच ठरतात. ग्राम सभा, महिलांच्या सामूहिक (एसएचजी, संघ, देखरेख समित्या) आणि तृणमूल संघटनांमध्ये महिलांचा सहभाग अधिक मजबूत करण्यासोबतच ईडब्ल्यूआरचे समर्थन व क्षमतानिर्मिती, संभावित महिला उमेदवार व निवडणुकीसाठी पुन्हा उभ्या राहू इच्छिणाऱ्या महिलांना कार्यक्रमांच्या निर्मितीसाठी आणि अंमलबजावणीसाठी प्रोत्साहन व समावेशाची आवश्यकता असते. ग्राम पंचायतींनी लैंगिक समानता आणि सशक्तीकरणासाठी लागू योजना व कार्यक्रमांचा समावेश करणे आवश्यक आहे. असमानतेत घट व्हावी यासाठी पंचायतींच्या सर्व कामांच्या व कार्यक्रमांचे लैंगिक विश्लेषणाची गरज आहे. पंचायत स्तरावरील कामांची आणि कार्यक्रमांची आकडेवारी एकत्र करण्यासाठी सतत प्रयत्न करत राहण्याची गरज आहे.



आणखी एका प्रक्रियेचा योजनात्मक पद्धतीने वापर करण्याची गरज असून ती प्रक्रिया आहे ग्राम पंचायत विकास योजना (जीपीडीपी) आणि हा ग्राम पंचायतीद्वारे एकीकृत विकेंद्रीकृत योजनेचा परिपाक आहे. जीपीडीपीसाठी असणारा लैंगिक दृष्टीकोन स्थानिक प्रशासनात ग्रामीण महिलांचा सार्थ सहभाग आणि संस्थात्मक कर्ज, बाजार व निरंतर उपजीविका प्रणालीपर्यंत ग्रामीण महिला अधिकाधिक प्रमाणात पोचाव्यात यासाठी उपयुक्त आहे. जीपीडीपीमध्ये लिंग

एकीकरण एक स्वतंत्र किंवा सामानांतर प्रक्रिया नसून यामुळे प्रचलित जीपीडीपी प्रक्रिया लिंगांना खरतर मुख्य प्रवाहात येतात. एक लिंग संवेदनशील जीपीडीपी याकडे लक्ष देईल की पुरुष व महिलांची सामाजिक, धार्मिक आणि सांकृतिक भेदामुळे स्रोतांपर्यंत पोचण्याची क्षमता वेगवेगळी असते आणि योजना प्रक्रियेस गावातील समुदायांच्या विविध वर्गांच्या वेगवेगळ्या गरजांकडे लक्ष देण्याची आणि त्यांच्यावर आपली प्रतिक्रिया देण्याची आवश्यकता असते. योजना व बजेटशी संबंधित कामे पुरुष व महिलांच्या वेगवेगळ्या गरजांशी जोडणे आवश्यक आहे आणि लैंगिक असमानतेचा सामना करण्यासाठी त्यानुसार विविध कामे सामील करून घेणे आवश्यक आहे. जीपीडीपी प्रक्रियांमध्ये लिंग एकीकरणास तत्काळ जीपीडीपी योजना, बजेट, अंमलबजावणी आणि देखरेख व विकास कार्यक्रम व योजनांमध्ये ग्रामीण महिलांना सामील करून घेणे गरजेचे आहे. एमआयएस, बजेट, सहभागिता, ग्रामीण तंत्र व विकासशील लैंगिक क्रिया योजना, योग्यपणे व्याख्या केलेले संवेदनशील संकेतक आणि जीपीडीपीसाठी असणारी चेकलिस्ट जीपीडीपी विकसित करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाउल ठरेल. याचा परिणाम ग्राम पंचायतीमध्ये दिसून येईल ल ग्रामीण महिलांना महत्त्वाचे प्रश्न विचारण्याची संधी देणारे आणि त्यांना पंचायतीच्या कामांमध्ये व कार्यक्रमांमध्ये भाग घेऊ शकतील असे वातावरण मिळण्यात होईल. ग्रामीण महिला कमकुवत असण्याचा आणि मुख्य प्रवाहात नसण्याचा मुद्दा अतिशय गुंतागुंतीचा असून बहु-क्षेत्रीय लैंगिक जबाबदारीच्या दृष्टीकोनाची यासाठी गरज आहे. यासाठी कल्पना व संभाव्य उत्तरांपेक्षा जास्त गरज ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणाच्या दिशेने पुढे काम करण्यासाठी या क्षेत्रातील नीती आणि संशोधनाच्या परिघात राहून अधिक समर्थन मिळवण्याची गरज आहे.



ग्राम पंचायतींमध्ये महिलांवर लादण्यात आलेली ऐतिहासिक बंधने तोडणारे, महिलांना केवळ घरगुती कामे करणारी व्यक्ती म्हणून पाहणाऱ्या पारंपारिक मापदंडांना आव्हान देण्यासाठी एक प्रभावी मंच होण्याची शक्यता असते. पीआरआय कर्मचाऱ्यांना ग्राम पंचायतींच्या प्रयत्नांच्या संदर्भात संशोधन, नीती आणि शासकीय संस्थांच्या सहयोगाची गरज असते.

नैतिक स्तरावर सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या पीआरआयमध्ये महिलांसाठी 50 टक्के आरक्षणासाठी क्षमता-निर्मितीसाठी अधिकाधिक निधी वाटप, एक्सपोजर दौरे व ईडब्ल्यूआरचे प्रशिक्षण, शासकीय संस्थांमध्ये जेन्डर बजेट सेलचे अनुपालन आणि सार्वजनिक संस्थांच्या लैंगिक लेखापरीक्षणावर लक्ष देण्याची गरज आहे. सरकार आपल्या योजना, बजेटविषयक काम व कार्यक्रमांची अंमलबजावणी आणि जबाबदारीच्या तंत्रांतर्गत लैंगिक उत्तरदायी उपाययोजना करू शकते. संशोधन या क्षेत्रातही हस्तक्षेप करणे आवश्यक आहे जेथे महिलांना सामाजिक न्याय व विकास या क्षेत्रांमध्ये योग्य भागीदारी मिळणे आवश्यक आहे. सरकारी संस्थांना त्यांची कामे व हस्तक्षेपांमध्ये एकीकृत लैंगिक दृष्टीकोनाच्या एकीकरणासाठी शासकीय विभाग व पीआरआयच्या क्षमतेत वाढ करण्याचा रस्ता मोकळा करण्याची गरज आहे. महिलांना भागीदारी मिळत आहे यावर देखरेख करण्यासाठी तसेच विकेंद्रीकरण व उत्तरदायित्वाच्या उपायांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचे संस्थाकरण करणे गरजेचे आहे. एक विकसित व सामाजिकदृष्ट्या विकसित समाज फक्त महिलांची सक्रीय भागीदारी व योगदानाच्या माध्यमातूनच निर्माण होऊ शकतो आणि हे विशेषत्वाने भारतासाठी योग्य आहे जेथे ग्रामीण भागातील लोकसंख्येत महिलांचा वाटा 48 टक्क्यांहून अधिक आहे. ग्राम पंचायती सामाजिक न्याय व आर्थिक विकासाचे घटनात्मक उद्दिष्ट ग्रामीण महिलांना सार्थक पद्धतीने सहभागी करून घेऊनच साध्य करू शकतात. ♦



Reference: Aajeevika & UN Women. (2014). Engendering Rural Livelihoods: Supporting Gender Responsive Implementation of the National Rural livelihoods Mission. Accessed on 5 April 2018. Retrieved from http://aajeevika.gov.in/sites/default/files/nrlp_repository/Engendering-Rural-Livelihoods-Final.pdf
Bhattacharyya, A. (undated). Rural Women in India: The Invisible Lifeline of RuralCommunity.

**निष्ठा सत्यम**
डेप्युटी कंट्री रिप्रेझेंटेटिव्ह
यू.एन.वूमेन इंडिया (एम.सी.ओ)
**शाश्वती सिन्हा**
प्रोग्राम ॲनलिस्ट ट यूएन वूमेन

# कोवई ग्राम पंचायत झाली स्वतःच्या स्त्रोतांवर आत्मनिर्भर

## गावातील पार्क, तलाव व दुकानांच्या योगे तयार केलेले रेव्हेन्यू मॉडेल



आर्थिक बाबतीत आत्मनिर्भर होणे जसे लोकांसाठी आवश्यक आहे तसेच ते गावाच्या पंचायतीसाठीसुद्धा आवश्यक आहे. यामुळेच गावाची प्रगती होते. या शृंखलेत सर्वात प्रथम गरज असते ती गावात उपलब्ध कमाईचे स्त्रोत ओळखण्याची आणि त्यानंतर त्या स्त्रोतांचा योग्य वापर करून रेव्हेन्यू मॉडेल तयार केले जाऊ शकते. या प्रकारच्या यशस्वी मॉडेलचे एक चांगले उदाहरण त्रिपुरामधील कोवई पंचायत समितीने प्रस्तुत केले आहे. कोवई गावाच्या पंचायतीने स्वतःस आत्मनिर्भर करण्यासाठी उपलब्ध स्त्रोत कोणते आहेत याचा शोध घेतला आणि ते विकसित केले. यामुळेच निरंतर सुशासनाचे एक उदाहरण म्हणून कोवई गावाने आपली ओळख निर्माण केली आहे. पंचायतीने पार्क, मत्स्यपालन, समाज भवन, आमराई यांसारख्या स्त्रोतांना उत्पन्नाचे साधन म्हणून विकसित केले. कोवईच्या बनबिथी इको पार्कमध्ये लोक दूरदुरून सहलीसाठी येतात. पंचायतीने या पार्कचे सौंदर्यीकरण करून ते प्रेक्षणीय स्थळ म्हणून विकसित केले. या पार्कमधील दोन विशेष स्थाने पाहायला बरेच लोक येतात. पंचायतीने ठरवले की या दोन ठिकाणी प्रवेशासाठी शुल्क आकारण्यात यावे. पार्कमध्ये प्रवेशासाठी प्रति व्यक्ती रु. 10 एवढे शुल्क आकारण्यात येते. पार्कमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या करमणुकीच्या विशेष कार्यक्रमांसाठी रु. 500 चे तिकीट ठेवण्यात येते. या दोन्ही उपायांमुळे पंचायतीस बरेच उत्पन्न होत आहे. गावात मत्स्य-पालनाचा व्यवसाय प्रचलित आहे. बरेच लोक या व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळवत आहेत. कोवई ग्राम पंचायतीकडे तीन तलाव आहेत. पंचायतीने हे तिन्ही तलाव स्थानिक लोकांना भाडेपट्टीवर देऊन उत्पन्नाचे स्रोत निर्माण केले. या तलावांपासून मिळणारे प्रत्येकी रु. 55,000, रु. 52,000 व रु. 30,000 एवढे समाधानकारक मिळत आहे. याशिवाय सामुहिक कार्यक्रमांसाठी बांधण्यात आलेल्या समाज भवनाचा उपयोगही उत्पन्नाचा स्रोत म्हणून करण्यात येत आहे. येथे आयोजित होणाऱ्या जत्रा, सण-समारंभ इ. मध्ये सहभागी होण्यासाठी रु. 500 एवढ्या वर्गणीची तरतूद करण्यात आली आहे. सामूहिक सहभागातून या कार्यक्रमांमधून चांगले उत्पन्न मिळत आहे. याशिवाय सदर ग्राम पंचायतीकडे 12 दुकाने आहेत. ही दुकाने पंचायतीने भाड्याने दिली असून त्यातून प्रत्येक दुकानामागे रु. 2000 एवढे मासिक उत्पन्न मिळते. ग्राम पंचायतीच्या उत्पन्नाचे आणखी एक साधन म्हणजे येथील आमराया. या आमरायासुद्धा चांगले उत्पन्न मिळवून देतात. 2015-16 या वर्षात पंचायतीस 10 लक्ष रुपयांचे उत्पन्न मिळाले.

याप्रकारे ग्राम पंचायतीने स्वतःला तर आत्मनिर्भर केलेच, शिवाय स्थानिक लोकांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. काही वर्षातच कोवई ग्राम पंचायत समितीने आपले असे एक यशस्वी आर्थिक मॉडेल तयार केले आहे. केंद्र सरकार व प्रादेशिक सरकारच्या विकास योजनांच्या साहाय्याने गावात अनेक विकास कामे करण्यात आली. आता गाव आपल्या पायांवर उभे असून इतर गावांनाही आत्मनिर्भर होण्याची प्रेरणा देत आहे.♦

# वेळेवर परतफेड करण्याचे महत्त्व स्पष्ट करण्यात आ

## 100 टक्के परतफेड करत एलकेपी वंदलावुरू झाले आत्मनिर्भर

कोणत्याही भागाच्या विकासात निधीच्या उपलब्धतेची महत्त्वाची भूमिका असते. निधीशिवाय विकास अशक्य आहे. हे सत्य नजरेपुढे ठेवत आंध्र प्रदेशातील चित्तूर जिल्ह्यामधील एलकेपी वंदलावुरू ग्राम पंचायतीने सर्वप्रथम आपल्या उत्पन्नाच्या स्रोतांची तपासणी केली. शासनाकडून मिळणाऱ्या मदतीची वाट पाहण्याऐवजी स्वतःस आत्मनिर्भर करण्याच्या दिशेने प्रयत्न केले. गावात उपलब्ध स्रोत शोधून काढले. योजना तयार केल्या आणि गावास स्वावलंबनाच्या मार्गावर नेले.

**परिणाम** - पंचायतीने केलेले अथक प्रयत्न व मेहनतीमुळे गाव आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर झाले. गावाने आपले महसूल मॉडेल तयार केले, स्थानिक स्रोत शोधून काढले जेणेकरून विकासकामे करणे शक्य होईल. यासोबतच गावात रोजगाराच्या संधीही उपलब्ध झाल्या.

**हे कसे साध्य झाले** - महसुलाच्या स्रोतांमध्ये गावातील नैसर्गिक स्रोत, सामान्य कामाचा निधी, पिण्याच्या पाण्याचा कर, गल्ल्यांमधील पथदिव्यांचा कर, स्वच्छतेसाठी असलेला विशेष निधी, राज्याकडून येणारी ग्रांट, केंद्र व राज्य सरकारद्वारे संचालित विकास योजनांतर्गत निर्धारित फंड आणि बँकेत जमा असलेल्या रकमेवरील व्याजाचा समावेश आहे. या सर्व स्रोतांमधून गावात निधी उपलब्ध झाला. गावाच्या स्थानिक स्रोतांमध्ये गृह कर, व्यावसायिक कर, बांधकाम परवानगी शुल्क, वीज कर, पाणी कर, कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी आकारण्यात येणारा कर, परवाना शुल्क इ. ने महत्त्वाची भूमिका वठवली. गावातील लोकांना करांचा भरणा वेळेवर करण्याचे आवाहन करण्यात आले. कर भरणा सुलभ व्हावा यासाठी ग्राम पंचायतीने डिजिटल मध्यम सुरु केले. या सर्व



प्रयत्नांना फळ आले आणि ग्राम पंचायतीस करांमधून मिळणाऱ्या उत्पन्नात तीन पट वाढ झाली. 2014-15 या वर्षामध्ये पंचायतीचे उत्पन्न 13,602 एवढे होते, ते 2015-16 मध्ये वाढून 42000 झाले. आता येथील 100 टक्के लोक कर भारतात. याशिवाय गावात स्वच्छतेकडेही लक्ष देण्यात आले आहे. ग्राम पंचायत विकास योजने (जीपीडीपी) अंतर्गत देण्यात आलेल्या फंडाचा उपयोग करत गावात पथदिवे, रस्ते आणि बांधकाम करण्यात आले.♦

# ई-गव्हर्नंसमुळे केदारवाला ग्राम पंचायतीने धरला विकासाचा वेग

एकत्रित प्रयत्नांनी काम सुलभ तर होतेच शिवाय ते यशस्वी होईल याची शाश्वतीसुद्धा मिळते. अशा वेळी उद्दिष्ट कितीही कठीण असले तरी ते गाठता येते. याचप्रमाणे स्रोतांचा वापर मिळून-मिसळून केल्याने प्रगतीशील समाजाचे स्वप्न साकार होऊ शकते. नवीन युगाच्या तंत्रज्ञानास आपलेसे केल्यास वेगाने विकास होऊ शकतो. उत्तराखंडमधील केदारवाला ग्राम पंचायतीने ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून गावातील लोकांचे जीवन सोपे केले आहे. इंटरनेट नावाच्या खिडकीच्या योगे गावास जगाशी जोडण्याच्या प्रयत्नांना फळ येऊ लागले. ग्राम पंचायतीने स्वतःस तांत्रिकदृष्ट्या सक्षम केले आणि शासकीय योजना इंटरनेटच्या माध्यमातून लोकांपर्यंत घेऊन गेली. ग्राम पंचायतीने आत www.kedarwala.grampanchayat.org ही वेबसाईट आणि फेसबुक पेजदेखील तयार केले आहे. ग्राम पंचायतीने बेरोजगार तरुणांना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करण्यास सुरुवात केली. स्वच्छ भारत अभियानांतर्गत देखील ग्राम पंचायतीने कितीतरी उपयुक्त पावले उचलण्यात आली आहेत. स्वच्छतेचे महत्त्व विशद करण्यासाठी वाद-विवाद स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धा जागरूकतेच्या संदर्भात फार उपयोगी ठरल्या. ही सर्व पावले उचलल्याने गावास लवकरच हागणदारीमुक्त घोषित करण्यात येईल. या सर्वांमध्ये गावाची प्रमुख अडचण आहे ती पिण्याच्या पाण्याची. पाण्यासाठी स्त्रियांना कितीतरी तास पायपीट करावी लागते. या समस्येचे गंभीर स्वरूप पाहता ग्राम पंचायतीने संबंधित विभागाकडे आर्थिक व तांत्रिक मदत मागितली. ही अडचण सोडविण्यासाठी देण्यात आलेल्या रकमेचा वापर करीत गावात ओव्हरहेड टाकीचे बांधकाम करण्यात आले आणि सर्व घरांमध्ये पाईपलाईन देण्यात आली. गाव नशामुक्त करण्यासाठी चर्चा, आरोग्य शिबिरे, वाद-विवाद स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. नियमांचा आधार घेत ठोस पावले उचलण्यात आली. ग्राम पंचायतीद्वारे अंगणवाडीच्या कामाचीही देखरेख करण्यात येते. गरोदर स्त्रियांना देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा, लसीकरण इ. चीही वेळोवेळी पाहणी करण्यात येते. सामान्यपणे गावांमध्ये मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करण्यात येते, परंतु सदर ग्राम पंचायतीने 6-14 वर्षे वयोगटातील सर्व मुलींना शाळेत दाखल केले. वरिष्ठ नागरिक व अपंगांपर्यंत शासकीय योजना नेण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या. गरजू लोकांना शिधापत्रिका तयार करून देण्यासाठी पंचायतीने खाद्य सुरक्षा विभागाच्या खांद्याला खांदा लावून काम केले. याशिवाय गावात पंचायत भावनाचेही बांधकाम करण्यात आले. बेरोजगार तरुणांसाठी इंग्रजी भाषेचे विशेष वर्ग आयोजित करण्यात आले. या सर्व प्रयत्नांमुळे गावातील पंचायतीस विशिष्ट ओळख प्राप्त झाली. राज्य शासनाने या पंचायतीस मॉडेल पंचायत म्हणून गौरविले आहे.♦




## श्री पॉंड सिस्टमने झाले गाव स्वच्छ, इतर गावांना मिळतेय प्रेरणा

# मिळून केलेल्या प्रयत्नांमुळे झाली चांदसमंद गावाची प्रगती

हरियाणामधील कर्नाल जिल्ह्यातील चांदसमंद गाव आज इतर गावांसाठी एक उदाहरण ठरले आहे. गावातील रस्ते व बोळ स्वच्छ असतात, प्रत्येक घरात शौचालय आहे, सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी थ्री पॉंड सिस्टम नीट राबविण्यात येत आहे. गावातच रोजगाराच्याही संधी आहेत. हे सगळे गावातील लोकांच्या सहकार्य आणि अथक प्रयत्नांमुळे शक्य झाले आहे. चांदसमंद गावाची लोकसंख्या 2248 एवढी असून येथे 415 कुटुंबे राहतात. लोकप्रतिनिधींची दूरदृष्टी आणि व्यावहारिक योजनांनी या गावास प्रगतीच्या वाटेवर नेऊन ठेवले आहे. हे गाव आत इतरांसाठी एक उत्तम उदाहरण ठरले आहे.

या गाथेच्या सूत्रधार आहेत गावाला आपल्या पायावर उभे करणाऱ्या गावाच्या सरपंच बबली राणी. आरोग्य, शिक्षण, रोजगार या क्षेत्रांमध्ये बबली राणी यांनी उचललेल्या पावलांमुळे गावातील लोकांचे जीवन सुधारले आहे. बबली राणी गावच्या सरपंच झाल्या तेव्हा गावातील नाल्यांमधून घन पाणी उफाळून बाहेर येत असे. सांडपाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था नसल्याने नाल्यांमधून घाण पाणी वाहत असे. लोकांना नाईलाजास्तव या घाणीत जीवन जगत असत. ही अडचण सोडवली ती तीन तलाव प्रणालीने. गावाने निर्मल भारत अभियान म्हणजे सध्याच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत थ्री पॉंड सिस्टम तयार करण्याची मंजुरी शासनाकडून घेतली. थ्री पॉंड सिस्टमचे डिझाईन तयार केले पंचायती राज मंत्रालयाच्या इंजिनीअरने. योजना पातळीवर इंजिनीअरने महत्त्वाची भूमिका बजावली आणि सरपंचांनी आपल्या देखरेखीखाली तिची अंमलबजावणी केली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत हे तिन्ही तलाव बांधण्यात आले. ग्राम पंचायतीने हे पाऊल उचलल्याने ग्रामस्थांची अडचण तर दूर झालीच शिवाय मनरेगा अंतर्गत लोकांनाही रोजगार मिळाला. अशा प्रकारे थ्री पॉंड सिस्टममुळे गावातील सर्वात मोठी अडचण सोडविण्यात आली. ही थ्री पॉंड सिस्टम एकूण तीन एकर जमिनीवर बांधण्यात आलेली आहे. पहिला तलाव एक एकर जमिनीवर, दुसरा तलाव अर्धा एकर जमिनीवर आणि तिसरा दीड एकर जमिनीवर बांधण्यात आला. या तिन्ही तलावांच्या बांधकामासाठी 15-20 लाख रुपये खर्च आला.

याशिवाय सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी वेस्ट स्टॅबिलायझेशन पॉंड (डब्ल्यूएसपी) एक उत्तम पर्याय ठरत आहे. हे तंत्र आपलेसे करण्यासाठी गावात जमीन आणि मजूर सहज मिळतात. या तंत्रामुळे ग्रामीण भागांमध्ये ओला कचरा आणि स्वयंपाकघरातील पाण्याचा निचरा सहज होत आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत ओल्या व सुक्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी केंद्र शासन पंचायतींना मदत करत आहे. यासाठी सर्व पंचायतींना जागरूक करण्यात येत आहे. अनेक ग्राम पंचायतींनी हे तंत्र आपलेसे केले आहे कारण यावर होणारा खर्च अतिशय कमी असतो. याची देखभाल करण्यासाठी होणारा खर्चसुद्धा फार कमी असतो आणि हे पर्यावरणपूरक आहे. याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यात वीजेऐवजी सौर उर्जेचा वापर करण्यात आलेला आहे.

### थ्री पॉंड सिस्टम कसे काम करते

यात समान अंतरावर तीन तलाव

बांधण्यात येतात. प्रथम घरांमधील नाल्या पाईपांच्या मदतीने जोडण्यात येतात. पहिल्या क्रमांकाच्या तलावात गोळा होणाऱ्या पाण्यात असलेला कचरा वगैरे पृष्ठभागावर गोळा होतो. हा तलाव भरल्यानंतर पाणी वाहून दुसऱ्या तलावात जाऊ लागते. येथे पाणी पुन्हा स्वच्छ होते आणि पाण्यातील घाण तलावाच्या पृष्ठभागावर गोळा होते. या प्रक्रियेत जीवाणू व शेवाळसुद्धा आपली भूमिका चोखपणे बजावतात. अशा प्रकारे जैविक प्रक्रियेच्या योगे घाणीची सुरक्षित पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येते. येथे शुद्ध झालेले पाणी तिसऱ्या तलावात जाते. या पाण्याचा उपयोग जनावरांना पाजायला आणि झाडांना घालण्यासाठी करण्यात येतो. या प्रणालीचा महत्त्वाचा पैलू म्हणजे यामुळे भूजल पातळीसुद्धा वाढते.

## 70 टक्के घरांची समस्या सोडविणे शक्य

थ्री पॉंड सिस्टममुळे 70 टक्के घरांमधील सांडपाण्याचा निचरा होत आहे. या तलावाच्या आजूबाजूच्या जमिनीवर झाडे लावून सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. आजूबाजूला हिरवळ असल्याने येथे बाग तयार करण्यात आलेली आहे आणि मुले तेथे खेळतात. या तलावांच्या आजूबाजूच्या परिसरास उजळण्यासाठी सौर ऊर्जा वापरण्यात येत आहे. सोलर पनल्स बसविल्याने पथदिव्यांवर खर्च होणाऱ्या विजेत्तासेच त्यांच्या उपकरणांच्या देखभालीच्या खर्चाची बचत होत आहे. या तलावात गोळा होणाऱ्या गाळाचा वापर खत म्हणून केला जात आहे. सांडपाण्याच्या निचऱ्याचे हे मॉडेल इतर अनेक गावांसाठी प्रेरणास्रोत ठरत आहे.

## थ्री पॉंड सिस्टमच्या मार्गातील अडचणी

ही योजना अंमलात आणणे चांदसमंद गावासाठी सोपे नव्हते. गावात तीन तलाव बांधताना मजूर आणि मशिनरीच्या कमतरतेचा सामना करावा लागला. त्यामुळेच हे तलाव बांधण्यासाठी एक वर्ष लागले. मनरेगा अंतर्गत हे तलाव बांधण्यात आले. पुरेशा निधीअभावीसुद्धा या योजनेत अडथळे निर्माण झाले आणि परंतु पंचायतीने आपल्या स्वतःच्या महसुलाचा उपयोग करत हे काम पूर्णत्वास नेले. बांधकामासाठी विटा, सिमेंट, तारा, पाईप, खांब इ. सारख्या आवश्यक वस्तू उपलब्ध व्हाव्यात याकडे लक्ष देण्यात आले. जमिनीत 180 फूट बोरिंग करून सिंचनव्यवस्था मजबूत करण्यात आली. सरपंच आणि इंजिनिअरने या संपूर्ण प्रकल्पाची देखरेख स्वतः केली. अशा प्रकारे ग्राम पंचायत आणि लोकांच्या सहभागाने हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. गाव पूर्वीपेक्षा अधिक स्वच्छ झाले आन तरुणांसाठी रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या.

## ग्रामीण जीवन झाले अधिक सुकर

गावात वरीलव्यतिरिक्त आणखी काही प्रशंसनीय पावले उचलण्यात आली ज्यामुळे लोकांचे जीवन पूर्वीपेक्षा अधिक चांगले झाले आहे. पंचायतीच्या महसूल मॉडेलमध्येही सुधारणा करण्यात आली. गावात पाच चौथरे असून तेथे लोक नेहमी बैठका घेतात. या ठिकाणी बऱ्याच काळापासून पक्क्या भवनाची गरज होती. भवन असल्यास सण आणि लग्न-समारंभांचे आयोजन करणे सुलभ होते. यामुळेच पंचायतीने या चौथऱ्यांच्या जागी पंचायत घर आणि वरातीसाठी भवन बांधण्याचा निर्णय घेतला. आता हे काम अतिशय वेगात करण्यात येत आहे. ग्राम सभेनेदेखील गावातील रस्ते आणि बोळ पक्के करण्यासाठी पावले उचलली. स्वच्छ भारत अभियानांतर्गत गावात अनेक उपक्रम राबविण्यात आले. पंचायत भवनात स्त्री व पुरुषांसाठी वेगवेगळी शौचालये बांधण्यात आली. स्वच्छाग्रहाचे शिवधनुष्य खुद्द सरपंचांनी पेलले. लोकांना गावातील प्रत्येक घरात शौचालय बांधण्यास प्रेरित करण्यात आले. उघड्यावर शौचास बसण्याच्या प्रवृत्तीस आळा घालण्याचे प्रयत्न करण्यात आले. याच्या परिणामी गाव आता उघड्यावर शौचमुक्त आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत पिण्याच्या स्वच्छ पाण्याचीही व्यवस्था करण्यात आली. चांदसमंद गावात शिक्षणाच्या क्षेत्रातही अनेक ठोस पावले उचलण्यात आली.

शिक्षणाच्या अधिकारांतर्गत गावातील प्रत्येक मुलास शाळेत दाखल करण्यात आले. गावातील शाळा आठवीपर्यंतच होती ती बारावीपर्यंत करण्यात आली. आता हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या गावी जावे लागत नाही. सोबतच शाळेत संगणक, प्रयोगशाळा इ. चे बांधकाम करण्यात आले. शाळा परिसरात आरओ, हॅंड पंप, इन्व्हर्टर, सोलर पॅनल्स बसविण्यात आले. स्वच्छतेची योग्य व्हावी म्हणून विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळी शौचालये बांधण्यात आली.

शाळेचा परिसर रोगमुक्त राहावा म्हणून तो स्वच्छ ठेवण्याच्या दिशेनेही पावले उचलण्यात आली. शाळेत वर्गखोल्यांची संख्या कमी पडतेय हे पाहून पंचायतीने आपल्या जमिनीवर शाळेच्या मोठ्या इमारतीचे बांधकाम सुरु केले. मैदानी खेळांना प्रोत्साहन मिळावे म्हणून स्टेडीयम बांधण्यासाठी 8 एकर जमीन देऊ करण्यात आली. या जमिनीवर स्टेडीयम बांधण्यात येत आहे. स्टेडीयमचे बांधकाम झाल्यास गावातील मुलांना खेळायला इतरत्र जावे लागणार नाही.

याशिवाय गावात सहकारी बॅंकेची शाखा उघडण्यात आली. आता गावकऱ्यांना आपले पैसे काढण्यासाठी आणि जमा करण्यासाठी लांब जावे लागत नाही. पाण्याचा पुरेसा पुरवठा होण्यासाठी ठिकठिकाणी हॅंदपंप बसविण्यात आले. संपूर्ण गावात पथदीप बसविण्यात आले. शेतांचे सिंचन करण्यासाठी सबमर्सिबल मोटर बसविण्यात आली आणि पाईपलाईन टाकण्यात आली. यामुळे शेतांच्या सिंचनाची अडचण दूर झाली. वेळेवर पाणी मिळत असल्याने आता शेते डोलत असतात. ♦

## खासदार आदर्श गाव योजना

# चपका ग्राम पंचायतः खासदारांच्या प्रयत्नांमुळे शेते लागली डोलायला, लोकांच्या प्रयत्नांनी सिंचनाचे नवीन मॉडेल तयार

**चपका गाव छत्तिसगढमधील बस्तर जिल्ह्यात आहे. या गावातील सिंचनाच्या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना झालेला आनंद त्यांच्या चेहरे व्यक्त करत असतात. सिंचनाच्या या मॉडेलने गावातील शेत - शिवारे डोलत आहेत.**



चपका ग्राम पंचायत भवन

चपका गाव मार्कंडेय नदीकिनारी वसलेले आहे. येथे सिंचनाची मुळीच सोय नव्हती. वर्षभरात फक्त 1500 सेंमी पाऊस पडत असे. स्त्रोतांच्या अभावामुळे येथील 90 टक्के जमीन सिंचनरहित असायची. खासदार दिनेश कश्यप यांनी या समस्येवर उपाय शोधून काढला. या गावास आदर्श ग्राम विकास योजनेअंतर्गत दत्तक घेतले. दत्तक घेतल्यानंतर सर्वप्रथम सिंचनावर लक्ष केंद्रित करण्यात आले. शासकीय योजनांसमवेत गावकऱ्यांच्या सहयोगाने गावासाठी सिंचनाचे एक मॉडेल तयार करण्यात आले.

## कसे तयार केले सिंचनाचे मॉडेल?

खासदार आदर्श ग्राम योजने (एसएजीवाय) अंतर्गत खासदारांनी गावाच्या विकासाची आखण्यासाठी



सिंचन समिती तयार केली. या समितीत शेतकरी, कृषीतज्ञ, मनरेगा टीम आणि सिंचन विभागातील अभियंत्यांना सामील करून घेण्यात आले. त्यानंतर सुयोग्य योजना तयार करता यावी म्हणून शेतीयोग्य जमिनीचे सर्वेक्षण करण्यात आले. याशिवाय पावसाच्या पाण्याचे संकलन करण्याच्या दिशेनेही पावले उचलण्यात आली. गावात रेन वॉटर हार्वेस्टिंग म्हणजे पावसाच्या पाणी गोळा करण्यासाठी जागा निश्चित करण्यात आल्या. मनरेगा अंतर्गत या दिशेने लहान-लहान तलाव बांधण्यात आले. आधीच अस्तित्वात असलेल्या विहिरी, तलाव इ. ना नवीन जीवन देण्यात आले.

सिंचन मॉडेलअंतर्गत दुसरे महत्त्वाचे काम होते कामे वेगाने व्हावीत म्हणून समूह तयार करणे. यासाठी गावातील लोकांचे गट तयार करण्यात आले. शाकंभरी योजना आणि मागासवर्गीय क्षेत्र अनुदान निधीच्या मार्फत मार्कंडेय नदीकिनारी 20 डीझेल व विजेवर चालणारे पंपसेट बसविण्यात आले. यामुळे 156 हेक्टर जमिनीचे सिंचन होणे शक्य झाले. 200 हेक्टर जमिनीपर्यंत ट्यूबवेलद्वारे पाणी शेतांपर्यंत घेऊन जाण्यासाठी चॅनल तयार करण्यात आले. कमी खर्चाची ड्रीप सिंचन प्रणाली गावात आणण्यात आली. 10 गरीब कुटुंबांना 32000 रुपये खर्च करून ड्रीप सिंचन प्रणालीच्या मशीन उपलब्ध करून देण्यात आल्या. कृषी विभागाने 15 ठिकाणी सिंचन केंद्रे बांधली आणि तेथे शेतकऱ्यांना प्रशिक्षण मिळेल अशी व्यवस्था करण्यात आली. 200 शेतकऱ्यांना आधुनिक शेती करण्याचे प्रशिक्षणही देण्यात आले.

## यशस्वी प्रयत्न

यशस्वी सिंचन मॉडेलमुळे चपका गावातील शेतकरी कितीतरी पिके घेत आहेत. कृषी विकास केंद्रात शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रात होत असलेल्या नवनव्या प्रयोगांबद्दल शेतकऱ्यांना प्रशिक्षण



देण्यात येत आहे. याचा लाभ शेतकऱ्यांना होत आहे. शेतकरी आता जैविक शेती करून चांगले उत्पन्न मिळवत आहेत. सिंचनाची समस्या सुटल्यानंतर हे गाव आता इतर गावांसाठी एक उदाहरण ठरले आहे. ही सर्व कामे खासदार श्री दिनेश कश्यप यांच्या प्रयत्नांमुळेच शक्य झाले आहे. ♦

# ग्राम पंचायत विकास योजना

**सबकी योजना, सबका विकास**

**जन योजना अभियान**

**2 ऑक्टोबर ते 31 डिसेंबर 2018**

## गरीबीमुक्त ग्राम पंचायत




## उद्देश:

- क्रियाशील ग्राम सभेत डीएवाय-एनआरएलएम अंतर्गत 31 लक्ष निवडक पंचायत पुढारी व 5.25 कोटी एसएचजी स्त्रियांची भूमिका बळकट करणे.
- 2018-19 मध्ये करण्यात आलेल्या प्रगतीचे साक्षीवर आधारित आकलन आणि XI अनुसूचीमधील सर्व 29 विषयांत 2019-20 साठी प्रस्ताव
- जन सूचना अभियान - ग्राम पंचायत कार्यालय व ग्राम संवाद ॲपवर सर्व कार्यक्रमांच्या योजना/बिले इत्यादी व्हिलेज डिस्प्ले बोर्डवर सार्वजनिकरीत्या प्रदर्शित करणे.
- XIव्या अनुसूचीतील सर्व 29 क्षेत्रांमधील अग्रगण्य कार्यकर्ते/सुपरवायझर्सद्वारे प्रस्तुतीकरण व व्यक्तिगत उपस्थितीसह 2 ऑक्टोबर-31 डिसेंबर 2018 पर्यंत सर्वव्यापी ग्राम सभा बैठका (चर्चा).
- व्यावहारिक तसेच समग्र ग्राम पंचायत विकास योजना देण्यासाठी सशक्त प्लान प्लस योजना

## घटनेच्या XIव्या अनुसूचीमधील सर्व 29 विषय GPDP मध्ये सामील करण्याची योजना आहे

| XIव्या अनुसूचीमधील 29 क्षेत्रे | संबंधित मंत्रालये | योजना/ निधी |
|---|---|---|
| जमीन सुधार | ग्रामीण विकास मंत्रालय भूमी संसाधन विभाग | SHC, DILRMP |
| ग्रामीण आवास | ग्रामीण विकास मंत्रालय | PMAY(G) |
| पेयजल | पेयजल व स्वच्छता मंत्रालय | NRDWP |
| रस्ते | ग्रामीण विकास मंत्रालय | PMGSY, SAGY, MGNREGA |
| ग्रामीण विद्युतीकरण | वीज मंत्रालय | UJALA, IPDS, DDUGJY, Saubhagya |
| शिक्षण | मनुष्यबळ विकास मंत्रालय | ICDS, SSM, SSA, SBM, MDMS |
| व्यावसायिक शिक्षण | कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय | PMKVY |
| बाजार व जत्रा | वस्त्र मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय | NRLM |
| आरोग्य व स्वच्छता | आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय पेयजल व स्वच्छता मंत्रालय | NRHM/NHM, NRDWP, Mission Indradhanush, ICDS, SBM |
| महिला व बालविकास | महिला व बाल विकास मंत्रालय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय | BBBP, ICDS, OSTC, UJJAWALA, Swadhar Greh, Mahila E-Haat, MSK, STEP |
| सामाजिक कल्याण | सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय | IPOP, Scholarship Programmes, SRMS |
| सामाजिक वितरण मंत्रालय | | |

| XIव्या अनुसूचीमधील 29 क्षेत्रे | संबंधित मंत्रालये | योजना/ निधी |
|---|---|---|
| कृषी | कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय | PKVY, PMKSY, PMFBY, MMAS, NFSM, MIDH, NMAET, NLM, e-NAM |
| पशुपालन | | |
| अपारंपरिक ऊर्जा | नूतन व अक्षय ऊर्जा मंत्रालय | |
| गरिबी निर्मुलन कार्यक्रम | ग्रामीण विकास मंत्रालय | MDMS, MGNEGS, DAY-NRLM, NSAP |
| सार्वजनिक मालमत्तेची देखभाल | पंचायती राज मंत्रालय | FFC |
| कुटुंब कल्याण | आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय | PMUY |
| कमकुवत वर्गांचे कल्याण | वित्त मंत्रालय | PMSBY, PMJBY, HKKP |
| मत्स्यपालन | | |
| सामाजिक वनीकरण | | |
| लघु उद्योग | वस्त्र मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय | PMEGP |
| खादी ग्राम व कुटिरोद्योग | | PMEGP |
| इंधन व चारा | | |
| प्रौढ व अनौपचारिक शिक्षण | | |
| ग्रंथालय | | |
| सांस्कृतिक कार्यक्रम | | |

## जिल्हा पंचायत विकास योजना







**Public Information Board**

## सहभागी मंत्रालय व विभाग

- पंचायती राज व ग्रामीण विकास मंत्रालय
- कृषी सहकारिता व शेतकरी कल्याण मंत्रालय
- पशुपालन, डेअरी व मत्स्य विभाग
- पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालय
- सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय
- पेयजल व स्वच्छता मंत्रालय
- शालेय शिक्षण व साक्षरता विभाग
- आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय
- महिला व बाल विकास मंत्रालय
- खाद्य व सार्वजनिक वितरण विभाग
- जमातींच्या बाबी आणि सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय
- वित्तीय सेवा विभाग
- विद्युत मंत्रालय
- पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय

## जन योजना अभियान: कामे व कामाचे साहित्य

- अभियानासाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि वेब पोर्टल (www.gpdp.nic.in) वर नोंदणी.
- प्रत्येक ग्राम पंचायत/ग्राम्य स्थानिक संस्थेसाठी सुविधा प्रदान करणाऱ्यांची नियुक्ती.
- ग्राम सभांना अधिकार मिळावा यासाठी ग्राम पंचायत वार कॅलेंडरला अंतिम स्वरूप देणे (निष्कर्षण).
- नियोजित दिवशी ग्राम सभेच्या चर्चांसाठी तयार करण्यात आलेल्या प्रस्तुतीकरणासाठी अकराव्या अनुसूचीतील सर्व 29 विषयांशी संबंधित सर्व विभागांच्या अग्रगण्य कार्यकर्त्यांची नियुक्ती.
- प्रत्येक ग्राम पंचायतीत जन सूचना बोर्ड लावणे आणि वेबसाईटवर त्याचे जिओ-टॅग्ड फोटो अपलोड करणे
- क्रियाशील ग्रामसभा चर्चांचे जिओ-टॅग्ड फोटो अपलोड करणे
- प्लान प्लस ॲप्लीकेशनवर संमत योजना प्रदर्शित करणे.

**समन्वयकांची भूमिका:**

- एमए आराखड्याचा वापर करत मिशन अंत्योदय (एमए) अंतर्गत सर्वेक्षण करावे
- ठरविलेल्या दिवशी जीपीडीपीसाठी विशेष ग्राम सभेची सोय करणे
- ग्राम सभेदरम्यान एससी/एसटी स्त्रियांसारख्या कमकुवत वर्गांसह सामुदायिक आंदोलन करण्याची सोय करावी
- पोर्टलवर ग्राम सभेच्या वर्तनाबाबत एक अहवाल सादर करावा

ओडिशा

# "बीज माता होऊन" लोकांना वाटतेय पारंपारिक ज्ञान

**आदिवासी स्त्रिया बियाण्यांची निवड आणि त्यांचे जतन यांच्या पारंपारिक ज्ञानाचा वापर करत आहेत. ओरिसा नावाच्या एनजीओने अशा स्त्रियांचा एक गट तयार केलेला असून या गटास असणाऱ्या शेतीच्या पारंपारिक ज्ञानाचा गावातील इतर लोकांचाही फायदा होत आहे. यांना बीज माता असे नाव देण्यात आले आहे.**



## पार्श्वभूमी

ओडिशामधील मलकानगिरी हा एक आदिवाशी भाग आहे. येथील लोक प्रामुख्याने शेती करून आपली उपजीविका चालवतात. कृषी क्षेत्रातील उपलब्ध असणारे सर्व उपाय वापरूनही या भागात विशेष फरक पडत नव्हता. स्थानिक पिके सातत्याने प्रभावित होत होती. ग्राम पंचायतसुद्धा याबद्दल चिंतेत होती. ओरिसा नावाच्या एनजीओने कंधमाल जिल्ह्यातील मलकानगिरी गावातील लोकांची ही अडचण सोडविण्याची प्रतिज्ञा केली. एनजीओच्या विशेषज्ञांनी या क्षेत्रातील शेतकऱ्यांना आधुनिक आणि अधिक चांगल्या उपायांबद्दल सांगण्यास सुरुवात केली. पण त्याने पिकांच्या उत्पादनात विशेष फरक पडला नाही. आधुनिक व उत्तम तंत्रज्ञान निरुपयोगी ठरत असल्याचे पाहून ओरिसाच्या सदस्यांनी येथील वयस्क आदिवासी शेतकऱ्यांचा सल्ला घेतला. त्यांच्या सल्ल्याने या भागात शेतीसाठी काय योग्य ठरेल यावर विचार करून शेती करण्यात आली. पारंपारिक पद्धती आणि पिकांच्या उत्तम व देशी जातींचे चांगले परिणाम दिसू लागले. मग काय, बियाण्यांची निवड आणि त्यांचे जतन करण्याच्या वारशाने चालत आलेल्या अनमोल ज्ञानाचा विस्तार होऊ लागला. शेतीच्या पारंपारिक पद्धती व बियाण्यांची माहिती असणाऱ्या आदिवासी स्त्रियांना शोधून काढून त्यांना बीज माता म्हणण्यात येऊ लागले. या बीज मातांनी बियाण्यांचे जतन कसे करावे याबाबत माहिती देण्यासोबतच गावातील लोकांना याचे महत्त्वसुद्धा समजावून सांगितले.

## ठरले महत्त्वाचे पाऊल

पारंपारिक शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढू लागले. परंतु शेतकरी आत्मनिर्भर व्हावा यासाठी बियाण्यांची उपलब्धता वाढविणे आवश्यक आहे याची जाणीव होऊ लागली. यासाठी उपयोगी ठरले ते आदिवासी महिला शेतकऱ्यांकडे असलेले पारंपारिक ज्ञान. शेतीच्या पारंपारिक ज्ञानामुळे महिला शेतकऱ्यांनी एक अनोखी कृषी क्रांती घडवून आणली आणि ती इतर शेतकऱ्यांसाठी उपयोगी ठरली. त्यामुळे त्या बीज माताहौन या दिशेने लोकांना जागरूक करू लागल्या. आता त्या आपल्या लोकांमध्ये शेतीच्या पारंपारिक पद्धतींबद्दल माहिती देतात. हे गाव एक आदर्श मॉडेल ठरले आहे.

## पीक योजना आणि सीड मॅपिंग

बियाण्यांच्या संरक्षणाच्या संदर्भात त्या भागात उपलब्ध पिकांच्या वाणांबद्दलची माहिती गोळा करणेसुद्धा महत्त्वाचे काम होते. त्यासाठी तेथे सीड मॅपिंग करण्यात आले, म्हणजे कोणत्या भागात कोणते बियाणे उपलब्ध आहे याबाबतची माहिती संकलित करण्यात आली. यामुळे बियाण्यांची उत्तम वाणे विकसित करण्यात मदत झाली. यामुळे कमतरतासुद्धा जाणून घेता आल्या आणि त्या दिशेने काम करण्यासाठी योजना तयार करण्यात आली.

## बीज संरक्षण

पीकघेण्याची योजना तयार करण्यापूर्वी त्या बियाण्याच्या उपलब्धतेविषयी माहिती घेणे अतिशय आवश्यक असते. परंतु बियाणे सातत्याने उपलब्ध होईलच याची व्यवस्था करणे इतके सोपे काम नाही. यासाठी बियाण्याचे आदानप्रदान

दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय ग्रामीण उपजीविकेअंतर्गत महिला शेतकरी सशक्तीकरण प्रकल्प (एमकेएसपी) ची सुरुवात करण्यात आली. महिला शेतकऱ्यांना उपजीविका करता यावी हा उद्देश केंद्रस्थानी ठेवून एमकेएसपी सुरु करण्यात आली आहे. या योजनेमुळे शेतीतील उत्पादन वाढविण्याचे उद्दिष्ट गाठण्यास मदत होईल.

**श्री अमरजित सिन्हा**
सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय व पंचायती राज मंत्रालय



करणे हाच एकमेव उत्तम मार्ग होता. यासाठी लोकांना उद्युक्त करण्याच्या कामात बीज मातांनी महत्त्वाची भूमिका वठवली. गावातील लोक प्रथम बियाण्याच्या वाणाची निवड करतात. त्यानंतर त्याचा इतर वाणाशी संकर करण्याची योजना आखण्यात येते. महिला शेतकऱ्यांच्या गटाने नर्सरी तयार केलेली असून तीत मोसमी भाज्यांचे उतपादन घेण्यात येते. त्यामुळे अनेक प्रकारचे बियाणेदेखील तयार होते. या नर्सरीत फक्त निरोगी आणि उत्तम असणाऱ्या झाडांचे बियाणेच चिन्हित करण्यात येते. त्या झाडास चिन्हित करण्यात येते जेणेकरून त्याचे वाण संग्रहित करण्यात यावे. या प्रक्रियेत बीज माता प्रत्येक पातळीवर झाडाचे मूल्यमापन करते. निरोगी बियाणे संकलित करण्यासाठी बीज माता प्रत्येक पैलूची पाहणी करते. उदाहरणार्थ, प्रथम पिकाच्या फांद्या, त्यानंतर फुले आणि मग फळे तपासते आणि त्यांच्या कापणीपर्यंतच्या प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवते. पारंपारिक ज्ञानाचे परस्पर आदानप्रदान केल्याने बियाण्याचे जतन आणि त्यांच्या देखभालीच्या बाबतीत अनेक बदल झाले आहेत.

## कथा जमुना किरसानीची

मलकानगिरी गावातील जमुना किरसानी एक बीज माता आहे. त्यांनी आतापर्यंत धानाच्या 61 प्रजाती आणि दाळी, तीळ, भाज्या आणि जनावरांच्या चाऱ्याची 123 वाणे जतन केली आहेत. सर्व गावकरी त्यांच्या कृषी क्षेत्रातील त्यांच्या ज्ञानाचा आदर करतात. त्यांचे स्वतःचेही मत आहे की त्यांच्याकडे शेतीचे पारंपारिक ज्ञान उपलब्ध असताना त्यांनी त्याचा फायदा का करून घेऊ नये. विशेष म्हणजे जामुनाने आपल्या ज्ञानाच्या बळावर कमी खर्चात व्हर्मी कम्पोस्ट केंद्रसुद्धा स्थापित केले आहे. या केंद्रात त्या स्वस्त दारात कीटकनाशक तयार करतात. त्यांच्याकडे असलेल्या बियाण्यांच्या वाणाच्या आणि त्यांच्या गुणवत्तेच्या अद्भुत ज्ञानामुळे त्या पंचक्रोशीत प्रसिद्ध आहेत. जमुना म्हणतात, तमला आदिवासी असल्याचा आणि बीज माता म्हणवले जाण्याचा अभिमान आहे. बियाण्यांचे ज्ञान असल्याने मला एक नवी ओळ प्राप्त झाली आणि आता सन्मानही मिळतोय. ♦

## फूड फेस्टिवल

**फूड फेस्टिवल हे स्थानिक पिकांची वाणांचा प्रसार करण्याचे सर्वात प्रभावी माध्यम ठरत आहे. बीज माता ग्रामीण स्तरावर फूड फेस्टिवलचे आयोजन करत आहेत. त्या या फेस्टिवलमध्ये मोसमी व स्थानिक पदार्थांचा समावेश करतात. या पदार्थांचे स्रोत आणि पारंपारिक गुणांबद्दलही ग्रामीण लोकांना सांगण्यात येते. या उपक्रमाच्या यशाची एक झलकः**

1) बीज मातांमुळे पारंपारिक पद्धतींबद्दलची माहिती सर्व लोकांना देणे शक्य झाले आहे. शेतीच्या पारंपारिक पद्धतींचा अवलंब करून शेतकरी लाभ मिळवत आहे.

2) बियाण्यांची स्थानिक वाणे संग्रहित केल्याने बाजारावर अवलंबून राहणे कमी झाले आहे. शेतकरी जुन्या पद्धतीने शेती करून चांगली कमाई करत आहेत. ते आत्मनिर्भर होत आहेत.

3) ज्वारीसारख्या पिकासोबत आंतरपीक घेण्यास प्रोत्साहन दिल्यामुळे चांगले परिणाम होत आहेत. हवामान प्रतिकूल असले तरीही या प्रकारच्या शेतीमुळे चांगले पिक मिळाले आहे. याचे कारण म्हणजे पर्यावरणातील बदल स्थानिक बियाण्यांवर तेवढा प्रभाव करत नाहीत.

4)बीज माता कृषी क्षेत्रातील निरंतर विकासाच्या संवाहक ठरल्या आहेत



कारण त्यांच्यामुळेच गावांमध्ये शेतीच्या पारंपारिक पद्धतीचा प्रसार केला जात आहे. याच्या परिणामी या भागात वाऱ्यावर डोलणारी शेते दिसून येत आहेत.

# 500 स्त्रिया एकत्र आल्या आणि उदयास आली थेन्नला ॲग्रो फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड

## धान शेती करून स्त्रिया होताहेत आत्मनिर्भर, इतरांसाठी मांडले उदाहरण

**केरळमधील मल्लापुरम जिल्ह्यातील थेन्नला गावास धानाचे वाडगे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. थेन्नला गाव आता अतिशय उत्तम गुणवत्ता असणाऱ्या तांदळाचे उत्पादन घेण्यासाठी प्रसिद्ध आहे. गावातील या बदलाची नांदी झाली ती थेन्नला ॲग्रो फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडच्या स्थापनेसह. ही कंपनी 9 सप्टेंबर, 2015 रोजी अस्तित्वात आली. मल्लापुरम जिल्ह्यातील थेन्नला ग्राम पंचायतीची ही कंपनी संयुक्त देयता समूह (जेएलजी) व नेबरहूड ग्रुपयांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येते. या कंपनीच्या सदस्यांच्या मते थेन्नला ॲग्रो कंपनी उत्पादक, शेतकरी, बाजार, व्यावसायिक यांनी मिळून काम करण्यासाठी स्थापित मंच असून त्याने सामुदायिक उन्नती होते.**



### गट ते कंपनीपर्यंत झालेला अनोखा प्रवास

थेन्नला राईसची सुरुवात झाली ती केरळ राज्य ग्रामीण आजीविका मिशन अंतर्गत कुदुम्बश्री संयुक्त देयता गटाच्या पुढाकाराने. सुरुवातीच्या काळात कुदुम्बश्रीने गरिमा किसान गटास प्रोत्साहन दिले. याचे उद्दिष्ट होते धानाचे उत्पादन आणि त्यांची विक्री वाढविणे आणि धानावर प्रक्रिया करून त्याची बाजारात योग्य किमतीस विक्री करणे. गटाने या तांदळाची थेन्नला राईस या नावाने विक्री सुरु केली. तांदळाची मागणी तर वाढली, पण त्यांचे ब्रान्डींग झालेले नास्याने कंपनीस नफा मात्र होत नव्हता. यामुळे गावातील शेतकऱ्यांना या धानाची मध्यास्थांनाच कमी दरात विक्री करावी लागत असे. देयता गटाचे सदस्य आणि शेतकरी दोघेही गोंधळलेले होते.

गावातील लोकांची अडचण पाहता प्रदेश शासनाच्या हरित मल्लापुरम योजनेंतर्गत थेन्नला पंचायतीने धानाचे उत्पादन वाढविण्यासाठी काही मशीन खरेदी केल्या. या मशीन संयुक्त देयता समूहास देऊ करण्यात आल्या. मल्लापुरम जिल्हा मिशनच्या सल्ल्याने पंचायतीने या नवीन मशिनरीचा उपयोग धानाचे

उत्पादन वाढविण्यासाठी केला. या मिशनमध्ये शेतकऱ्यांना बियाणे कृषी भवनमधून देण्यात आले. त्यानंतर पंचायतीने 10 जणांचा एक गट तयार केला आणि त्यांच्यासाठी 10 एकर जमीन भाडेपट्टीवर घेतली. या उपक्रमास मोठ्या उत्साहाने सुरुवात तर झाली, परंतु शेतात जळूंची समस्या उद्‌भवल्याने काही शेतकऱ्यांनी माघार घेतली. त्यांनी गटाला रामराम ठोकला. शेवटी या गटात काम करणारे फक्त 4 सदस्य उरले. या गटाने 14 एकर जमिनीवर धानशेती केली. या शेतांमध्ये पलक्कल गावात लागवड करण्यात येणाऱ्या मुंडकन वाणाच्या धानाच्या बियाण्यांची लागवड करण्यात आली. हे पाऊल उचलल्याने गटास लाभ झाला. पिकातील काही भाग गटातील लोकांनी आपसात वाटून घेतला आणि उरलेला एका भाड्याने घेतलेल्या घरात नीट जपून ठेवला. हा राखून ठेवलेला माल सप्लायकोला विकण्यात आला. या व्यवहारातून गटास नफा झाला. त्यानंतर संयुक्त देयता समूहाने कधीच मागे वळून पाहिले नाही.

यास्मिन अरिंबा कंपनीच्या अध्यक्ष आहेत. त्यांची इच्छाशक्ती आणि दृढ निश्चयाने कंपनीने मोठे उद्दिष्ट गाठले आहे. ही कंपनी गावातील लोकांसाठी जणू पावसाळ्यातील आश्रय ठरली. यास्मिन यांनी गावातील इतर स्त्रियांना कंपनीशी संलग्न केले आणि ते अतिशय महत्त्वाचे पाऊल ठरले. कंपनीच्या या यशस्वी नमुन्यामुळे इतर संयुक्त देयता समूहांनासुद्धा धानशेती करण्यास प्रवृत्त केले. परिणामी, 236 एकर जमिनीवर धानाचे पीक घेतले जाऊ लागले. हा तांदूळ थेन्नला कुदुम्बश्री राईस या नावाने विकण्यात येऊ लागला. गावातील सर्व 500 सदस्यांनी ॲग्रो प्रोड्यूसर कंपनीची स्थापना केली. कंपनीने शेतकऱ्यांकडून धान विकत घेऊन त्यावर प्रक्रिया करून त्याची स्वस्त दरावर विक्री करण्यास प्रारंभ केला. जिल्हा मिशन आणि बँकांनी कंपनीच्या प्रयत्नांची दखल घेतली आणि त्यांना कर्ज देऊ केले. त्यानंतर थेन्नला ॲग्रो प्रोड्यूसर कंपनी स्थापित करण्यात आली.

## बिझनेस मॉडेल

थेन्नला ॲग्रो फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड या कंपनीत 500 सदस्य आहेत. कंपनीचे प्रमुख काम धानाचे उत्पादन आणि त्याची खरेदी करणे, धानापासून तांदूळ तयार करणे, स्थानिक दुकाने आणि प्रदर्शनांमध्ये जैविक तांदळाची मार्केटिंग करणे हे आहे.

## धानाचे उत्पादन व त्याची खरेदी

कंपनीचे सदस्य एकमेकांच्या सहकार्याने काम करतात. मजुरीवर होणारा खर्च टाळण्यासाठी महिला सदस्य इतर सदस्यांच्या शेतांमध्ये धान लागवडीत मदत करतात. यामुळे ज्या पैशाची बचत होते त्याचा उपयोग ट्रॅक्टर भाड्याने घेण्यासाठी आणि शेतांना पाणी देणे इ. सारख्या कामांसाठी करण्यात येतो.

थेन्नला ॲग्रो फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडमधील सदस्य महिला पाच गावांमधील शेतांमध्ये काम करतात. यात मराक्कादपम, वलाकुलम, पादम, अपला पादम, पालकम पादम, इरंजी पादमचा समावेश आहे. या शेतांमध्ये उमा, ऐश्वर्या, सियोन, ज्योती, पोन्नी आणि ज्वारा यांसारख्या सहा प्रकारच्या धान्याची लागवड केली जाते. थेन्नला कंपनी धानशेती जैविक पद्धतीने करते. शेतांमध्ये व्हर्मी कंपोस्ट आणि जैविक खताचा वापर करण्यात येतो. कोणत्याही प्रकारच्या रसायनांचा वापर करण्यात येत नाही. यासाठी कंपनीस जैविक उत्पादन प्रमाणपत्रसुद्धा मिळाले आहे. कंपनीद्वारे गावातील इतर संयुक्त देयता समूहांकडून धान्य खरेदी करून ते मिलमध्ये पाठविण्यात येते. तांदूळ आणि भुसा वेगळा करणे तसेच तो पॉलिश करणे आणि त्याची वर्गवारी करणे यांसारखी कामेही केली जातात. तांदूळ 1, 5 आणि 10 किलोच्या पाकिटांमध्ये भरण्यात येतो. याशिवाय राईस फ्लेक्स, राईस ब्रान, पायसम



राईस आणि चुरीसारख्या इतर उत्पादनांचेही पॅकिंग करण्यात येते. सध्या थेन्नला राईसचे एक किलोचे पाकीट 50 रुपयांना विकले जाते. तांदूळ व इतर उत्पादनांची किंमत संचालक मंडळ ठरवते.

## वित्तीय व्यवस्थापन

ॲग्रो कंपनीस पाच लाख रुपयांपासून सुरुवात झाली होती. गावातील 500 लोकांनी कंपनीत प्रत्येकी 1000 रुपये गुंतवले होते. याशिवाय नाबार्डने 10 लक्ष रुपयांची आर्थिक मदत केली. कुदुम्बश्रीनेही कंपनीस 10 लाख रुपयांची मदत केली.

## मार्केटिंग, विक्री आणि नफा

थेन्नला ॲग्रो फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड आपली उतपादाने स्थानिक दुकानांमध्ये विकते आणि यामुळे स्थानिक लोकांना स्वस्त दरात तांदूळ आणि इतर उत्पादने मिळतात. राज्य सरकारची कुदुम्बश्रीसुद्धा थेन्नला तांदूळ शासकीय योजनांसाठी खरेदी करते. याशिवाय, प्रदेशातील हिलिंग सेंटर व आयुर्वेदिक केंद्रे, नॅचुरोपॅथी केंद्रेसुद्धा याच कंपनीकडून तांदूळ खरेदी करतात. कंपनीने बऱ्याच जैविक स्टोरशी करार केलेला आहे. थेन्नला कंपनीच्या तांदळास आता परदेशातूनही मागणी आहे. थेन्नला कंपनीच्या एकूण विक्रीतील 80 टक्के वाटा स्थानिक दुकानांचा आहे तर 20 टक्के माल घाऊक बाजारात जातो.

## मुद्दे व आव्हाने

थेन्नला ॲग्रो फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी

लिमिटेडसमोर आव्हानेही बरीच आहेत. कंपनीपुढे असलेले सर्वात मोठे आवाहन म्हणजे गुंतवणूक कमी करणे आणि मार्केटिंग अधिक मजबूत करणे. याशिवाय कंपनी नवीन तंत्रज्ञान आपलेसे करण्याच्या बाबतीतही मागे पडतेय. पॅकेजिंग आणि ब्रांडिंग प्रणालीमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. धान साठवून ठेवण्यासाठी मोठी संरचना नसणे हीसुद्धा कंपनीस सतावणारी एक बाब आहे. सध्या भाड्याने घेतलेल्या गोदामांमध्ये तांदळाची पाकिटे ठेवण्यात येतात. यासाठी कंपनीस भाड्यापोटी बरीच मोठी रक्कम खर्च करावी लागते. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे कंपनीत उत्तम व्यवस्थापक नसल्याने कंपनीस तोटा सहन करावा लागतो. उदाहरणार्थ, आधी कंपनी मिल्सना भुसा फुकट देत असे, पण आता तो मिल्स आणि इतर शेतकऱ्यांना विकून त्यातून उत्पन्न मिळवत आहे.

## सुशासन

थेन्नला ॲग्रो फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी लिमिटेडमध्ये 126 देयता समूह आहेत. 10-15 जेएलजी च्या एका क्लस्टरवर एक अध्यक्ष आणि एक सचिव नेमण्यात येतो. प्रत्येक क्लस्टरसाठी एक संचालक नियुक्त करण्यात येतो. प्रोड्यूसर कंपनीत 10 क्लस्टर आहेत. संचालकाचा कार्यकाळ तीन वर्षांचा असतो. कंपनीचे नियंत्रण कंपनीने स्थापित केलेल्या समितीद्वारे करण्यात येते.




## क्षमतानिर्मिती आणि प्रशिक्षण

कंपनीच्या महिला सदस्यांच्या प्रशिक्षणावर बराच भर देण्यात आलेला आहे. महिला शेतकरी सशक्तीकरण प्रकल्पांतर्गत कुदुम्बश्रीने या महिलांना प्रशिक्षण दिले. यात मार्केटिंग स्कील, उत्पादन पद्धती, ब्रांडिंग, गुणवत्ता तपासणीसारख्या सर्व मुद्द्यांचा अंतर्भाव करण्यात आला. दररोज नवनवीन तंत्रज्ञाने येत असल्याने सतत प्रशिक्षण गरजेचे आहे. कंपनीच्या अधिकाऱ्यांना व्यवस्थापनाचे प्रशिक्षणही देण्यात येते. या प्रकारचे प्रशिक्षण भविष्यातही सुरु ठेवण्याचा समूहाचा मानस आहे.

## भविष्यासाठी योजना

येणाऱ्या काळात थेन्नला गावात बीज बँक स्थापित करण्याची कंपनीची योजना आहे. तेथे धानाची स्थानिक वाणे ठेवण्याचा कंपनीचा विचार आहे. यामुळे शेतकऱ्यांना धानाची गुणवत्ता टिकवून ठेवणे शक्य होईल. याशिवाय कंपनी केळी व तांदळापासून तयार करण्यात येणाऱ्या मुलांच्या खाद्यपदार्थांची विक्री करण्याची योजना आखत आहे. तसेच सकाळच्या न्याहरीसाठी धान्य व सुक्या मेव्यांपासून नवीन उत्पादने विकसित करण्याच्या दिशेने काम करीत आहे. याशिवाय टॅपिओकापासून तयार करण्यात येणाऱ्या पक्का वडा, खारे पदार्थ, चिप्स, मिठाई इ. चे उत्पादन करण्याची योजनाही आखत आहे.

## गुंतागुनी

थेन्नला प्रोड्यूसर कंपनी 500 कुटुंबांना रोजगार देत आहे. त्यांचे जीवन अधिक व्हावे या दिशेने काम करीत आहे. कंपनीतील लोकांना स्वतःचे स्टोरेज, पॅकेजिंग युनिट, प्रोसेसिंग युनिट स्थापित करण्याची इच्छा आहे. या सर्वांसाठी कंपनीस आर्थिक मदतीची गरज आहे. कंपनीचे उत्पादन वाढविण्यासाठी व्यवस्थापन सुधारणे आवश्यक असून यासाठी व्यवस्थापन विशेषज्ञांना सामील करून घेण्याची गरज आहे. ♦


## स्वच्छ भारत अभियान

**महात्मा गांधी नेहमी गावांच्या महात्त्वावर भर देत आणि ग्राम स्वराज्या बद्दल बोलत. गावांमध्ये बदल घडून आला तर भारत निश्चितच बदलेल.**

प्रधानमंत्री आवास योजना ग्राम

दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मिशन

ग्रामीण विकास योजना

भारताच्या पंचायतीचे परिवर्तनकार - आंध्र प्रदेश

एसएचजी लीडरची यशस्वी कथा - आंध्र प्रदेश

सद्भावनेच्या दिशेने अग्रेसर - महाराष्ट्र

अबरसिंग पंचायत, ओडिशा - शक्तीमध्ये एकता

एका बी.टेक.अभियंत्याच्या यशाची गाथा - राजस्थान



खासदार आदर्श गाव योजना

# गुलाबी झाले जोडंदा झरिया गावातील लोकांचे जीवन

**2014 मध्ये छत्तीसगडमधून राज्यसभा खासदार झालेल्या नंद कुमार साई यांनी खासदार आदर्श गाव योजनेंतर्गत जोडंदा गाव दत्तक घेतले. तीन वर्षांपूर्वी हाती घेतलेल्या विकास कामांचे परिणाम जमिनीवर दिसू लागले आहेत.**

छत्तीसगड आणि ओडिशा राज्यांच्या सीमेवर वसलेल्या दोन गावांनी मिळून तयार झालेले जोडंदा झरिया हे गाव आज लोकांसमोर आदर्श गाव आहे. कुण्या एके काळी अतिशय मागास क्षेत्र म्हणवण्यात येणाऱ्या जोडंदा गावातील लोकांचे जीवन गुलाबी होऊ लागले आहे. सामुदायिक प्रयत्नांमुळे गावात साक्षरतेचा दर 100 टक्के आहे. पोषणाच्या बाबतीतही हे गाव सर्वांच्या पुढे आहे. नशामुक्त आणि हागणदारीमुक्त झालेले हे गाव आता इतरांसाठी एक नमुना ठरले आहे.

2014 मध्ये छत्तीसगडमधून राज्यसभा खासदार झालेल्या नंद कुमार साई यांनी खासदार आदर्श गाव योजनेंतर्गत जोडंदा गाव दत्तक घेतले. तीन वर्षांपूर्वी हाती घेतलेल्या विकास कामांचे परिणाम जमिनीवर दिसू लागले आहेत. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या योजनांवर खुद्द नंद कुमार साई यांनी देखरेख केली. येथे प्रत्येक घरी शौचालय बांधण्यात आले आणि त्याला गुलाबी रंग देण्यात आला. जोडंदा गावातील घरा-दारावरील गुलाबी रंग विकासाची गाथा सांगतोय. त्याच वेळी विकासाच्या वाहक म्हणून स्त्रियांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. समृद्धीचे प्रतीक असलेल्या गुलाबी रंगाची साडी नेसलेल्या स्त्रिया स्वच्छतेचे ज्ञान लोकांपर्यंत पोचविण्याच्या कामात व्यस्त आहेत. गावास निरोगी, स्वच्छ करण्याचे या मॉडेलने आता लोकचळवळीचे स्वरूप धारण केले आहे.

## कसे आणि कोठे आहे जोडंदा गाव?

जशपुर जिल्हा मुख्यालयापासून 107 किलोमीटर अंतरावर वसलेल्या या गावाची लोकसंख्या सुमारे 1451 आहे आणि येथे 285 कुटुंबे राहतात. जोडंदा गाव शेड्युल 5 मध्ये मोडत असल्याने येथे पेसा 1996 हा कायदा लागू आहे. या कायद्यांतर्गत येथील ग्राम सभेस आपल्या समाजाच्या प्रथा, धार्मिक व परंपरागत रितीभाती इ. चे संरक्षण करण्यासाठी पाऊल उचलण्याचा आणि आपल्यातील भांडणे कशी सोडवावीत याचा निर्णय स्वतःच घेण्याचा विशेष अधिकार आहे. राज्यातील पहिलेच हागणदारीमुक्त आणि नशामुक्त गाव

विकास कार्यांवर निरंतर देखरेख ठेवण्यासाठी माननीय खासदार आणि जिल्हा प्रशासनाने या गावास नियमितपणे भेटी दिल्या. ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत सुरु करण्यात आलेली कामे वेळीच पूर्ण करण्यात आली. ग्रामीण जीवनात याचे परिणामही दिसू लागले. तीन वर्षांमध्ये जोडंदा गाव हागणदारीमुक्त आणि नशामुक्त झाले आहे. देशाच्या स्वातंत्र्यदिनी म्हणजे 15 ऑगस्ट रोजी जोडंदा गावच्या लोकांनी 15-15 गावांमध्ये जागरूकता निर्मितीचे काम अंगावर घेतले आहे. या पंचायतीस या प्रशंसनीय कामासाठी सन्मानित करण्यात आले आहे.♦

# ग्राम विकास मंत्रालयाच्या “ॲप” उपक्रमाने ग्रामीणांना न्याय

ग्रामीण विकास मंत्रालयाने लॉन्च केलेल्या ॲपने ग्रामीण लोकांना न्याय मिळेल अशी आशा निर्माण केली आहे. एवढेच नव्हे, तर या योजनांबाबत लोकांनी केलेल्या तक्रारींकडे आता अधिकारी दुर्लक्ष करू शकत नाहीत आणि फायलीसुद्धा जास्त काळ प्रलंबित ठेवू शकत नाहीत. त्यांना विशिष्ट वेळेच्या आत ग्रामस्थांच्या तक्रारी सोडवाव्या लागत आहेत कारण तक्रारींचे निवारण झाले नाही तर संबंधित फायली आपोआप वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ऑनलाईन पोचतात आणि आपली जबाबदारी पार पाडण्यात कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय कारवाई होते. जनमनरेगा, आवास, मेरी सडक, ग्राम संवाद मोबाईल, कौशल्य नोंदणी - स्किल रजिस्टर ॲप हे लोकांमध्ये कौतुकाचा विषय ठरत आहेत.




**केंद्र शासनाच्या विकास कामांमध्ये पारदर्शकता आणि बेरोजगारांना रोजगार देऊ करण्याच्या निर्णयावर ग्रामीण विकास मंत्रालयाने सूचना व माहिती तंत्रज्ञान असे मोबाईल ॲप लॉन्च केले आहेत ज्यामुळे ग्रामीण जनता जागरूक तर झाली आहेच शिवाय शासकीय योजनांचा लाभ त्यांना थेट मिळत आहे.**

## जनमनरेगा

मनरेगा या केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजनेस सजनमनरेगाा ॲप पारदर्शक करत आहे. हे ॲप मोबाईलमध्ये डाऊनलोड करून तुम्हीसुद्धा आपल्या ग्राम पंचायतीमध्ये सुरु असलेल्या विकास कामांवर देखरेख करू शकता.

ॲपवर क्लिक करताच जीपीएस सुरु होईल आणि तुम्ही जेथे उभे असाल त्या क्षेत्रात मनरेगा अंतर्गत एक किलोमीटरच्या परिघात करण्यात येत असलेल्या विकास कामांची सर्व माहिती तुमच्या मोबाईलवर फोटोसह दिसू लागेल. यामुळे भ्रष्टाचारास आळा बसेल आणि गुणवत्तापूर्ण विकास कामे होतील. गावकऱ्यांना आता मनरेगा द्वारे करण्यात आलेल्या कामांची माहिती घेण्यासाठी कार्यालयांमध्ये खेटे घालण्याची गरज नाही. हे ॲप तुम्हीसुद्धा आपल्या मोबाईल अँड्रॉईड ॲपवर डाऊनलोड करू शकता. यासाठी गूगल प्ले स्टोरवर जाऊन हिंदीत तजनमनरेगाा ॲप असे लिहून ॲप डाऊनलोड करावे. त्यानंतर ते तुम्हाला सेवा प्रदान करू लागेल.

## आवास ॲप

स्वतःचे घर असणे म्हणजे गरिबांसाठी




अशक्यप्राय स्वप्न होते, पण आता तसे राहिले नाही. केंद्र शासनाने गरिबांची गरज लक्षात घेऊन प्रधानमंत्री आवास योजना सुरु केली. तिला पारदर्शक करण्यासाठी आवास मोबाईल ॲप उत्तम काम करत आहे.

**ॲप असे डाऊनलोड करावे:** ग्रामीण लोकांना नजरेपुढे ठेवून तयार करण्यात आलेल्या या ॲपचा लाभ ग्रामीण जनता घेत आहे. या ॲपच्या सहाय्याने ग्रामीण भागात राहणारे लोक आपल्या स्मार्टफोनच्या मदतीने ॲपमध्ये आपले लॉगइन तयार करू शकतात. या ॲपचे नाव आवास असे असून ते गूगलच्या प्ले स्टोरवरून

निःशुल्क डाऊनलोड करता येते. डाऊनलोड केल्यानंतर मोबाईल क्रमांकाच्या सहाय्याने यात लॉग इन करता येते. लॉग इन तयार केल्यानंतर हे ॲप तुमच्या मोबाईल क्रमांकावर एक वन टाईम पासवर्ड पाठवतो. याच्या मदतीने लॉगइन केल्यानंतर आवश्यक ती माहिती भरून सबमिट करण्याव्यतिरिक्त प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेणारी व्यक्ती आपल्या घराच्या विविध टप्प्यांचे फोटोसुद्धा याच ॲपच्या सहाय्याने अपलोड करू शकते तसेच




घराचे बांधकाम सुरु असताना मिळणारे हप्तेसुद्धा ऑनलाईन पाहू शकते. याशिवाय या ॲपच्या सहाय्याने या योजनेवर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांपर्यंत आपले म्हणणे सहज पोचवू शकते.

## मेरी सडक




देशातील बहुतांश ठिकाणी रस्त्यांची अवस्था बिकट असणे ही सामान्य समस्या आहे. मेरी सडक ॲप्लीकेशन हे एक अँड्रॉईड ॲप असून ते तुम्ही आपल्या मोबाईल फोनवर इनस्टॉल करू शकता. हे ॲप पोस्ट बॉक्सप्रमाणे काम करते. याला तुम्ही तक्रार पेटीदेखील म्हणू शकता. या ॲपच्या सहाय्याने तुम्ही रस्त्यांवरील खड्डे, रस्त्यांच्या बांधकामासाठी वापरण्यात येणारे निकृष्ट दर्जाचे साहित्य इ. ची तक्रार करू शकता. शासन त्वरित




कारवाई करेल. यात प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत तयार करण्यात आलेल्या सर्व रस्त्यांचा समावेश आहे. तक्रारदार फीडबॅक कॉलममध्ये रस्त्यांचे फोटो पाठवू शकतो तसेच केलेल्या तक्रारीवर काय कारवाई करण्यात आली हेही पाहू शकतो.

## कौशल पंजी - स्किल रजिस्टर

ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे संचालित पं.दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (डी.डी.यू.जी.के.वाय.) अंतर्गत शासकीय ॲप "कौशल पंजी" द्वारे बेरोजगार आपली नोंदणी करू शकतात. त्यांना प्रशिक्षण देण्यात येईल आणि रोजगार उपलब्ध होईल. 15 ते 45 वर्षे वयोगटातील लोकांसाठी ही सुविधा उपलब्ध आहे. लाभार्थी स्वतः आपल्या मोबाईलमध्ये हे ॲप डाऊनलोड करून निःशुल्क नोंदणी करू शकतात. ♦

**Can be downloaded from**

GET IT ON Google Play

Download on the App Store



### ग्राम संवाद मोबाइल ॲप

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लक्ष्य आहे, अधिकाधिक ग्रामीण लोक डिजिटल इंडियाशी जोडले जावे आणि सशक्त व्हावे, ज्यामुळे विकास कामांची पारदर्शिता आरशाप्रमाणे स्वच्छ दिसेल. याच उद्देश्याच्या पूर्ततेकरिता ग्राम संवाद मोबाईल ॲप कार्यरत आहे. या ॲपच्या माध्यमातून ग्रामीण विकास योजनांची माहिती प्राप्त करता येते आणि विकास कार्यक्रमांच्या प्रगतीवर सरकारशी थेट संवाद साधू शकता येते.

# दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल योजना (डीडीयू-जीकेवाय)

# यशस्वी स्त्रियांच्या प्रेरक गाथा

## ट्रेनर होऊन इतर स्त्रियांनाही सक्षम करण्याचे स्वप्न न सोनू मंधारे

सोनू मंधारे नागपूरमधील कोलार गावच्या आहेत. त्यांचे कुटुंब अतिशय गरीब आहे. घरची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट असल्याने त्यांना बारावीनंतर शिक्षण सोडावे लागले. पाच जणांच्या कुटुंबात सोनूचे वडीलच कमवतेहोते. सोनूचे वडील मत्स्य फार्ममध्ये मजुरी करतात जेथे त्यांना फक्त 3500 रुपये एवढेच मासिक उत्पन्न मिळते.



धतरी फाउंडेशनमधून डीडीयू-जीकेवाय कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण घेतल्यानंतर सोनूला हैदराबाद यथील मेगस कस्टमर डायलॉग सोल्युशन येथे नोकरी मिळाली. सुरुवातीला त्यांचे मासिक वेतन 7800 होते. परंतु पुढे त्यांची मेहनत, मन लावून काम करणे आणि संवादकौशल्य पाहून ते वाढवून 10 हजार रुपये महिना एवढे करण्यात आले. याशिवाय त्यांना सेल इंसेन्टीव्ह मिळतात आणि त्यांचे एकूण वेतन 15 ते 22 हजारापर्यंत पोचते.

आता सोनू आपल्या कुटुंबास रोजचा खर्च भागवण्यास मदत करत आहे आणि आपल्या शिक्षणासाठी पैसे साठवत आहे. सोनूचे स्वप्न आहे डीडीयू-जीकेवायमध्ये ट्रेनर होणे जेणेकरून त्यांना आपल्यासारख्या गरीब व गरजू तरुणांना मदत करता यावी. ♦

## डीडीयू-जीकेवाय अंतर्गत रेवतीने घेतले प्रशिक्षण, कपड्यांच्या ऑनलाईन मार्केटिंगचे काम सुरु केले, कमावतेय 20 हजार रुपये महिना

मध्य प्रदेशमधील जैतपूर येथे राहणारी रेवती अतिशय गरीब कुटुंबातून आली आहे. तिला एकूण 9 बहिणी असल्याने त्यांचे कुटुंब बरेच मोठे आहे आणि वडिलांचे उत्पन्न फारच तुटपुंजे आहे. यामुळे कुटुंबाचे भरणपोषण करणे तिच्या वडिलांसाठी फारच कठीण होते.




यामुळेच रेवती आपले बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करू शकली नाही. वडिलांना मदत करता यावी म्हणून रेवती नोकरी शोधू लागली. परंतु तिच्याकडे कोणतेही कौशल्य किंवा प्रशिक्षण नसल्याने नोकरी मिळत नव्हती. अशातच दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल योजने (डीडीयू-जीके वाय) अंतर्गत खाद्य पदार्थांचे ट्रेनिंग मिळाल्याने रेवतीला आपल्या आवडीची नोकरी मिळू शकली. रेवतीला अहमदाबाद येथील धायला येथे असलेल्या जपानच्या याजकी कंपनीत सात हजार रुपये महिना उत्पन्न देणारी नोकरी मिळाली. तिचे काम चांगले असल्याने तिला लवकरच बढती मिळाली आणि तिचा पगार वाढवून 10 हजार करण्यात आला.

रेवतीने नोकरी करता-करता तिच्यासारख्या मोठ्या शहरात जाऊन नोकरी करू इच्छिणाऱ्या मुलींना मार्गदर्शन करणे सुरु केले. आपल्या आई-वडिलांना आणि बहिणींना मदत करण्यासाठी इंदोरला परतली. आता ती इंदोरच्या फॅशन इंडस्ट्रीमध्ये वितरकाचे काम करण्यासोबतच ऑनलाईन मार्केटिंग करून गारमेंट बिजनेस वाढवत आहे.

सध्या रेवती महिन्याकाठी 20 हजार रुपये कमावते आणि आपल्या आई-वडिलांना अधिक चांगले जीवन जगण्यात मदत करत आहे. ♦



सुश्री उमा भारती
कॅबिनेट मंत्री,
पेयजल व स्वच्छता
मंत्रालय, भारत सरकार

> “आपले गाव देशातील सर्वांत स्वच्छ गाव व्हावे यासाठी सामूहिक प्रयत्न करा आणि स्वच्छ सर्वेक्षण-2018 मध्ये उत्साहाने सहभागी व्हावे.”

# यशोगाथा

## पुणे येथील गावकऱ्यांनी पंढरपूर वारीस जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी आपली शौचालये खुली केली



### प्रभाव

**या वर्षी गावाने केलेल्या प्रयत्नांमुळे भाविकांच्या अडचणी काही प्रमाणात कमी झाल्या आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज मांढरे यांनी केलेल्या आवाहनामुळे हे शक्य झाले आहे. त्यांनी गावकऱ्यांना आवाहन केले की त्यांनी तीर्थकरूंना आपले पाहुणे समजून त्यांच्या यात्रेत सहकार्य करून पुण्याचे वाटेकरी व्हावे. जी घरे ही सुविधा उपलब्ध करून देण्यात तयार असतील त्यांनी याचे प्रतिक म्हणून आपल्या घरावर पांढरा झेंडा लावावा.**

पंढरपूर वारीच्या वाटेवरील गावाच्या लोकांनी एक प्रशासनीय पाऊल उचलले आहे. दरवर्षी 15 दिवस आयोजित करण्यात येणाऱ्या या तीर्थयात्रेच्या वाटेवर वसलेल्या गावांनी तीर्थकरुंसाठी आपली शौचालये वापरण्यास उघडी केली आहेत. महाराष्ट्रातील पुण्यात 333 वर्षे चालणाऱ्या परंपरेचा एक भाग म्हणून लाखो भाविक येथे येतात. ही यात्रा पंढरपुरात जाऊन संपते जेथे विठोबाचे देऊळ आहे. देवाच्या सन्मानार्थ संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या पादुका पालखीत घेऊन ही यात्रा काढण्यात येते. या यात्रेत लोक पिवळे आणि लाल झेंडे घेऊन जात असल्याने ही यात्रा अतिशय रंगीबेरंगी दिसते. संत ज्ञानेश्वरांची यात्रा आळंदीहून आणि संत तुकारामांची यात्रा देहू येथून निघते. ही यात्रा आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपुरात पोचते. त्यानंतर लोक विठ्ठल मंदिरात जाण्यापूर्वी चंद्रभागा नदीत स्नान करतात. यावर्षी ही यात्रा 6 जुलै रोजी सुरु होऊन 22 जुलैपर्यंत चालली. 250 किमीच्या या पायी यात्रेत भाविक 15 ठिकाणी थांबतात. रस्त्यावर वसलेली गावे ठिकठिकाणी खाण्या-पिण्याच्या वस्तूंचे स्टॉलसुद्धा लावतात.

मागील दोन वर्षांमध्ये स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)च्या अंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात दोन लाख शौचालये बांधण्यात आली. या यात्रेच्या एका रस्त्यावर 500 आणि दुसऱ्या रस्त्यावर 700हून अधिक सामुदायिक शौचालये बांधण्यात आलेली आहेत, परंतु भाविकांची संख्या पाहता ती पुरेशी नाहीत. याच वर्षी भाविकांच्या संख्येने 10 लाखाचा आकडा पार केला आहे. परंतु या वर्षी गावकऱ्यांच्या प्रयत्नांमुळे भाविकांच्या अडचणी काहीशा कमी झाल्या आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज मांढरे यांनी केलेल्या आवाहनामुळे हे शक्य झाले आहे. त्यांनी गावकऱ्यांना आवाहन केले की त्यांनी तीर्थकरूंना पाहुणे समजून त्यांच्या यात्रेत सहकार्य करून आपल्या पदरी पुण्य पडून घ्यावे. ही सुविधा देऊ करण्यास इच्छुक घरांनी याची खुण म्हणून आपल्या घरावर पांढरा झेंडा लावावा. असे केल्याने तीर्थकरूंना ही घरे शोधून काढणे सोयीचे होईल. जिल्हा परिषदेने केलेले हे आवाहन वर्तमानपत्रे, पोस्टर तसेच ब्लॉक पातळीवरील अधिकारी, शिक्षक, ग्रामसेवकांमार्फत लोकांपर्यंत पोचविण्यात आले. सुरज मांढरे सांगतात की लोकांनी या आवाहनाचे सहर्ष स्वागत केले. अपेक्षा नव्हती, परंतु गावकऱ्यांनी आपल्या घरातील शौचालये तीर्थकरूंना वापरण्यासाठी खुली करून दिली. परिणामी, गरीब लोकसुद्धा आपल्या शौचालयांची दारे तीर्थकरुंसाठी उघडत आहेत. या उपक्रमाचे आणि आवाहनाचे स्वागत ग्राम पंचायतीनेसुद्धा केले आणि इतर अनेक गावांमध्ये ते लागू करण्याचा प्रस्तावही पारित करण्यात आला. शासकीय प्रयत्नांसोबतच सामान्य लोकांच्या मदतीने हे अभियान यशस्वी ठरले. जिल्हा परिषदेने या शोभायात्रेच्या वाटेवर जनसुविधेसोबतच पिण्याचे पाणी आणि आरोग्य सुविधादेखील उपलब्ध करून दिल्या. जिल्हा परिषदेने मोटरसायकलने आरोग्य सुविधा पोचविण्याची व्यवस्था केलेली आहे आणि अहोरात्र कार्यरत असणारा नियंत्रण कक्षही स्थापित केला आहे. ♦

# सोनभद्रए सोडला स्वच्छतेचा संकल्प, महिनाभरात बांधली 50 हजार शौचालये



**"अबकी बरसात इज्जत घर के साथ"** या अभियानाने सोनभद्र जिल्हा हागणदारीमुक्त केला. या अभियानात सोनभद्रमधील प्रत्येक घराने भाग घेतला आणि महिनाभरात 50 हजार शौचालये बांधण्याचा संकल्प तडीस गेला. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालये बांधण्याचे काम 5 जून 2018पासून सुरु करण्यात आले होते. 5 जुलै रोजी हे अभियान पूर्ण झाले. या जिल्ह्याने घालून दिलेला कित्ता गिरवत संपूर्ण प्रदेशात याच प्रकारचे अभियान राबविण्यात येत आहे.

सोनभद्रचे मुख्य विकास अधिकारी श्री सुनील कुमार वर्मा यांनी सांगितले की सोनभद्र हा आदिवासी आणि गरिबांची सर्वात जास्त लोकसंख्या असलेला दुसऱ्या क्रमांकाचा जिल्हा आहे. विशेष बाब म्हणजे या क्षेत्रातील लोकांनी केलेल्या संकल्पामुळे हा जिल्हा हागणदारीमुक्त होऊ शकला आहे. मागील तीन वर्षांमध्ये येथे दीड लक्ष शौचालयांचे बांधकाम करण्यात आले आहे. याच कारणाने येथील स्वच्छतेची टक्केवारी 33 होती ती आता 70 एवढी झालेली आहे.

या क्षेत्रात 1349 गावे आहेत आणि यांपैकी 342 गावांमधून महसूल मिळतो. जागरूकतेच्या अभावापोटी सोनभद्र येथील लोग उघड्यावर शौचास जायचे. यात स्त्रियांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत असे. पावसाळ्यात लोकांना सर्पदंश होण्याची भीती वाटत असे. स्वच्छतेच्या मार्गातील सर्वांत मोठी अडचण होती ती सर्वांकडे शौचालय नसणे. याकडे लोकांचे लक्ष गेले आणि शासकीय प्रयत्नांमुळे या जिल्ह्यातील सर्व गावे आता हागणदारीमुक्त आहेत.

## कसे सुरु झाले हे अभियान

एवढ्या कमी कालावधीत 50 हजार शौचालयांचे बांधकाम करणे हे खरेच मोठे काम होते. पण प्रशासनाने लोकांच्या मदतीने येथे स्वच्छता अभियान सुरु केले. स्वच्छता व्हावी यासाठी जिल्हा प्रशासनाने स्वयंसहायता गट, अंगणवाडी कार्यकर्त्या, आरोग्य कर्मचारी इ.कडून

मदत घेतली. शौचालयांचे बांधकाम करत असताना सर्वात मोठी अडचण होती ती पाण्याच्या कमतरतेची, पण यावर उपाय शोधून काढून काम सुरु करण्यात आले. हे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करायचे असल्याने आधी संपूर्ण योजना आखण्यात आली.

### अभियानाची आखणी

या प्रदेशातील एवढ्या मोठ्या जिल्ह्यात एका महिन्यात 50 हजार शौचालयांचे बांधकाम करण्यासाठी एका जिल्ह्यात एक लक्ष खड्डे खणायचे होते. नियोजित वेळेत हे काम पूर्ण व्हावे यासाठी सर्वप्रथम सर्व लाभार्थ्यांना स्वीकृतीपत्रे देण्यात आली जेणेकरून प्रशासनाच्या या योजनेवर लोकांचा विश्वास बसावा. याशिवाय स्वच्छतेची शपथ देण्यात आली. लोकप्रतिनिधींनी स्वच्छ मॉन्सून बैठकी घेतल्या. या मोहिमेत "शिव चर्चा" या धार्मिक गटानेही आपली भूमिका वठवली. काम वेळेच्या आत पूर्ण व्हावे यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांनी आणि स्थानिक लोकांनी श्रमदानसुद्धा केले. मोहिमेत प्रशंसनीय कामगिरी बजावणाऱ्या लोकांना सन्मानित करण्यात आले. मोहिमेवर ग्रामपंचायत आणि जिल्हाधिकाऱ्यांनी देखरेख केली.

### सोशल मिडियाची महत्त्वाची भूमिका

या मोहिमेची गती वाढविण्यासाठी सोशल मिडियाची मदत घेण्यात आली. ट्विटर व फेसबुकच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. भिंतींवर पेंटींग्ज लावण्यात आली. पोस्टर, बॅनर लावण्यात आले. रथयात्रा, पथनाट्य तसेच हास्य नाटक, स्वच्छता दीदी यांच्यासह जनजागृती आंदोलन सुरु झाले. या कामात लहान मुलांनीही मोठ्यांना मदत केली. ही मोहीम अधिक परिणामकारक व्हावी म्हणून तिला जागतिक योग दिवस आणि जागतिक पर्यावरण दिवसाशी जोडण्यात आले. लोकांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. स्वच्छता, शिक्षण आणि आणि आरोग्याचे महत्त्व पटवू देण्यासाठी बाल स्वच्छता सेना तयार करण्यात आली. ♦

# शासकीय प्रयत्नांमुळे सिक्कीमला प्राप्त झाला स्वच्छ राज्याचा दर्जा



शासनाच्या इच्छाशक्तीने सर्वकाही शक्य होते. याचे सर्वात उत्तम उदाहरण आहे सिक्कीम. सिक्कीम सरकारने केलेल्या प्रयत्नांमुळे फक्त तीन वर्षांतच राज्यास हागणदारीमुक्त केले. 27 मे 2016 रोजी सिक्कीम हागणदारीमुक्त झाले आणि देशातील पहिले स्वच्छ राज्य झाले. हा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी राज्य शासन अजूनही प्रयत्न करत आहे. नवनवीन पावले उचलत लोकांचे जीवन अधिक चांगले करण्याच्या दिशेने प्रयत्न करण्यात येत आहेत.

### स्वच्छतेचा नमुना

राज्य स्वच्छ राखण्याच्या दिशेने सिक्कीम सरकारने अनेक कठोर व उत्तम पावले उचलली आणि ती यशस्वीही झाली. सिक्कीम पंचायत अधिनियम, 2005 मध्ये दुरुस्ती करण्यात आली आणि त्याअंतर्गत सर्व घरांमध्ये शौचालय बंधने सक्तीचे करण्यात आले. या संदर्भात शासनाने अधिसूचना काढून लोकांना आवाहन केले की त्यांनी या कामात शासनास सहकार्य करावे. शासकीय योजनांचा लाभसुद्धा घरी शौचालय बांधणाऱ्यांनाच मिळण्याची तरतूद करण्यात आली. या संदर्भात ग्राम विकास अधिकाऱ्याची भूमिका काय असेल तेही ठरविण्यात आले. त्यांना घरांची पाहणी करून त्यांना प्रमाणपत्र देण्याचे काम सोपविण्यात आले. प्रमाणपत्राच्या सहाय्याने लोकांना निवृत्तीवेतन योजना, शिष्यवृत्ती यांसारख्या शासकीय योजनांचा लाभ मिळणे शक्य झाले. प्रमाणपत्र मिळणे अत्यावश्यक असल्याने कितीतरी लोकांनी आपल्या घरी शौचालय बांधले आणि ते वापरू लागले.

याशिवाय राज्य शासनाने पर्यावरण स्वच्छ राखण्यासाठी आणि कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठीही प्रयत्न सुरु केले. प्लास्टिक व स्टायरोफोमचा वापर करून तयार करण्यात येणाऱ्या डिस्पोजेबल वस्तूंपासून होणाऱ्या

हानीकडे पाहता त्यांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली. सिक्कीममध्ये आता स्टायरोफोमपासून तयार करण्यात आलेले द्रोण, कप, प्लेट्स इ. वर पूर्ण बंदी आहे. या संदर्भात 19 मे 2016 रोजी एक अधिसूचना जारी करण्यात आली. याशिवाय शासकीय कार्यालयांमध्येही प्लास्टिकच्या वापरावर बंदी घालण्यात आली. शासकीय कार्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या प्लास्टिकच्या बाटल्यांवरही बंदी घालण्यात आली. शासकीय कार्यालयांसाठी शासनाने अधिसूचना जारी करून बैठका आणि कार्यक्रमांमध्ये पाण्याच्या प्लास्टिकच्या बाटल्यांऐवजी फिल्टर वापरण्याचे सुचविण्यात आले. प्लास्टिकमुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या दुष्परिणामांकडे पाहता या आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या. स्वच्छता हा विषय राज्य सरकारच्या कक्षेत येतो. यासाठी सिक्कीम सरकारने या दिशेने नियमित प्रयत्न सुरु ठेवले. हागणदारीमुक्त दर्जा टिकवून ठेवण्यासाठी नवनवीन पावले उचलण्यात आली. ग्रामीण पातळीवर देखरेख समित्या स्थापित करण्यात आल्या. या संदर्भात एक परिपत्रक काढण्यात आले ज्यात स्थानिक प्रशासनाची जबाबदारी काय ते ठरवून देण्यात आले. स्वच्छता निश्चित राखली जावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांची मदत घेण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी कचरा करणाऱ्यांवर दंड आकारण्याच्या नियमाचे पालन कठोरपणे करण्यात आले. ♦

### प्रभाव

**ग्रामीण स्तरावर निगरानी समित्या तयार करण्यात आल्या. या संबंधी परिपत्र काढण्यात आले असून त्यात स्थानिक प्रशासनाचे दायित्व निश्चित करण्यात आले आहे. स्वच्छतेची व्यवस्था निश्चित करण्याकरिता स्थानिक लोक प्रतिनिधी आणि अधिकारी यांचे सहकार्य घेण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणा-या लोकांकडून दंड वसूल करण्याचा सुद्धा नियम कठोरपणे लागू करण्यात आला.**

# केरळमधील कुन्नूर येथे गोबरधन योजनेतून साकारतेय संयंत्र



गोबरधन योजनेंतर्गत बायोगॅस निर्मितीचे काम सुरु झालेले केरळ हे देशातील पहिलेच राज्य आहे. कुन्नूर जिल्ह्यात गोबरधन योजनेंतर्गत पहिलेच बायोगॅस संयंत्र बसविण्याचे काम वेगाने सुरु आहे. कुन्नूर जिल्ह्यातील पप्पीनेस्सरी गावात बसविण्यात येणाऱ्या तुरुथी वेस्ट ट्रीटमेंट प्लांटमुळे गावातील कचऱ्याचीही विल्हेवाट लागेल. गोबरधन योजनेमुळे गावाला इंधन तर मिळेलच, शिवाय गावे स्वच्छदेखील होतील.

हे संयंत्र लागल्यामुळे गावातील शेण व शेतांमधील घन पदार्थांचे कम्पोस्ट, बायोगॅस आणि बायो-एनर्जीमध्ये रुपांतर करण्यात येईल. यामुळे गावातील सर्वानांच लाभ होईल. स्त्रियांना स्वयंपाकासाठी कमी दरात इंधन मिळेल, शेतकऱ्यांना खत मिळेल आणि तरुणांना रोजगाराच्या संधी उपलबध होतील.

गोबरधन (गॅल्व्हनायझिंग ऑर्गनिक बायो-अॅग्रो रिसोर्स धन) योजनेंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या या संयंत्रात दररोज 1000 किलोग्राम बायो कचरा वापरण्यात येऊ शकतो. या संयंत्राचे

तंत्रज्ञान भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटरमध्ये तयार करण्यात आले आहे. या संयंत्रात दररोज सुमारे 25 घन मीटर गॅस तयार होईल.

केरळच्या सूचित्वा मिशनच्या द्रवरूप कचरा व्यवस्थापनचे व्यवस्थापकीय संचालक एलपी छीतर यांनी सांगितले की सूचित्वा मिशन अंतर्गत केरळच्या प्रत्येक ग्राम पंचायतीस या संदर्भात प्रकल्प तयार करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. या प्रक्रीयेअंतर्गत योजनेचे तांत्रिक परीक्षण करण्यात येते. तांत्रिक मंजुरीनंतर स्वीकृत नोंदणीकृत एजन्सीला काम देण्यात येते. ग्राम पंचायत स्तरावर केंद्र स्थापित करण्यात आलेले असून त्याचे व्यवस्थापन करण्यासाठी 2-3 लोकांची नियुक्ती करण्याची योजना आहे. गोबरधन योजनेमुळे ग्रामीण लोकांना आणि विशेष म्हणजे स्त्रियांना लाभ होईल. गावे स्वच्छ होतील. यामुळे ग्राम पंचायतीच्या उत्पन्नाचे स्रोतही वाढतील. पंचायत स्तरावर बसविण्यात आलेल्या बायोगॅसपासून निर्माण होणाऱ्या जैविक इंधन, खत विक्रीमुळे उत्पन्नही मिळेल आणि यामुळे इतर विकास कामे होणे शक्य होईल. अशा प्रकारे लोकही सदर योजनेचा लाभ घेऊ शकतात. ♦

# जिंगल वाजवून लोकांना केले जागरूक, दारावरील घंटेत वाजते स्वच्छतेची धून




**परिणाम**

**कलीगे गावाच्या प्रत्येक घरी ती बसविण्यात आली आहे. सीईओ रवी यांनी सांगितले की कॉलिंग बेलद्वारे स्वच्छतेचे महत्त्व वारंवार अधोरेखित करता येते आणि लोकही त्याकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. दक्षिण कन्नड आणि उडुपी हे जिल्हे देशातील स्वच्छता दर्पण हा सन्मान मिळालेल्या 46 जिल्ह्यांमध्ये मोडतात. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत 20 सप्टेंबर 2016 रोजी हा जिल्हा हागणदारीमुक्त जाहीर करण्यात आला.**

कर्नाटकमधील दक्षिण कन्नड जिल्ह्यातील पंचायतीची चर्चा सर्वत्र होत आहे. स्वच्छतेच्या संदर्भात हा एक अनोखा उपक्रम आहे. या उपक्रमाने लोकांना स्वच्छतेबद्दल जागरूक केले आहे. लोकांनी इतरांना प्रेरणा मिळावी यासाठी स्वतःच्या घरी स्वच्छता बेल बसवली आहे. दारावरच्या बेलमधून उघडल्यावर शौचास बसणे, प्लास्टिकचा वापर, कचऱ्याचे व्यवस्थापन यांसारख्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. या उपक्रमाचे परिणाम आता या भागात दिसू लागले आहेत. हा जिल्हा आता हागणदारीमुक्त झालेला आहे. खरे पाहता, या उपक्रमास ग्राम पंचायतीचे मुख्य कार्यकारी अधकिारी डॉ. एम.आर.रवी यांनी सुरुवात केली. एम.आर.रवी यांनी कन्नड भाषेत एक कविता लिहिली आणि कवितेतून स्वच्छतेचा संदेश देणारे एक जिंगल साकारण्यात आले. तीस सेकंदांचे हे जिंगल सयादरी इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी दारावरच्या बेलमध्ये बसवून त्या लोकांना वाटल्या. अशा प्रकारची स्वच्छ कॉलबेल सर्वप्रथम जिल्हा पंचायतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या कार्यालयात बसविली. कार्यालयात येणाऱ्या लोकांवर या कॉलबेलचा सकारात्मक परिणाम होऊ लागला. अशा प्रकारे होणारा हा चांगला परिणाम पाहून कलीगे गावच्या लोकांनी प्रत्येक घरी हि बेल बसविली. सीईओ रवी यांनी सांगितले की कॉलबेलच्या माध्यमातून स्वच्छतेचे महत्त्व वारंवार सांगता येते आणि त्याकडे लोकांना दुर्लक्ष करता येत नाही. दक्षिण कन्नड आणि उडुपी हे जिल्हे देशातील स्वच्छता दर्पण हा सन्मान मिळालेल्या 46 जिल्ह्यांमध्ये मोडतात. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत 20 सप्टेंबर 2016 रोजी हा जिल्हा हागणदारीमुक्त जाहीर करण्यात आला. सीईओ रवी यांनी सांगितले की कॉलबेलच्या माध्यमातून स्वच्छतेचे महत्त्व वारंवार सांगता येते आणि त्याकडे लोकांना दुर्लक्ष करता येत नाही. नवीन पिढीस योग्य ती नीतिमूल्ये आणि सवयी लावणे आवश्यक आहे जेणेकरून स्वच्छता हा त्यांच्या जीवनातील आणि संस्कृतीचा अविभाज्य घटक व्हावा.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) बद्दल बोलायचे झाल्यास 2000 शाळांमधील 3.2 लाख विद्यार्थी स्वच्छता दिवस साजरा करतात. दर शनिवारी प्रत्येक वर्गात "स्वच्छता" या विषयावर अभ्यास घेण्यात येतो. "स्वच्छ शनिवार" हे स्वच्छतेचे प्रतिक ठरले आहे. शाळेतील असेम्ब्लीमध्ये स्वच्छतेवर विशेष कार्यक्रम तसेच श्रमदान कार्यक्रमही राबविण्यात येतो. येणाऱ्या काळात ही कॉलबेल

अंगणवाडी केंद्रांमध्येही बसविण्याची योजना आहे. या केंद्रांमध्ये रोज 30 हजार माता येतात. सध्या 1600 गावांमध्ये 2104 अंगणवाडी केंद्रे आहेत. यांपैकी बरीच गावे महामार्गावर स्थित असल्याने लोक महामार्गावरकचरा टाकतात. अशा लोकांवर कारवाई करण्यासाठी प्रशासनाने टास्क फोर्स तयार केले आहे जे या लोकांवर दंड आकारेल. स्वच्छतेचे गीत या लिंकवर ऐकता येऊ शकते- https://drive.google.com/file/d/1quA1TE_y09wuo3YK45u-Kj2z1ER-AZXxN/view?usp=sharing ♦

# 'पल्ले सुदलू' लोककलेने बदलल्या गावातील लोकांच्या सवयी



लोककला अभिव्यक्तीचे माध्यम असतात. लोककला आता बदलाचे सशक्त माध्यमसुद्धा ठरत आहेत. या लोककलाच लोकांना एकमेकांशी जोडतात. लोकांवर असलेला यांचा पगडा पाहून तेलंगणामधील वनापर्थी जिल्ह्यातील अधिकारी स्वेता मोहंती यांनी त्यांना समाजात बदल घडवून आणण्याचे माध्यम म्हणून वापरले. "पल्ले सुदलू" नावाच्या लोककलेस जनजागरुकतेचे माध्यम केले आणि जिल्ह्यातील स्वच्छता अभियानाशी कलाकारांना जोडले. "पल्ले सुदल" ही तेलंगणामधील एक लोककला असून तीत 5-7 कलाकार वाद्ययंत्रांच्या तालावर गात दिलखेचक गोष्टी ऐकवतात. सर्वसामान्य विषयांवर असलेल्या या गोष्टी अतिशय रंजक पद्धतीने ऐकवण्यात येतात आणि या गोष्टी हास्यरसाने परिपूर्ण असतात. या गोष्टी लोक अतिशय मन लावून ऐकतात. ही वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा असल्याने लोक मनाने जोडले गेले असतात.

जिल्हा अधिकाऱ्यांनी या लोककलेचा प्रभाव पाहता या माध्यमातून लोकांपर्यंत आपला संदेश पोचवण्यास सुरुवात केली. लोकांना उघड्यावर शौचास बसल्याने काय नुकसान होते याबद्दल माहिती देण्यात आली. वर्षानुवर्षे अंगात भिनलेल्या सवयी बदलण्यासाठी त्यांना प्रेरित करण्यात आले. आपल्या परंपरा आणि संस्कृतीशी ज्यांची नाळ जुळली आहे असे वयस्क लोकही जागरूक झाले आणि आपल्या घरात शौचालयाचे बांधकाम करण्यास तयार झाले. जिल्ह्यातील सर्व पंचायतींमध्ये दररोज 'पल्लू सुदलू'चा एक कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. या गोष्टींमध्ये स्वच्छतेचे संदेश गोवण्यात येतात. जिल्हा अधिकारी भारत कुमार यांनी सांगितले की हे कलाकार गावच्या लोकांच्या भावना व्यक्त करतात. त्यामुळे हा संदेश थेट लोकांच्या मनाला जाऊन भिडतो. कलाकार लोकांच्या समस्या आपल्या संवादांमधून मांडतात. त्यावर उपाय सांगतात. गावातील सामान्य माणूस होऊन लोकांशी बोलतात. या कार्यक्रमाने स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) ला यश प्राप्त झाले. 2 जून 2018 रोजी तेलंगणाच्या स्थापना दिनी 50 गावे उघड्यावर शौचमुक्त घोषित करण्यात आली. ही मोहीम पुढे तशीच सुरु ठेवण्यासाठी ग्राम पंचायतींनी देखरेख समिती तयार केली असून त्यातील सदस्य गावातीलच लोक असतात. हि समिती दररोज आपले काम करते आणि उघड्यावर शौचास बसणाऱ्यांना समज देते. ♦

## परिणाम

**जिल्हा अधिकाऱ्यांनी या लोककलेचा प्रभाव पाहता तिच्या माध्यमातून लोकांपर्यंत आपला संदेश पोचवणे सुरु केले. लोकांना उघड्यावर शौचास बसण्याच्या दुष्परिणामांबद्दल सांगण्यात आले. वर्षानुवर्षे अंगी भिनलेल्या सवयी सोडण्यासाठी लोकांना प्रेरित करण्यात आले.**

# तुम्हाला माहित आहे?

**सांडपाणी व कचरायुक्त गाळाच्या व्यवस्थापनासाठी कितीतरी प्रकारचे तंत्रज्ञान वापरण्यात येते**



## मलयुक्त गाळापासून खत बनविण्याची प्रक्रिया (कंपोस्टिंग)

मलयुक्त गाळाच्या व्यवस्थापनाकरिता कंपोस्टिंगची महत्वाची भूमिका असते. ही खत तयार करण्याची प्रक्रिया असून यात जीवाणुंच्या मदतीने अपशिष्ट सडविले जाते. या प्रक्रियेपासून तयार जैविक खताचा उपयोग शेतीमध्ये करण्यात येतो.

## सांडपाणी शुद्धीकरण तलाव

या तंत्रज्ञानामध्ये अनेक लहान-मोठ्या तळ्यांची गरज असते. सर्व तळी एकमेकांना जोडलेली असतात. जोवर पाणी व घन कचरा वेगवेगळा होत नाही तोवर प्रत्येक पातळीवर सांडपाणी गाळण्याची प्रक्रिया सुरुच असते. या प्रकारच्या तंत्रज्ञानातून प्राप्त होणाऱ्या पाण्याचा उपयोग हल्ली बागांमध्येही करण्यात येत आहे.

## खोल खड्डे खणून सांडपाणीयुक्त गाळाचे व्यवस्थापन

या प्रक्रियेत कचरा व सांडपाणीयुक्त गाळ विल्हेवाट लावण्यासाठी खोल खणलेल्या खड्ड्यात टाकण्यात येतात. मग तो खड्डा मातीने भरण्यात येतो. त्यावर रोपे लावण्यात येतात. कचरा व्यवस्थापनाच्या या प्रक्रियेत जमिनीची गरज पडते. त्यामुळे जेथे जमीन उपलब्ध असते तेथे हे अगदी कमी खर्चात केले जाऊ शकते.

## खड्ड्यांमध्ये सांडपाणीयुक्त गाळाचे व्यवस्थापन

भारतात या प्रकारचे व्यवस्थापन बराच काळापासून करण्यात येते. अमेरिकेत सुद्धा 80च्या दशकात याच प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर केला जात असे. दक्षिण आफ्रिका आणि मलेशियामध्ये सध्या या प्रक्रियेचा वापर करून सांडपाणीयुक्त गाळाचे व्यवस्थापन करण्यात येते. यासाठी खोल व कमी खोल असलेल्या खड्ड्यांची गरज असते. खड्डे व त्यांच्या आजूबाजूला झाडे लावण्यात येतात.

## सांडपाणीयुक्त गाळ व्यवस्थापन संयंत्र (एफएसटीपी)

सिवेज संयंत्रात कितीतरी तंत्रज्ञान मॉड्यूल सामील करण्यात येतात. यात एक सेप्टिक टँक, रिॲक्ट व फिल्टर, दलदल असलेली जमीन, सांडपाणीयुक्त गाळ पाण्यापासून वेगळा करणारी प्रणाली, बायोगॅस संयंत्र व खत तयार करण्यासाठी जागेची गरज असते.

## गोबरधन योजना म्हणजे काय?

गोबर (गॅल्व्हनायझिंग ऑरगनिक बायो ॲग्रो रिसोर्स) धन योजना स्वच्छता व पेय जल मंत्रालयाने 30 एप्रिल 2018 रोजी सुरु केली. या योजनेत शेन व शेतांमधील घन कचऱ्यापासून कम्पोस्ट, बायोगॅस आणि बायो-सीएनजी तयार करण्याचे काम सुरु झाले आहे. या गावांमध्ये शेणापासून वीजनिर्मिती करून उर्जेची गरज तर भागविली जात आहेच शिवाय रोजगाराच्या नवीन संधीही दिल्या जात आहेत.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) चे दोन प्रमुख पैलू असून त्यांत गाव स्वच्छ राखणे आणि ते उघड्यावर शौचमुक्त करण्यासोबतचा गाळाच्या व्यवस्थापनाचाही समावेश करण्यात आलेला आहे. देशातील गावे हागणदारीमुक्त होत आहेत आणि त्यामुईल सांडपाणीयुक्त गाळाचे व्यवस्थापन करण्याच्या दिशेने काम करण्यात येत आहे. गावे हागणदारीमुक्त करण्याबरोबरच आत दुसऱ्या टप्प्यात गाळाचे व्यवस्थापन करण्यासाठी ठोस पावले उचलण्यात येत आहेत. गाळाच्या व्यवस्थापनात गोबरधन योजना उपयोगी ठरत आहे. सदर आर्थिक वर्षात देशातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये 700 बायोगॅस संयंत्रे बसविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ♦





# निर्मल गंगेसाठी गावकऱ्यांनी काढली स्वच्छता कलश यात्रा

## हसत-खेळत गंगा स्वच्छ करण्याची कल्पना



### परिणाम

**यामुळे स्वच्छता मोहिमेत लोक निश्चित भाग घेतात. जिल्ह्यात दिवस दररोज स्वच्छता भजन गाऊन सुरु होतो, त्यानंतर काही वेळ लोक काही तास गंगा नदीकिनारी प्लास्टिक, कचरा वेचतात, नदीच्या काठी झाडे लावतात आणि सायंकाळी गंगा आरती करतात. गंगा आरतीमुळे लोकांमध्ये उत्साह संचारतो आणि लोक या कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. तरुणांना या जागरूकता कार्यक्रमांमध्ये सामील करून घेण्यासाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.**

लोकांनी मिळून प्रयत्न केले तर नेहमीच सकारात्मक बदल घडून येतात. याचा फायदा समाजातील लोकांनाही होतो. झारखंडमधील साहिबगंज जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत असाच सकारात्मक बदल पहावयास मिळत आहे. जिल्ह्यातील लोकांना या स्वच्छता अभियानात समाविष्ट करून घेण्यासाठी स्वच्छता फुटबॉल स्पर्धा, स्वच्छता कलश यात्रा, गंगा आरती सुरु करण्यात आली. यासोबतच 30 मे ते 5 जूनपर्यंत जागतिक पर्यावरण आठवडा साजरा करण्यात आला. या सर्व कार्यक्रमांमध्ये लोकांनी हिरीरीने भाग घेतला. गंगा स्वच्छ व प्लास्टिकमुक्त करण्यासाठी लोकांनी श्रमदान केले. यामुळे स्वच्छता मोहिमेत लोक निश्चित भाग घेतात. जिल्ह्यात दिवस दररोज स्वच्छता भजन गाऊन सुरु होतो, त्यानंतर काही वेळ लोक काही तास गंगा नदीकिनारी प्लास्टिक, कचरा वेचतात, नदीच्या काठी झाडे लावतात आणि सायंकाळी गंगा आरती करतात. गंगा आरतीमुळे लोकांमध्ये उत्साह संचारतो आणि लोक या कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. तरुणांना या जागरूकता कार्यक्रमांमध्ये सामील करून घेण्यासाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. साहिबगंजमध्ये सुरु करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे गावागावात स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण झाली आहे. साहिबगंजमध्ये स्वच्छता मिशन अंतर्गत उचलण्यात आलेली काही पावले-




**स्वच्छता कलश यात्रा:** या कलश यात्रेत रंगीबेरंगी कपडे घातलेल्या गावातील स्त्रिया गंगेच्या पाण्याने भरलेल्या घागरी घेऊन निघतात. या यात्रेत त्या लोकांना शौचालयांचे महत्त्व समजावून सांगतात. गंगा आरतीने या यात्रेची सांगता करण्यात येते. स्त्रियांनी सुरु केलेल्या या उपक्रमामुळे लोक नदी स्वच्छ राखण्याबद्दल जागरूक झाले आहेत.

**स्वच्छता फुटबॉल स्पर्धा:** साहिबगंज मधील सर्व ब्लॉकमध्ये घेण्यात येणाऱ्या फुटबॉल स्पर्धांमध्ये तरुणांना सामील करून घेण्यात येते. यात ग्रामीण भागातील खेळांचाही समावेश करण्यात येतो. या खेळांच्या माध्यमातून तरुणांना जोडण्यासाठी पठणा ब्लॉकने सुरुवात करत या खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्या. ♦



# कांचीपुरमने ठेवला आदर्श, निरुपयोगी पडून असलेली 8326 शौचालये केली वापरण्याजोग

रेशमी साड्यांसाठी प्रसिद्ध असेलेल्या कांचीपुरम समावेश आता स्वच्छ शहरांमध्येही होत आहे. प्रशासन आणि लोकांच्या प्रयत्नांमुळे कांचीपुरम आता हागणदारीमुक्त शहर झाले आहे. कांचीपुरमला हा दर्जा 27 फेब्रुवारी 2018 रोजी प्राप्त झाला. हा दर्जा प्राप्त करण्यासाठी प्रशासनाने आधीपासून निरुपयोगी असलेली शौचालये वापरण्याजोगी करण्याची शपथ वाहिली. या अंतर्गत जिल्ह्यातील 8326 शौचालये वापरण्यालायक करण्यात आली.

मागील काही महिन्यांत कांचीपुरममधील 8326 शौचालये वापरण्याजोगी करण्यात आलेली आहेत. 2012 मध्ये कांचीपुरममध्ये एक सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात असे लक्षात आले की जिल्ह्यातील सर्व ब्लॉकमधील 8326 शौचालये कामात येत नाहीत. यातील सुमारे साडे तीन हजार शौचालये तर वापरण्याच्या लायकीचीही नव्हती. हे खरे आहे कि काय ते तपासण्यासाठी जिल्हा अधिकाऱ्यांनी 8326 शौचालयांचे पुन्हा सर्वेक्षण केले आणि त्यात त्यांना ही बाब खरी असल्याचे आढळले. यापैकी 5000 शौचालयामधील कमतरता दूर करून त्यांना वापरात आणण्यात आले. यांपैकी 3326 शौचालये वापरण्याजोगी नसल्याने त्यांच्याऐवजी नवीन शौचालये तयार करण्यात आली. यासाठी त्या कुटुंबांना आर्थिक मदत करण्यात आली. स्वयंसहायता गटांच्या मदतीने बांधकाम करण्यात आले. या कामावर देखरेखसुद्धा स्वयंसहायता गटांनीच केली. या सर्व उपक्रमांच्या काय परिणाम झाला याचे परीक्षण करण्यासाठी ऑक्टोबर 2017 मध्ये पुन्हा एकदा सर्वेक्षण करण्यात आले. लोकांनी आणि प्रशासनाने घेतलेल्या या पुढाकारामुळे कुंड्राथुर, सेंट थॉमस माउंट, थीरूपोरूरमध्ये उत्तम परिणाम झाले. या ठिकाणी शौचालये दुरुस्त करण्यात आलेली असून लोक आता त्यांचा वापरही करत आहेत. ♦

| ब्लॉक | शौचालयांची संख्या |
|---|---|
| 1.कांचीपुरम | 541 |
| 2.आचिरुपाक्कम | 603 |
| 3.चितामुर | 552 |
| 4.काट्टान्कुलत्तुर | 344 |
| 5.कुंड्रत्तूर | 1437 |
| 6.लत्तूर | 374 |
| 7.मादुरांतकम | 482 |
| 8.श्रीपेरुम्बदूर | 186 |
| 9.सेंट थॉमस माउंट | 435 |
| 10.तीरुपोरूर | 463 |
| 11.तीरूकल्कुण्ड्रम | 308 |
| 12.उत्तिरमरूर | 2360 |
| 13.वालाजाबाद | 241 |
| **एकूण** | 8326 |

यशोगाथा

# पंतप्रधानांच्या प्रेरणेने गायत्री तयार करत आहे राणी राजमिस्त्री

अफूची शेती आणि मानवी तस्करीसाठी कुविख्यात असलेले झारखंडमधील खुंटी या जिल्ह्यातील गुटजोरा या गावातील गायत्रीची गोष्टच जरा वेगळी आहे. ती आता सामान्य रेजा (महिला मजूर) नाही. बांधकाम स्खेत्रात पुरुष राजमिस्त्रींचेच वर्चस्व असताना गायत्री राणीने स्वतः राजमिस्त्री होऊन त्यांच्यात स्थान पटकावले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीं तिच्याशी व्हिडीओ कॉन्फरन्सवर 8 मिनिटे बोलले आणि तिची प्रशंसा केली. यामुळे गायत्रीचा उत्साह अधिकच वाढला. आता ती आपल्या भागात स्वतःसारख्या इतर राणी मिस्त्री तयार करण्याच्या कामात व्यस्त झाली आहे. खुंटीमधील मागास भागातील गायत्रीने राणी मिस्त्री प्रशिक्षण प्रशिक्षण घेऊन पंतप्रधानांच्या स्वच्छता अभियानात मदत केली आणि शौचालयांचे बांधकाम केले. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरे बांधली आणि अधिक घरे बांधत आहे. तिने स्वतः आपले घर बांधले. पंतप्रधानांनी प्रशंसा केल्याने ती प्रेरित होऊन इतर



महिलांनाही राणी मिस्त्री होण्याचे प्रशिक्षण देत आहे. ती 30 लोकांच्या गटास प्रशिक्षण देत आहे जेणेकरून त्यांच्या हातालाही काम मिळावे आणि इतरांचीही घरे बांधली जावीत. त्यांच्या कामाची प्रशंसा ऐकून शेजारी जिल्ह्यातील लोकही त्यांच्याबद्दल विचारणा करू लागले आहेत. गुमला व सिमडेगा जिल्हा प्रशासनानेसुद्धा गायत्रीला आपल्याकडे प्रशिक्षण देण्यासाठी आमंत्रित केले आहे. राज्य सरकारकडूनही राजमिस्त्रीप्रमाणे महिलांना राणी मिस्त्री प्रशिक्षण देण्यात येत आहे. गायत्री सांगते की 2016मध्ये राणी मिस्त्री प्रशिक्षण प्राप्त केल्यावर तिने तीन शौचालयांचे आणि प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत 15 घरांचे बांधकाम केले आहे. लोकांना माझे काम आवडत आहे. माझे घरही झोपडीवजा होते, मी माझ्या घराचा तळ मजला स्वतःच बांधला. नवऱ्याने आणि पतीनेही मदत केली.

**खुंटीमधील स्त्रिया होताहेत प्रशिक्षित:** खुंटीमधील सुमारे एक डझन स्त्रियांनी राज मिस्त्री प्रशिक्षण घेतले आणि त्या आता राणी मिस्त्री झाल्या आहेत. त्या लोकांच्या स्वप्नातील घरे बांधत आहेत. अशा स्त्रिया समाजातील इतर स्त्रियांसाठी प्रेरणास्रोत ठरत आहेत. लोक त्यांच्या कामाची प्रशंसा करत आहेत. पंतप्रधान मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून देशभरातील महिलांशी संवादाच्या कार्यक्रमात खुंटीमधील तीन राणी मिस्त्रींशी संवाद साधला. या स्त्रियांनी आपले अनुभव पंतप्रधानांना सांगितले. पंतप्रधानांनी गायत्रीशी तब्बल 8 मिनिटे संवाद साधून सर्व माहिती घेतली. ♦

# संध्याने सोडला नोकरीचा मोह आणि झाली स्वच्छता दूत

छत्तीसगडमधील बिलासपूरच्या शेजारी असलेल्या सकरी नगर पंचायतीमधील संध्या बग्गा वाणिज्य पदवीधारक आहे. तिच्यासाठी शहरात जाऊन नोकरी करण्याचे सर्व मार्ग मोकळे होते. चांगल्या खाजगी नोकऱ्याही उपलब्ध होत्या. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छतेशी संबंधित विचारांनी प्रेरित होऊन तिने स्वच्छता दूत होण्याचा निर्णय घेतला. ती एका स्वयंसहायता गटाशी संधान साधले आणि गावाच्या स्वच्छतेची जबाबदारी सांभाळत आहे. 24 वर्षे वय असलेली संध्या गावातच सफाई कामगार म्हणून काम यशस्वीपणे करत आहे. स्वयंसहायता गटाकडून तिला मासिक पाच हजार रुपये मिळतात, परंतु पैशापेक्षा जास्त समाधान तिला आपल्या कामामुळे मिळते. संध्याने घरोघरी जाऊन कचरा संकलित करून गाव स्वच्छ ठेवण्याचा संकल्प सोडला आहे. ती रिक्षाने कचरा घेऊन जाते. पहिल्यांदा रिक्षा चालवली तेव्हा तिला जखम झाली, लोकांनीही तिची टर उडवली, पण पंतप्रधानांच्या प्रेरणेने काम करणाऱ्या संध्याने या सर्व



रिक्शाने कचरा नेणारी नगर पंचायत सकरी निवासी संध्या बग्गा

बाबींकडे दुर्लक्ष केले. संध्या सांगते की काहीतरी वेगळे करण्याची आणि कुटुंबाचे पालनपोषण करण्याची वडिलांची जबाबदारी वाटून घेण्याची तिची इच्छा होती. तिच्यासाठी शहरात जाऊन नोकरी करण्याचा पर्याय खुला होता, पण तिने गावातच राहून सार्थक असे काहीतरी करण्याचा निर्णय घेतला. ती मणीकांचन केंद्र या स्वयंसहायता गटाच्या संतोषी दीदींच्या संपर्कात होती. त्यांनीच तिला या समाधान देणाऱ्या कामाबाबत मार्गदर्शन केले. पहिल्यांदा रिक्षा हाती घेतली तेव्हा मनात जरासा संकोच होता, परंतु जसजसे लोक सहकार्य करू लागले तसतसा तिचा निर्णय ठाम होत गेला. टोमण्यांकडे लक्ष न देता हे काम करत राहणारी संध्या म्हणते की कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते, तर आपले विचारच तसे असतात. सुरुवातीला तिचे वडील तिच्यावर रागावले होते. सामाजिक मर्यादा आणि लोकलाजेखातर तिने हे काम करू नये असे त्यांचे म्हणणे होते, परंतु मुलीचे श्रम आणि हिम्मत पाहून तेही तिच्या बाजूने उभे राहिले. संध्याच्या मते स्वच्छता हे सर्वात पुण्याचे काम आहे. हे काम हीन दर्जाचे असते तर गांधीजी ते पंतप्रधान मोदी यांचेपर्यंत सर्वांनी स्वच्छता अभियानास पाठींबा दिला नसता. स्वच्छतेमुळेचा आम्हाला स्मार्ट शहरांच्या यादीत स्थान मिळाले. यामुळेच मी आयुष्यभर स्वच्छतेची पहारेदार होऊन काम करत राहीन. ती संध्याकाळी गावात बैठक भरवून स्वच्छतेबाबत स्त्रियांमध्ये जागृती करते. ♦

# इंदौर जिल्हा ग्रामीणचे स्वच्छता संदेशवाहकः चतुरसिंग-मॅडम बातूनी

इंदौर जिल्हा ग्रामीण जानेवारी 2016 मध्ये हागणदारीमुक्त झालेला आहे. यानंतर हीच स्थिती कायम राखण्यासाठी तर लोक प्रयत्नशील आहेतच, शिवाय गावातील घन व द्रवरूप कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठीसुद्धा कारवाई करण्यात येत आहे. प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये सीसी रस्ते आणि नाल्यांच्या बांधकामांसोबतच सुमारे 30 ग्राम पंचायतींमध्ये मोटराईझ्ड कचरा वाहून नेण्याद्वारे कचरा संकलन व तो वेगवेगळा करण्याचे काम करण्यात येत आहे. काही ग्राम पंचायतींमध्ये स्थानिक स्रोतांचा वापर करत कचऱ्याचे संकलन करण्यात येत आहे.

मागील दोन वर्षांपासून शहरी भागांमधील स्वच्छतेच्या सर्वेक्षणात इंदौर जिल्हा पहिल्या क्रमांकावर आहे. यावर्षी स्वच्छता सर्वेक्षण ग्रामीण 2018 ची सुरुवात करण्यात आलेली असून यात शहरांप्रमाणेच ग्रामीण स्वच्छतेसाठी जिल्ह्यांना क्रमांक देण्यात येतील.

इंदौर जिल्हा पंचायतीत एक अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. शुभंकराच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश घरोघरी पोचविणारी इंदौर जिल्हा पंचायत भारतातील पहिलीच जिल्हा पंचायत ठरली आहे. इंदौर जिल्ह्याच्या स्वच्छता वाहकासाठी स्थानिक माळवा संस्कृती लक्षात घेऊन भूमिका निर्धारित करण्यात आली आणि यात चतुरसिंग व मॅडम बातूनी नावाच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. चतुरसिंग व मॅडम बातूनी ही स्थानिक माळवा पोशाख घातलेली आणि हातात स्वच्छतेचे प्रतिक म्हणून बादली व केरसुणी घेतलेली पुरुष व स्त्री चरित्रे आहेत.

शुभंकर चतुरसिंग व मॅडम बातूनीचे अनावारण दि. 21.08.18 रोजी जिल्हा पंचायत इंदौर यांचेद्वारे जिल्हा परिषदेच्या माननीय अध्यक्ष सुश्री कविता




पाटीदार आणि जिल्हाधिकारी श्री निशांत वरवडे, मुख्य कार्यपालन अधिकारी सुश्री नेहा मीना आणि जिल्हा पंचायतीच्या सदस्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

इंदौरने ज्या प्रकारे स्वच्छता संग्रामास विशेष अभियानाच्या नजरेतून पाहत जिल्हा हागणदारीमुक्त केला त्याचप्रमाणे स्वच्छतेच्या पुढील इतर घटकांची पूर्तता अभियानाच्या स्वरुपात करणे हा शुभंकरच्या चरित्रनिर्मितीचा उद्देश आहे. शुभंकरची निर्मिती करत असताना या बाबीकडे विशेष लक्ष देण्यात आले की हे चरित्र परिणामकारक, ग्रामीण जनतेसाठी स्वीकारण्याजोगे असावे तसेच माळवा प्रांताचे प्रतिनिधित्व करणारे असावे. लोकांना हे चरित्र आपल्यापैकीच एक असल्यासारखे वाटावे याकडे विशेष लक्ष देण्यात आले जेणेकरून ते देत असलेला संदेश स्वीकारणे त्यांना सहज शक्य व्हावे. यासाठी जिल्हाधिकरी व लालित्य फाउंडेशन यांचे मार्फत चतुरसिंग व मॅडम बातूनी माळवा संस्कृतीने प्रेरित लोकनायकांच्या स्वरुपात स्वच्छतेचा संदेश गावोगावी तर पोचवतीलच शिवाय पथनाट्याद्वारे ही चरित्रे जिवंत करून जनजागृतीही करण्यात येईल.

शुभंकर चतुरसिंग व मॅडम बातूनी यांचा उपयोग जिल्ह्यातील ग्रामीण स्वच्छता अधिक उत्तम करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये, कार्यक्रमांमध्ये करण्यात येईल. या चरित्रांवर आधारित जिवंत मस्कटचीही निर्मिती करण्यात येईल. याशिवाय यावर आधारित कॉमिक बुकसुद्धा तयार करण्यात येईल ज्यात स्वच्छतेच्या सर्व घटकांचा समावेश करत प्रबोधन करण्याऱ्या गोष्टींचा समावेश करण्यात येईल.

**1. जिवंत चरित्रः** शुभंकरांच्या उपयोग ग्रामीण भागात स्वच्छतेच्या सवयी लावण्यासाठी आणि त्यांच्या जुन्या सवयी बदलण्यासाठी करण्यात येत असून यात कलाकार या चरित्रांच्या वेशभूषेत लोकांमध्ये जातात आणि रंजक पद्धतीने लोकांचे प्रबोधन करण्यात येते.

**2. कॉमिक बुकः** मुलांना अगदी बालपणापासूनच स्वच्छतेच्या सवयी लागाव्यात यासाठी स्वच्छतेच्या सर्व घटकांवर आधारित कॉमिक बुक तयार करण्यात व त्यांचे वितरण करण्यात येत आहे.

**3. भित्तीपत्रकेः** सदर चरित्रांवर आधारित गोष्टींच्या माध्यमातून संदेश घरोघरी पोचविण्यात येईल.

**4. सोशल मिडियाः** चतुरसिंग व मॅडम बातूनी....स्वच्छता के संदेशवाहक या नावाने एक मंच उपलब्ध करून देण्यात येईल जेथे लोकांना आपले विचार व सूचना मांडता येतील.♦

# राउंड अप ॲक्टीविटी

## स्वच्छता पंधरवडा












स्वच्छता पंधरवड्यास पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने एप्रिल 2016 मध्ये सुरुवात करण्यात आली. सर्व मंत्रालये व विभागांनी या स्वच्छता अभियानाशी जोडून घेतले आणि स्वच्छतेप्रति जागरूकता अभियान सुरु केले. सर्वांनी या उद्दिष्टात सामील व्हावे यासाठी जुलै 2018मध्ये कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, दिव्यांग सशक्तीकरण विभाग, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय आणि पृथ्वी विज्ञान मंत्रालयांनी स्वच्छता पंधरवडा साजरा केला.

### स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) एका दृष्टीक्षेपात

- **देशभरात 2 ऑगस्ट , 2018 पर्यंत स्वच्छतेचा दर 89.07 टक्के**
- **2 ऑक्टोबर , 2014 पासून आतापर्यंत 7,97,14,455 सौचालयांची निर्मिती**
- **4,09,442 गाव खुल्या जागेत शौचापासून मुक्त घोषित**
- **नमामि गंगे अंतर्गत 4465 गाव खुल्या जागेत शौचापासून मुक्त घोषित**
- **421 जिल्हे खुल्या जागेत मुक्त घोषित**
- **19 राज्य व केन्द्र शासित राज्य खुल्या जागेत शौच मुक्त घोषित**

## स्वच्छ प्रतिष्ठित स्थान (एसआयपी)

पेयजल व स्वच्छता मंत्रालयाने देशातील 100 प्रतिष्ठित ठिकाणे स्वच्छ करण्याची योजना तयार केली. पर्यटन व संस्कृती मंत्रालय आणि शहरी विकास मंत्रालयांच्या मदतीने देशभरातील 100 प्रतिष्ठित ठिकाणांची निवड करण्यात आली. या योजनेत खाजगी कंपन्यांनाही सामील करून घेण्यात आले आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात 20 ठिकाणांची निवड करण्यात आली. या ठिकाणी स्वाच्छतेची व्यवस्था चौक




चौबंद करण्याची योजना आखण्यात आली. याशिवाय 10 नवीन प्रतिष्ठित ठिकाणांचीही निवड करण्यात आली ज्यांत श्री राघवेंद्र स्वामी मठ मंत्रालयम (आंध्रप्रदेश), हजारदौली का महल (पश्चिम बंगाल), श्री ब्रह्मा सरोवर मंदिर (हरियाना), विदुर कुटी मंदिर (उत्तर प्रदेश), माना गाव (उत्तर प्रदेश), पँगाँग सो (जम्मू व काश्मीर), श्री नागवासुकी मंदिर (उत्तर प्रदेश), नूपी कीथल (मणिपूर), श्री धर्म संस्था मंदिर (केरळ) व कण्वाश्रम (उत्तराखंड) यांचा समावेश आहे.

## स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण 2018

पेयजल व स्वच्छता मंत्रालयाने 2018 या वर्षात देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये स्वच्छता सर्वेक्षणास सुरुवात केली. हे सर्वेक्षण 1 ऑगस्ट ते 31 ऑगस्ट पर्यंत करण्यात आले. या सर्वेक्षणात स्वच्छतेच्या सर्व पैलूंचा विचार करण्यात आलेला आहे. या सर्वेक्षणात प्रथम स्थान पटकाविणाऱ्या राज्यांना व जिल्ह्यांना 2 ऑक्टोबर 2018 रोजी पुरस्कार देण्यात येईल. स्वच्छह सर्वेक्षण ग्रामीण मध्ये 6980 गावांना व 698 जिल्ह्यांना सामील करून घेण्यात आले. एकूण 34000 सार्वजनिक ठिकाणी सर्वेक्षण करण्यात आले ज्यात शाळा, अंगणवाडी, सार्वजनिक आरोग्य केंद्रे, बाजार, धार्मिक स्थळे इ.चा समावेश करण्यात आला. या सर्वेक्षणात लोकांचेही मत घेण्यात आले. सुमारे 50 लक्ष लोकांची




मते घेण्यात आली.

## स्वच्छ संग्रह

स्वच्छ संग्रह हे एक वेब पोर्टल असून यावर मंत्रालयाच्या योजना व स्वच्छतेशी संबंधित योजनांबद्दलची माहिती अपलोड करण्यात आलेली आहे. या वेब पोर्टलवरून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) बद्दल माहिती घेतली जाऊ शकते. या पोर्टलवरून वेगवेगळ्या ग्राम पंचायती एकमेकिंकडून बरेच काही शिकू शकतात. त्यांनी उचललेल्या यशस्वी व प्रशंसनीय पावलांची माहिती त्या इतरांना देऊ शकतात. स्वच्छ भारत मिशनचे उद्दिष्ट सफल करण्याच्या दिशेने हे उपयोगी ठरेल. क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. ♦

सत्यमेव जयते

**भारत सरकार**

**पंचायती राज मंत्रालय**

**यांचेद्वारे 2019 (मूल्यांकन वर्ष 2017-18 करिता) दरम्यान**

# राष्ट्रीय पुरस्कार

देण्यासाठी ऑनलाईन नामांकने आमंत्रित आहेत

**दीन दयाल उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार (डीडीयूपीएसपी)**

पंचायतींच्या (ग्राम, मध्यवर्ती व जिल्हा)
सर्व तीन पातळ्यांसाठी सामान्य व विषयवार श्रेणींमध्ये

**नानाजी देशमुख राष्ट्रीय गौरव ग्राम सभा पुरस्कार (एनडीआरजीजीएसपी)**

ग्राम सभेत यशस्वी कामगिरी केल्याबद्दल ग्राम पंचायतींना

**ग्राम पंचायत विकास योजना पुरस्कार**

पंचायती राज मंत्रालयाने जारी केलेल्या मॉडेल मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि राज्ये/केंद्रशासित प्रदेशांच्या विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वांनुसार आपली ग्राम पंचायत विकास योजना तयार करणाऱ्या ग्राम पंचायतींना प्रोत्साहन देण्यासाठी

डीडीयूएसपी व एनडीआरजीजीएसपी साठी 28 सप्टेंबर, 2018 रोजी **http://panchayataward.gov.in** वर ऑनलाईन अर्ज आमंत्रित करण्यात आले आहेत. या लिंकवर पुढे अधिक अपडेट उपलब्ध करून देण्यात येतील. ग्राम पंचायत विकास योजना पुरस्कारांची घोषणा लवकरच करण्यात येईल. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी, पुरस्कारासाठी मार्गदर्शक तत्त्वे व प्रक्रियेबाबत अधिक माहिती तसेच पुढील अपडेटसाठी मंत्रालयाच्या **http://www.panchayat.gov.in/**आणि **http://panchayataward.gov.in/**ची मदत घ्यावी.

ऑनलाईन नामांकन अर्ज भरण्यास मदत हवी असल्यास राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमधील पंचायती राज विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांची किंवा त्यांच्या राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र समन्वयकाशी संपर्क साधावा.

या पुरस्कारांचा प्रचार-प्रसार करावा अशी विनंती राज्य शासन/केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनांना करण्यात येत आहे.

**पंचायती राज मंत्रालय**

**(पुनीत शर्मा)**
अवर सचिव, भारत सरकार



नरेंद्र सिंग तोमर
ग्रामीण विकास,
पंचायती राज व खाण मंत्री



## 2 ऑक्टोबर ते 31 डिसेंबर 2018

# ग्राम पंचायत विकास योजना (जीपीडीपी)
# "सबकी योजना सबका विकास"
# जन योजना अभियान

### सर्व ग्राम पंचायती/ग्राम सभांना विनंती आहे की त्यांनी या अभियानास सहकार्य करून आपल्या गावाच्या विकासात आपले योगदान द्यावे.

## अभियानातील कार्यक्रमांचे कॅलेंडर

| अ.क्र. | कार्यक्रम | कालमर्यादा |
|---|---|---|
| 1. | सुविधा प्रदात्यांच्या प्रशिक्षण मॉड्यूलची सुरुवात | 30 ऑगस्ट, 2018 |
| 2. | नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती. राज्य, जिल्हा व ब्लॉक पातळीवर. आणि सर्व नोडल अधिकाऱ्याद्वारे वेबसाईटवर नोंदणी | 10 सप्टेंबर, 2018 |
| 3. | ग्राम सभा बैठकीचे कार्यक्रम अपलोड करण | 10 सप्टेंबर, 2018 |
| 4. | प्रत्येक ग्राम पंचायतीसाठी सुविधा प्रदात्याची नियुक्ती | 10 सप्टेंबर, 2018 |
| 5. | सुविधा प्रदात्यांचे प्रशिक्षण पूर्ण | 15 सप्टेंबर, 2018 |
| 6. | गावाच्या सभांसाठी संबंधित विभागांच्या पुढच्या फळीतील कार्यकर्त्यांची नियुक्ती | 15 सप्टेंबर, 2018 |
| 7. | प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये सार्वजनिक सूचना फलक लावणे आणि पोर्टलवर याची जिओटॅग केलेली छायाचित्रे अपलोड करणे | 15 सप्टेंबर, 2018 |
| 8. | ग्राम सभांच्या बैठकींचे जिओटॅग केलेले व्हिज्युअल अपलोड करणे | ग्राम सभा झाल्यावर लगेच |
| 9. | प्लानप्लस ॲप्लीकेशनवर स्वीकृत योजना प्रकाशित करणे | 31 सप्टेंबर, 2018 |

जन योजना अभियान/जीपीडीपी अभियानाची वेबसाईट: gpdp.nic.in
हेल्पडेस्क: 011-23074309, 011-23386556, 011-23383816, 011-23386140
आमच्याशी थेट संपर्क: https://twitter.com/people_plan
https://www.facebook.com/PeoplesPlanCompaign

Marathi

पंचायती राज मंत्रालय

**पंचायती राज मंत्रालय**
www.facebook.com/MinistryofPanchayatiRaj
@mopr_goi

**ग्रामीण विकास मंत्रालय**
www.facebook.com/IndiaRuralDev

**पेयजल व स्वच्छता मंत्रालय**
www.facebook.com/MODWS
@swachhbharat

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

पंचायती राज मंत्रालयाद्वारे मुद्रित व प्रकाशित
**मुख्य संपादक:** अमरजित सिन्हा सचिव, पंचायती राज मंत्रालय व ग्रामीण विकास मंत्रालय
मुद्रक: मे.थॉमसन प्रेस, बी-315, सी-ब्लॉक रोड, ओखला-1, ओखला औद्योगिक परिसर, नवी दिल्ली - 110020
प्रकाशक: पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार, सरदार पटेल भवन, नवी दिल्ली-110001

"The translation of 'Gramoday Sankalp' has been carried out by M/s Jagran Prakashan Ltd. Any inadvertent error or omissions, if any, found in the translation is the responsibility of the agency."